# प्रिय बाई,

## बार्बियानाची शाळा

कजा कजा मरू प्रकाशन

प्रिय बाई, मूळ इटालियनवरून केलेल्या इंग्रजी भाषांतराचा मराठी अनुवाद
सुधा कुलकर्णी

© स्कुओला दि बार्बियाना १९६९
Letter to a Teacher © रँडम हाउस १९७०
प्रिय बाई © सुधा कुलकर्णी

प्रिय बाई, हे पुस्तक प्रथम १९७९ या वर्षी प्रास-ग्रंथालीने प्रकाशित केले होते.

**पुनर्प्रकाशन - जुलै २००४**

**प्रकाशक**
कजा कजा मरू प्रकाशन
द्वारा गरवारे बालभवन,
सारसबागेसमोर,
पुणे ४११ ००२
फोन : (०२०) २४४४२१०९

**मुद्रक**
मुद्रा
३८३ नारायण पेठ,
पुणे ४११ ०३०

**किंमत**
रुपये ५०/-

# पत्र खरं तर –

हें पुस्तक शिक्षकांसाठी नाहीं, तर पालकांसाठीं लिहिलेलं आहे. त्यांनी संघटित व्हावं म्हणून दिलेली ही हांक आहे.

एकदम वाटेल हें सगळं एकाच मुलानं लिहिलेलं आहे. प्रत्यक्षांत बार्बियानाच्या शाळेंतल्या आम्हीं आठ मुलांनी मिळून हें लिहिलं. शिवाय एव्हांना कामाला लागलेल्या आमच्या सोबत्यांनी दर रविवारी आम्हांला मदत केली.

पहिल्यांदा आभार फादर मिलानींचे. त्यांनीं आम्हांला तयार केलं, लिहायचे नियम शिकवले आणि आमच्या कामावर देखरेख ठेवली. नंतर कैक मित्रमंडळी. ह्यांनीं नानाप्रकारें मदत केली : पालकमंडळींच्यामुळं लिखाणांत सोपेपणा आला. सचिव, शिक्षक, पर्यवेक्षक, मुख्य शिक्षक, शिक्षणखात्याचे आणि सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ स्टॅटिस्टिक्सचे अधिकारी, पाद्री-आंकडेवारी गोळा करायला ह्या सगळ्यांची मदत झाली.

श्रमिक संघटनांचे पदाधिकारी, पत्रकार, कारभारी मंडळी, इतिहासकार, संख्याशास्त्रज्ञ, न्यायाधीश – ह्यांनींसुद्धां नानाप्रकारची माहिती पुरवली.

# मजकूर


माझं काम पोस्टमनचं ७

पूर्वार्ध १५

सक्तीच्या शाळांनीं विद्यार्थ्यांना नापास करतां कामां नये

**प्रिय बाई** **१७**

डोंगरी लोक १८

शहरांतली मुलं २३

परीक्षा २९

नवीन माध्यमिक शाळा ४०

आंकडेवारी ४३

जन्मतःच वेगळे? ६७

हें तुमच्यावर होतं ६९

निवड कांहींना सोईस्कर ७६

स्वामी ८०

निवडपद्धतीनं आपलं ध्येय गांठलं आहे ८४

तुम्हीं कुणासाठीं शिकवतां आहांत? ८७

**आम्हीं ह्या सुधारणा सुचवतों** **९१**

१. नापास करूं नका ९१

२. पूर्णवेळ शिकवणं ९४

पूर्णवेळ काम आणि कुटुंब ९७

पूर्णवेळ आणि संघटनेचा हक्क ९८

पूर्णवेळ कोण शिकवेल? १००

पूर्णवेळ आणि विषय १०३

३. ध्येय १०५

| | |
|---|---|
| **उत्तरार्ध** | **१११** |
| माजिस्त्रालेमधें तुम्हीं पण नापास होतां, पण.... | |
| इंग्लंड | ११३ |
| आत्मघातकी निवड | ११८ |
| ध्येय | १२३ |
| संस्कृति – सर्वांचीच गरज | १३० |
| तुम्हीं आमच्यावर लादतां ती संस्कृति | १३३ |
| फौजदारी खटला | १४५ |
| संसर्ग | १५० |
| पत्रं | १५३ |
| निर्जंतुकीकरण | १५७ |

# माझं काम पोस्टमनचं!

बार्बियाना हें कांहीं एखाद्या शाळेचं किंवा गांवाचं नांव नाहीं. तुस्कानीमधल्या म्युगेल्लो विभागांतल्या डोंगराळ भागांत राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या वीसेक घरांची ही वसाहत. इथं सबंध खोऱ्यावर नजर ठेवून एका टेकडीवर उभं आहे १४ व्या शतकांतलं एक छोटंसं सुंदर चर्च. व्हिच्चिओहून वळणं घेतघेत एक पायवाट बार्बियानाला येऊन पोंचते.

इथल्या निसर्गाचं एक कठोर, रुक्ष सौंदर्य आहे. जंगलं, खडकाळ कडे आणि मधूनच विखुरलेलीं शेतं नि वाड्या.

डॉन लोरेंझो मिलानी हे बार्बियानाच्या शाळेचे संस्थापक. १९५४ मधें ते इथल्या चर्चमधें आले. त्याच्या आधीं फ्लोरेन्समधल्या कालिंझानो गांवीं ते होते. तिथं त्यांनीं कामगारांसाठी रात्रीची शाळा सुरू केली होती.

बार्बियानांतल्या विखुरलेल्या शेतांवरच्या मुलांची दुरवस्था त्यांच्या लगेंचच लक्षांत आली. बहुतेकांनीं परीक्षेंत नापास होऊन शाळा सोडून दिलेली होती. तिथल्या शिकवायच्या पद्धतीमुळं त्यांच्या सगळ्या उत्साहावर पाणी पडलं होतं. फादरनीं आठ-दहा मुलं गोळा केलीं. सगळीं दहा-बारा वर्षांचीं. त्यांच्याकरतां दिवसाच्या आठ तासांचं एक भरगच्च वेळापत्रक बनवलं. आठवड्यांतून दिली तर एक सुट्टी फक्त - नाहींतर सातही दिवस शाळाच.

होतां होतां दहाचीं वीस मुलं झालीं. मोठ्या मुलांचा बराचसा वेळ लहानांना शिकवण्यांत किंवा झालेल्या अभ्यासाची उजळणी

करून घेण्यांत जायचा. आपल्या आयुष्याशीं निगडित असलेले प्रश्न समजून घेऊन त्यांचा अभ्यास करण्याकरतां लागेल तितका वेळ सगळेच द्यायचे आणि अशाच तऱ्हेनं शाळेंतल्या आठ मुलांनीं हें 'पत्र' लिहून काढलं. एक वर्षभर खपून.

१९६७ च्या उन्हाळ्यांत डॉन लोरेंझो मिलानी वारले आणि त्यांच्याबरोबर बार्बियानाची शाळाही - आणि तरीसुद्धां अजून ती जिवंत आहे. सगळ्यांना एकत्र ठेवणारी शक्ति नाहींशी झाल्यावर बऱ्याच शेतकऱ्यांनीं अटळ असल्यासारखी खोऱ्याची वाट धरलीं किंवा फ्लोरेन्सची. पण त्यांच्या मुलांमधला मैत्रीचा धागा अतूटच राहिला आणि चर्चबद्दलची ओढदेखील. हीं सगळीं मुलं कांही-ना-कांही करताहेत. कुणी कामगार संघटनेंत, कुणी फॅक्टरींत, कुणी कारागीर झालेत. कांहींजण शिक्षक होण्याकरतां पुढं शिकताहेत. कैकदां रविवारीं सगळेजण जुन्या शाळेंत जमतात. बोलतात. अनेक गोष्टींवर चर्चा होते.

मूळ इटालियन पुस्तकाचं इंग्रजींत भाषांतर करणाऱ्यांपैकीं एकानं १९६८च्या उन्हाळ्यांत बार्बियानाला भेट दिली. फ्लोरेन्समधल्या अनाथाश्रमांतल्या मुलांचा एक गट तेव्हां तिथं तळ ठोकून होता आणि बार्बियानाच्या शाळेंतलीं एव्हांना सोळा-सतरा वर्षांची झालेलीं मुलं त्यांना शिकवत होतीं. बाहेर ओसरीवर, स्वैपाकघरांत, सगळीकडे डगडगत्या टेबलांभोंवतीं वेगवेगळ्या वयाचीं मुलं कामांत गढून गेलीं होतीं. त्या हिंवाळ्यांत बार्बियानाची शाळा अधिकृतपणें कालिंझानोला हलली. तिथं बार्बियानाच्या माजी विद्यार्थ्यांनीं, मिलानींच्या मित्रमंडळींनीं नि रात्रशाळेंच्या विद्यार्थ्यांनीं मिळून रीतसर एक 'दोपोस्कुओला' उघडली आहे. लहान मुलं नि प्रौढ माणसं - दोघांच्याहीसाठीं. ही शाळा म्हणजे फक्त एक प्रशस्त खोली आहे - एक फळा, थोडे खडू,

थोडींशीं पुस्तकं आणि बरेचसे स्वयंसेवक शिक्षक. पण तिथल्या हवेंतसुद्धां बार्बियानामधलाच उत्साह भरून आहे - एक भवितव्य इथं घडवलं जात आहे.

इटालींत प्राथमिकचीं पांच वर्षं नि माध्यमिकचीं तीन वर्षं सक्तीचीं आहेत. १४ व्या वर्षांनंतर पुढं शिकायचं असलेल्या मुलांना वेगवेगळ्या अभ्यासक्रमांतून हवी ती निवड करतां येते. जशी आपल्याकडेही प्राथमिकचीं चार वर्षं सक्तीचं नि मोफत शिक्षण दिलं जावं असं घटनेंत नमूद आहे. ग्रामपंचायती, जिल्हा परिषदा, नगरपालिका यांच्यामार्फत शाळा चालवून तें दिलं जातं.

तिथं रोजचीं शाळा फक्त १२।। किंवा १।। पर्यंतच चालते. म्हणूनच शाळा सुटल्यानंतरचा वेळ अभ्यास न समजलेल्या मुलांकरतां कसा उपयोगांत आणतां येईल यावर या पुस्तकांत जास्त भर दिला आहे. अभ्यासाला जोड म्हणून खाजगी शिकवण्या ठेवणं फक्त सुस्थितींतल्या पालकांनाच परवडणारं आहे. गरीब घरांतल्या मुलांचा हा वेळ बहुतेक वायांच जातो. मदतीची खरीखुरी गरज असलेल्यांनाच असं वाऱ्यावर सोडून दिलं जातं.

इटालियन शाळांतून मार्क देण्याची पद्धत अगदीं कडक नि दहशत बसवणारी आहे. जास्तींत जास्त मार्क दहा. पैकीं सहाला पास. सगळ्यांची एकत्रित परीक्षा प्राथमिकच्या पांचव्या वर्षाअखेर, माध्यमिकच्या तिसऱ्या वर्षाच्या शेवटीं, आणि उच्च माध्यमिकच्या शेवटच्या वर्षीं. नापास झालेल्या मुलांना सप्टेंबरमधें परत परीक्षा देतां येते. जशी आपल्याकडें ऑक्टोबरमधें होते.

खेड्यांत राहणाऱ्या या गरीब विद्यार्थ्यांनीं शिक्षिकेला लिहिलेल्या या पत्रानं असंख्य वाचकांच्या हृदयाचा ठाव घेतला.

इटालींत आणि इतर देशांतही त्याचं फार नांव झालं. अर्थातच पुस्तकाला लोकप्रियता लाभली ती निःसंशय त्याच्या आशयामुळं, सामाजिक नि शैक्षणिक क्षेत्रांतल्या नाजूक वर्मांवर नेमकं बोट ठेवल्यामुळं. इटालींत मध्यमवर्गाकरतां म्हणून चालवल्या जाणाऱ्या शाळांमधें बदल झाला पाहिजे अशी तीव्र भावना फार मोठ्या समाजांत आहे ह्याचं प्रत्यंतर गेल्या कांहीं वर्षांतल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनांमुळं आलंच आहे.

पण मूळ इटालियन पुस्तकानं लक्ष वेधून घेतलं तें त्याच्या आगळ्या शैलीमुळंही. विशेषणांनीं खच्चून भरलेली, लांबलचक वाक्यांची नि अलंकारप्रचुर शब्दांनी लगडलेली भाषाच वाचायची संवय झालेल्या इटालियन वाचकांना हें पुस्तक साधंसुधं, रोखठोक नि टवटवीत वाटलं. मुलांच्याच भाषेंत सांगायचं तर ही शैली 'लेखनकलेचे साधेसुधे पण समर्पक सनातन नियम' पाळून बनलेली आहे. लेखनाचे हे नियमसुद्धां त्यांनीं अगदीं आटोपशीरपणें पान २६ वर नमूद केले आहेत :

> सांगण्यासारखं महत्त्वाचं कांहीं असायला हवं. तें सर्वांना किंवा निदान अनेकांना उपयोगीं वाटेल असं हवं. तुम्हीं कुणासाठीं लिहितां आहांत तें लक्षांत घ्या. त्यासाठीं जें उपयोगी असेल तें सारं जमा करा. विषयाचा उलगडा करण्यासाठीं तर्कशुद्ध अशी पद्धत निवडा. प्रत्येक निरुपयोगी शब्द काढून टाका. रोजच्या बोलण्यांत वापरला न जाणारा प्रत्येक शब्द टाळा. वेळेचं बंधन कधींही घालून घेऊं नका. मी आणि शाळेंतले माझे मित्र हें पत्र या पद्धतीनंच लिहीत आहोंत आणि मी शिक्षक झाल्यावर माझे विद्यार्थी पण याच पद्धतीनं लिहितील अशी आशा मी बाळगून आहे.

साऱ्या भाषा-देशांच्या सीमा ओलांडून होणारं या पत्राचं आवाहन फार समर्थ आहे. रोखठोक, स्पष्ट तरी साधी, सुंदर, अनलंकृत अशी याची भाषाही भिडणारी आहे.

ह्यांतला 'मी' हा विशीच्या आंतल्या आठजणांचा मिळून बनलेला आहे आणि पुस्तकभर कायम येणारं 'तुम्हीं ' हें संबोधन म्हणजे त्यांना शाळेंत भेटलेल्या बाई!

हे सारे लेखक आहेत तुस्कानीच्या शेतकरी कुटुंबातले. पण त्यांनीं बोलका केलेला अनुभव कांहीं त्यांच्या डोंगराळ परिसरापुरताच मर्यादित नाहीं. मीं हें पत्र वाचायला घेतलं आणि वाचतां वाचतां वांटायला लागलं - शेंकडो-हजारों मैल दूर राहाणाऱ्या परकी भाषा बोलणाऱ्या, वेगळ्या संस्कृतींत-वातावरणांत वाढणाऱ्या कुणा अनोळखी मुलांचं हें मनोगत नाहीं. हें तर आपलंच आहे. यांतले प्रश्न, यांतल्या अडचणी, यांतल्या व्यथा आपल्या इथल्याच आहेत. आपल्याच मुलांचं मनोगत जणूं बोलकं होत आहे.

हें पुस्तक 'सगळ्यांना उपयोगीं पडावं' म्हणूनच लिहिलेलं आहे, असं ह्या मुलांचंच म्हणणं आहे.

सध्यांच्या शिक्षणपद्धतीचा धिक्कार करतांना ह्या मुलांनीं इटालियन शिक्षणपद्धतीबद्दल पद्धतशीर संशोधन करून आंकडेवारीचं पाठबळ मिळवलेलं आहे. हा केवळ भावनेचा उद्रेक नाहीं, हें त्यांना दाखवायचं होतं. आपले निष्कर्ष अचूक असायला हवेत असा त्यांचा आग्रह होता. त्यासाठी पडेल ती मेहनत करायची त्यांची तयारी होती आणि डॉन मिलानींचं मार्गदर्शन तर होतंच होतं.

हे परिशिष्टवजा असलेले आंकडेवारीचे तक्ते इथं दिलेलं नाहींत. कारण त्यांत आहे इटलींतल्या शाळांची आंकडेवारी.

मूळ पुस्तकांतला आशय समजून घ्यायला तिची तशी गरज नाहीं. पण नापास होऊन शिक्षण अपुरंच ठेवून शाळा सोडून जाणारीं मुलं आपल्याकडे महाराष्ट्रांतसुद्धां ७० टक्के आहेत म्हणजे पहा आणि हें केवळ अभ्यास न झेंपल्यामुळंच होतं असं नाहीं.

या पत्राचं आणखी एक वेगळेपण म्हणजे शिक्षणाकडे पाहण्याचा मुलांचा दृष्टिकोन. शिक्षणाबद्दल तज्ज्ञ, विचारवंत यांचींच मतं आपण एरवीं वाचत असतों. पण हें शिक्षण ज्यांना द्यायचं त्यांची गरज, अपेक्षा अनेकदां लक्षांतच घेतली जात नाहीं. कोंवळ्या वयांतल्या कडू अनुभवांच्या चटक्यांनीं आलेलं डोळस शहाणपण या पत्रांतून दिसतं. स्वाभाविकच हें कधीं कडू रूपही घेतं आणि त्यांतून शिक्षणपद्धतीवर कोरडे ओढले जातात. पण हें सारं आपल्याला अंतर्मुखच करतं, विचार करायला लावतं. समान पातळीवरला माणूस म्हणून जगण्याची संधी शिक्षणानं मिळावी ही या मुलांची मूलभूत महत्त्वाची मागणी या साऱ्या पत्राला एक गद्यकाव्याचं रूप देते.

Letter to a Teacher या मूळ पुस्तकाच्या इंग्रजी भाषांतराची माझी ओळख झाली ती डॉ. कुमूद मेहता यांच्यामुळं. मराठी वाचकांसमोर हें यायला हवं या विचारांतून त्याचं भाषांतरही मी करावं असा त्यांचा आग्रह आणि तें पुरं होईतों सतत त्याचा पाठपुरावाही त्यांनीं केला. त्याचं दृश्य रूप म्हणजे हें पुस्तक.

मूळ इटालियन पुस्तकाच्या आठजण लेखकांनीं अनुवादाला परवानगी मोठ्या आनंदानं देऊन टाकली. वरतून परत असा उत्साह दिला कीं जिथंजिथं म्हणून मुलं अशीं शाळेबाहेर हांकललीं जातात त्या प्रत्येकच देशांत हें पुस्तक पोंचलं पाहिजे

असं आमचं म्हणणं आहे. ह्या पुस्तकांत जें कांहीं चांगलं आहे तें त्यांचंच. उणिवांची जबाबदारी मात्र माझीच.

आंतरराष्ट्रीय बालक वर्षाच्या निमित्तानं एकूणच शिक्षणाबद्दलचं हें मुलांचं मत सगळ्यांच्यापर्यंत पोंचवतां आलं ह्याचं मोठं समाधान वाटतं. माझं काम आपलं पोस्टमनचं आहे.

**सुधा कुलकर्णी**

पूर्वार्ध

## सक्तीच्या शाळांनीं विद्यार्थ्यांना नापास करतां कामां नये

# प्रिय बाई,

मी किंवा माझं नांव – तुम्हांला कांहींच आठवणार नाहीं. आमच्यांतल्या इतक्या जणांना तुम्हीं  नापास केलेलं आहे!

उलट, तुमच्याबद्दल आणि इतर शिक्षकांबद्दल माझ्या मनांत मात्र अनेकदां विचार येतात. तुम्हीं जिला 'शाळा' म्हणतां त्या संस्थेबद्दल आणि ज्यांना तुम्हीं नापास करतां त्या मुलांबद्दल विचार घोळतात.

नापास करून सरळ तुम्हीं आम्हांला शेतांत आणि कारखान्यांत टाकून देतां आणि विसरून जातां.

**बुजरेपणा** दोन वर्षांपूर्वी मी जेव्हां माजिस्त्रालेच्या पहिल्या वर्षाला होतों, तेव्हां तुमच्यापुढं मला खूप बुजल्यासारखं व्हायचं. खरं तर हा बुजरेपणा माझ्यामधें सततच आहे. अगदीं लहान असतांना माझी नजर नेहमीं जमिनीलाच खिळलेली असायची. कुणाला दिसूं नये म्हणून मी अगदीं भिंतीला चिकटून चालायचों.

पहिल्यांदां मला वाटलं, हा कांहींतरी माझा किंवा कदाचित् आमच्या घराचाच आजार असेल. माझी आई तर अशी कीं ती तारेच्या कागदाला पण बुजते. माझे वडील ऐकतात, गोष्टी टिपत असतात, पण त्यांना बोलणं ठाऊक नाहीं.

नंतर मला वाटलं, हा बुजरेपणा आम्हां डोंगराळ भागांतल्या लोकांचाच एक आजार असावा. कारण सपाटीवर राहणारे शेतकरी त्या मानानं आत्मविश्वासानं वावरतांना दिसायचे. आणि शहरांतल्या कामगारांबद्दल तर बोलायलाच नको.

पण आतां माझ्या लक्षांत आलं आहे – हे कामगारसुद्धां या ‘पप्पा-ममींच्या पोरांना’ राज्यकारभारांतल्या सगळ्या महत्त्वाच्या नोकऱ्या आणि लोकसभेच्या सगळ्या जागा बळकावूं देतातच.

म्हणजे हे कामगारसुद्धां आमच्यासारखेच! गरिबांचा भित्रेपणा हें पुराणंच गूढ आहे. त्यांत राहूनदेखील मला तें उकलत नाहीं. कदाचित् यांत भित्रेपणाचाही भाग नसावा कीं शूरपणाचाही. हा निव्वळ चढेलपणाचा अभाव असेल.

## डोंगरी लोक

**सर्वांसाठीं शाळा** प्राथमिक शाळेच्या पांच वर्षांत सरकारनं मला दुय्यम दर्ज्यांचं शिक्षण देऊं केलं. एका खोलींत पांच वर्ग - म्हणजे माझ्या हक्काच्या शिक्षणापैकीं एक-पंचमांशच. अमेरिकेंत पण काळ्या-गोऱ्यांत दरी निर्माण करण्यासाठीं हीच पद्धत वापरली जाते. गरिबांसाठीं गरीब शाळा! अगदीं सुरवातीपासूनच!

**सक्तीची शाळा** पहिल्या पांच प्राथमिक यत्तांनंतर आणखी तीन वर्ष शिक्षण घेण्याचा हक्क मला होता. खरं तर घटना म्हणते - शाळेंत जाणं सक्तीचं! पण व्हिच्चिओमधें तर अजुनी माध्यमिक शाळाच नव्हती. त्यासाठीं बोर्गोला जाणं जरा धाडसाचंच होतं. ज्या थोड्यांनीं हा खटाटोप केला त्यांना त्यासाठीं ढिगावारीं पैसा खर्चावा लागला आणि त्यांना नापास करून कुत्र्याप्रमाणे बाहेर फेंकून दिलं गेलं.

शिवाय शिक्षकांनीं माझ्या आईवडिलांना सांगितलं होतं की ह्याला शिकवायला पैसा वायां न घालवणंच बरं. “त्याला शेतावर पाठवून द्या. त्याला अभ्यास जमायचा नाहीं.”

माझ्या बाबांनीं उत्तर दिलं नव्हतं. ते विचार करत होते - 'आम्हीं बार्बियानाला राहात असतों, तर तो शिकायला लायक झाला असता.'

**बार्बियाना** बार्बियानामधें सगळीं मुलं शाळेंत जात होतीं. पाद्र्याच्या शाळेंत! भल्या पहांटेपासून ते काळोख पडेपर्यंत. उन्हाळ्यांत तसंच हिंवाळ्यांत. 'शिकायला लायक नसलेला' असा तिथं कुणीच नव्हता.

पण आम्हीं दुसऱ्या तालुक्यांतले होतों आणि लांब राहात होतों. माझ्या वडलांनीं आपला विचार जवळजवळ सोडून दिला. तेवढ्यांत सान मार्तिनोहून रोज एक मुलगा बार्बियानाला जातो असं कळलं. त्यांना धीर आला आणि ते माहिती काढायला गेले.

**जंगल** ते परत आले ते माझ्यासाठीं अंधारांत असावी म्हणून बॅटरी, सार न्यायला म्हणून कापडी आवरणासकट बाटली आणि बर्फांत वापरायला बूट खरेदी करूनच.

पहिल्या दिवशीं ते स्वतः मला तिथं घेऊन गेले. तिथं पोंचायला आम्हांला दोन तास लागले. कारण विळा नि कोयता चालवत आम्हांला वाट काढत जावं लागलं. नंतर मी तासा-सव्वा तासांत वाट कांपायला शिकलों.

वाटेंत मला फक्त दोन घरं लागायचीं. तीसुद्धां खिडक्या मोडलेलीं. नुकतींच ओसाड पडलेलीं. कधीकधीं सापाच्या भीतीनं किंवा डोंगरांत एकटाच राहणारा वेडा माझ्यावर लांबून किंचाळायला लागला कीं मी पळत सुटायचों.

तरी मी अकरा वर्षांचा होतों. तुम्हीं तर भीतीनं अर्धमेल्याच झालां असतांत.

बघितलंत, आपला प्रत्येकाचा वेगवेगळ्या तऱ्हेचा भित्रेपणा आहे. तेव्हां त्या बाबतींत तरी आपली फिटंफाट!

पण आपण दोघंहि आपापल्या घरीं राहिलों तरच खरी फिटंफाट किंवा आम्हीं राहातों तिथं येऊन तुम्हीं आमची परीक्षा घेतली तरच! पण तसा तर नियमच नाहीं.

**टेबलं** मी आलों तेव्हां बार्बियाना मला शाळेसारखी वाटलीच नाहीं. शिक्षक नाहींत, डेस्कं नाहींत. ना फळा ना बाकं. फक्त मोठीं टेबलं. त्यांच्याभोंवतीं बसूनच आम्हीं अभ्यासहि केला नि जेवलोंहि तिथंच.

प्रत्येक पुस्तकाची फक्त एकेकच प्रत तिथं होती. तिच्या भोंवतीं मुलं गोळा व्हायचीं. त्यांच्यापैकीं एकजण जरा मोठा आहे आणि तो शिकवतो आहे हें लक्षांत पण यायचं नाहीं.

सगळ्यांत मोठा शिक्षक होता सोळा वर्षांचा. आणि सगळ्यांत लहान बारा वर्षांचा. मला त्याचं इतकं कौतुक वाटलं! मी सुरवाती-पासूनच मनाशीं ठरवलं – आपणसुद्धां इथं शिकवणार.

**आवडता विद्यार्थी** तिथलंहि आयुष्य कष्टाचंच होतं. पुन्हां परत येऊं नयेसं वाटावं अशी शिस्त नि बाचाबाच्या.

मात्र आधीं कांहींच येत नसलेल्या, मंद किंवा आळशी असलेल्यांना आपणच सगळ्यांत आवडते आहोंतसं वाटावं असं वागवलं जायचं. तुम्हीं शिक्षक वर्गातल्या सगळ्यांत हुशार मुलाला जसं वागवतां, तसं त्याला वागवलं जायचं. शाळा जणूं कांहीं फक्त त्याच्याचसाठीं आहे असं वाटायला लागायचं. त्याला नीट समजेपर्यंत बाकीचे सगळे पुढची सुरवात करायचे नाहींत.

**सुट्टी** तिथं मधली सुट्टी तर नव्हतीच, पण रविवारींसुद्धां शाळा चालूंच. आम्हांला कुणालाच त्याचं कांहीं वाटायचं नाहीं. कारण बाहेर करायला लागणारी मोलमजुरी त्याहून वाईट होती. पण कुठलाहि मध्यमवर्गीय सद्‌गृहस्थ तिथं फिरकला तर तो या गोष्टीचा इतका बाऊ करायचा!

एकदां एक बडे प्राध्यापक सांगायला लागले – "फादर मिलानी, तुम्हीं कधीं अध्यापनशास्त्र अभ्यासलेलं नाहीं. डॉ. पोलिऑन्रिक म्हणतात कीं खेळ हें मुलांना शारीरमानस –" हा मोठाथोरला शब्द नि त्याचा शेवट आम्हांला कांहीं कळलाच नाहीं.

आमच्याकडे न बघतांच ते प्राध्यापक बोलत होते. विद्यापीठांतल्या शिक्षणशास्त्राच्या प्राध्यापकाला शाळकरी मुलांकडे बघायला लागतच नाहीं नाहींतरी. आम्हांला जसे पाढे तोंडपाठ, तशीं त्याला मुलं तोंडपाठ! एकदांचे ते प्राध्यापक गेले नि ल्युचिओ म्हणाला, 'गाईच्या शेणापेक्षां शाळा केव्हांहि कितीतरी बरी." ल्युचिओच्या गोठ्यांत छत्तीस गाई आहेत.

**जगांतले शेतकरी** हें वाक्य तुमच्या शाळांच्या दरवाज्यावर कोरून ठेवायला हरकत नाहीं. लक्षावधि शेतकरी मुलांचं हेंच मत आहे. तुम्हीं म्हणतां, मुलांना शाळा अगदीं नकोशी वाटते आणि खेळायला खूप आवडतं. आम्हां शेतकऱ्यांना कधीं विचारलंच नाहींत तुम्हीं. पण आम्हीं इथं १९० कोटी आहोंत. जगांतल्या प्रत्येक दहापैकीं सहा मुलांना ल्युचिओसारखंच वाटतं. बाकी चारांचं कांहीं ठाऊक नाहीं आम्हांला.

तुमची सगळी संस्कृति अशीच तर उभारली गेली आहे. जणूं कांहीं तुम्हीं म्हणजेच सारं जग!

**बालशिक्षक** एकाच वर्षांत मी शिक्षक झालों. दर आठवड्याला तीन अर्धे दिवस. माध्यमिकच्या पहिल्या यत्तेला मीं भूगोल, गणित आणि फ्रेंच शिकवलं.

नकाशा बघायला किंवा अपूर्णांक समजून द्यायला कांहीं पदवीची जरूरी नाहीं आणि माझ्या हातून कांहीं चुका झाल्या तरी फारसं बिघडलं नाहींच. मुलांना तो दिलासाच वाटायचा. आम्हीं सगळे मिळून त्या चुका सुधारून टाकायचों. कुठलीहि काळजी आणि भीति न बाळगतां तासामागून तास शांतपणें जायचे. मी चालवतों तसा वर्ग चालवणं तुम्हांला कधींच जमणार नाहीं.

**राजकारण कीं दळभद्रीपणा** आणि मीदेखील शिकवत असतांना इतक्या गोष्टी स्वतः शिकत होतों! उदाहरणार्थ, दुसऱ्यांच्या अडचणी आपल्यासारख्याच आहेत. त्यांना सगळ्यांनीं मिळून तोंड देणं हें चांगलं राजकारण. केवळ स्वतःचीच सुटका करायला बघणं हा दळभद्रीपणा झाला.

हे दळभद्रीपणाचे जंतू माझ्यांत पण होते. त्यांच्याविरुद्ध एखादी लस मला टोंचलेली नव्हती. परीक्षेच्या वेळीं तर वाटायचं, आपण बरे नि आपला अभ्यास बरा, ही लहान पोरं गेलीं खड्डयांत!

मी पण तुमच्या मुलांसारखाच होतों. पण बार्बियानामधें दुसऱ्याजवळ काय पण स्वतःजवळसुद्धां हें कबूल करणं मला शक्य नव्हतं. आंतून तसं वाटत नसलं तरी मला उदार रहावंच लागायचं.

तुम्हांला ही फार छोटी गोष्ट वाटेल. पण तुम्हीं तर तुमच्या विद्यार्थ्यांसाठीं इतकंसुद्धां करत नाहीं. त्यांच्याकडून

कांहीं अपेक्षाच करत नाहीं. आपलीआपणच त्यांनीं वाट काढावी असं तुमचं म्हणणं असतं.

## शहरांतलीं मुलं

**खुरटलेलीं** व्हिच्चिओमधें माध्यमिक शाळा सुरूं झाली, तेव्हां शहरांतलीं कांहीं मुलं बार्बियानाला आलीं. अर्थात् नापास झालेलीं तेवढींच. त्यांना कधीं भित्रेबुजरेपणाचा प्रश्न भेडसावलाच नाहीं. पण ती वेगळ्या तऱ्हेनं खुटरलेलीं होतीं. उदाहरणार्थ, खेळ आणि सुट्टया हा त्यांना हक्कच वाटत होता. आणि शिकणं हा तुमच्यावर मोठा उपकार! शाळेंत शिकायला जायचं असतं आणि शाळेंत जाणं ही आपल्या वाट्यांला आलेली दुर्मिळ संधी आहे हें त्यांना मुळीं माहीतच नव्हतं.

शिक्षक हा त्यांच्या मतें विरुद्ध पक्षाचा घटक, आणि त्याला फसवायचंच असतं. त्या मुलांनीं कॉपी करायचादेखील प्रयत्न केला. इथं कुठलंहि प्रगतिपुस्तक ठेवलेलं नाहीं यावर त्यांचा विश्वास बसायलाच किती तरी काळ जावा लागला.

**कोंबडा** लैंगिक गोष्टींबद्दलसुद्धां त्यांची अशीच लपवाछपवी. यासंबंधीं कानांत कुजबुजूनच बोललं पाहिजे असं त्यांना वाटायचं. कधी कोंबडीवर कोंबडा पाहिला तर जणूं एखादा व्यभिचारच आपण पाहात आहोंत अशा तऱ्हेनं ते एकमेकांना कोपरानं ढोसायचे.

एकंदरींत सुरवातीला तरी त्यांना फक्त या एकाच विषयांत रस वाटत होता. शाळेंत आमच एक शरीरशास्त्राचं पुस्तक होतं त्याच्या अभ्यासासाठीं ते एका कोपऱ्यांत स्वतःला कोंडून घ्यायचे. त्यांतलीं दोन पानं तर पुरतीं फाटून गेलीं.

नंतर त्यांचं लक्ष इतर पानांनीं वेधून घेतलं. आणखी कांहीं काळानं इतिहास हीदेखील एक गंमत आहे हें त्यांच्या लक्षांत आलं.

कांहींच्या बाबतींत असे शोध लागणं कधींच थांबलेलं नाहीं. आतां तीं प्रत्येक गोष्टींत रस घेतात. आपल्याहून लहान मुलांना शिकवतात आणि आतां तीं आमच्यांतलींच होऊन गेलीं आहेत.

कांहींना मात्र पुन्हां गोठवून टाकण्यांत तुम्हांला यश मिळून गेलं आहे.

**मुली** शहरांतून एकहि मुलगी कधीं बार्बियानाला आलीच नाहीं. रस्ता धोक्याचा म्हणून असेल कदाचित्. कदाचित् त्यांच्या आई-वडलांच्या विचारांमुळं असेल. एवढ्याशा कोंबडीच्या मेंदूनं स्त्री आपलं आयुष्य जगूं शकते असं त्यांना वाटत होतं. स्त्रीनं बुद्धिमान् असावं अशी पुरुषांची अपेक्षाच नसते.

हादेखील एक जातीयवादच! पण याबद्दल तुम्हांला दोष देतां यायचा नाहीं. मुलींनीं शिकावं अशी कळकळ आईवडलांपेक्षां तुम्हांला जास्ती असते.

**सांद्रो आणि गियानी** सांद्रो पंधरा वर्षांचा. पांच फूट आठ इंच उंची. एक अपमानित 'प्रौढ'! त्याच्या शिक्षकांनीं त्याला 'अर्धवट' ठरवलं होतं. पुन्हां तिसऱ्यांदां त्यानं माध्यामिकच्या पहिल्या वर्गांतच बसावं असं त्यांचं म्हणणं.

गियानी चौदा वर्षांचा. चंचल आणि वाचनाशीं छत्तिसाचा आंकडा असलेला. त्याच्या शिक्षकांनीं त्याला जवळजवळ गुन्हेगारच ठरवलं. त्यांचं सर्वस्वीं चुकलं असं नाहीं. पण म्हणून

आपल्या मार्गांतून त्याला झटकून टाकायला ही सबब देणं बरं आहे कां?

पुन्हां प्रयत्न करायची इच्छा त्या दोघांपैकीं कुणालाच नव्हती. शाळा कायमची सोडून देऊन कामाला लागावं अशा बेताला ते आले होते. ते आमच्याकडे आले कारण आम्हीं त्यांना नापास करणाऱ्या मार्कांकडे कानाडोळा करतों आणि वयाप्रमाणं योग्य त्या वर्गांत त्या मुलांना बसवतों.

सांद्रोला माध्यमिकच्या तिसऱ्या यत्तेंत आणि गियानीला दुसऱ्या यत्तेंत आम्हीं बसवलं. त्यांच्या आतांपर्यंतच्या हिरमुसल्या शाळकरी जीवनांत त्यांना मिळालेलं हें पहिलंच समाधान. सांद्रोला हें कायम आठवत राहील. गियानीला मधूनच कधींतरी आठवतं.

**अँडरसनची गोष्ट** शाळेच्या अभ्यासक्रमांत अखेर झालेला बदल हें त्यांचं दुसरं समाधान होतं. तुम्हीं त्यांना पूर्ण पारंगत होण्याच्या खटाटोपात अडकवलंत. निरुपयोगी प्रावीण्य! कारण पुरा वैताग येईपर्यंत त्याचत्याच गोष्टी पुन्हां पुन्हां उगाळलेल्या मुलगा ऐकत असतो, पण त्याच वेळीं तो वयानं वाढत असतो. मधल्या वेळांत त्या गोष्टी मात्र तशाच राहतात, आणि तो मात्र बदलत असतो. त्यामुळं ते विषय त्याला पोरकट वाटायला लागतात.

उदाहरणार्थ, माध्यमिकच्या पहिल्या वर्गांत तुम्हीं मुलांना हॅन्स ख्रिश्चन अँडरसनची गोष्ट आणि पास्कोलीची कविता दोनदोनदां, तीनतीनदां वाचून दाखवतां. पण माध्यमिकच्या दुसऱ्या नि तिसऱ्या वर्गामधें मोठ्यांसाठीं लिहिलेल्या गोष्टी वाचतां. असणें - Avere या क्रियापदाला 'एच' हें व्यंजन

लावणं गियानीला कधींच जमलं नाहीं. पण उलट मोठ्यांच्या जगांतल्या कितीतरी गोष्टी त्याला माहीत होत्या - निरनिराळे व्यवसाय, कौटुंबिक संबंध आणि त्याच्या गांवच्या लोकांचं जीवन. कधीकधीं संध्याकाळीं आपल्या वडलांबरोबर तो कम्युनिस्ट पक्षाच्या सभेला किंवा गांवपंचायतीच्या सभेलाहि जायचा.

तुम्हीं तुमच्या ग्रीक आणि रोमन राजवटींनीं त्याला इतिहासाचा वीट आणलांत. पण दुसऱ्या जागतिक युद्धाचा अभ्यास करतांना आम्हीं त्याला तासन्तास खिळवून ठेवूं शकलों.

त्यानं पुन्हां एकदां वर्षभर इटलीचा भूगोलच करावा अशी तुमची इच्छा होती. बाकीच्या जगाबद्दल कधीं कांहीं कानांवर न पडतांच त्यानं शाळा सोडून दिली असती. त्याचं मोठं नुकसान झालं असतं तुमच्या हातून. समजा, पुढं त्याला फक्त रोजचं वर्तमानपत्रच तेवढं वाचायचं असतं तरीसुद्धां.

**‘तुला तर धड बोलतांहि येत नाहीं’** सांद्रोला थोडक्याच काळांत प्रत्येक गोष्टींत उत्साह वाटायला लागला. सकाळचा सारा वेळ तो माध्यमिकच्या तिसऱ्या यत्तेचा अभ्यास करायचा. न समजलेल्या गोष्टींवर तो टिपणं घ्यायचा. आणि रात्रीं पहिल्या नि दुसऱ्या यत्तेची पुस्तकं चाळत बसायचा. जूनमधें हा ‘अर्धवट’ तुमच्या परीक्षेला बसला आणि त्याला पास करणं तुम्हांला भागच पडलं.

गियानीच्या बाबतींत हें कठिण होतं. तो तुमच्या शाळेंतून आला तो निरक्षर आणि पुस्तकांबद्दलचा तिरस्कार घेऊनच.

अशक्य तें शक्य करायचा प्रयत्न आम्हीं त्याच्या बाबतींत केला. सगळ्या जरी नाहीं तरी कांहीं थोड्या विषयांची आवड त्याला लावणं आम्हांला जमलं. त्याला पास करून माध्यमिकच्या

तिसऱ्या यत्तेंत घालणं आणि त्याचं खूपसं कौतुक करणं एवढंच तुम्हां शिक्षकांकडून आम्हांला हवं होतं. त्याला बाकीच्या विषयांची गोडी लावणं आमच्यावर होतं.

तर उलट तोंडी परीक्षा चालूं असतांना एक शिक्षिका त्याला म्हणाली, "तू खाजगी शाळेंत कशासाठीं जातोस, पोरा? तुला माहित आहे, तुला तर धड बोलतांदेखील येत नाहीं."

"—"

गियानीला नीट, स्पष्ट बोलतां येत नाहीं हें आम्हांलासुद्धां ठाऊक आहेच. याचा दोष आपल्या सगळ्यांकडेच घेऊं या. पण गेल्या वर्षी त्याला शाळेंतून काढून टाकणारे तुम्हीं शिक्षक ह्याला सर्वांत जास्त जबाबदार आहांत.

काय नामी इलाज आहेत तुमचे!

**भाषेबद्दल भेदभाव न करतां** शिवाय शुद्ध भाषा कोणती तें आपण एकदां निश्चित करूं या. गरिबांनींच भाषा निर्माण केल्या आहेत. आणि ते सतत त्यांत भर टाकत असतात. श्रीमंत तिला एका सांच्यांत बसवतात - मग कुणी निराळ्या प्रकारानं बोलायला लागला कीं त्याला ठपका द्यायला किंवा नापास करायला हे मोकळे.

तो लहानगा पिएरिनो - 'पप्पा-ममीचा लाडका' — तो फार छान लिहितो असं तुम्हीं म्हणतां. शंकाच नाहीं. कारण तो तुमचीच भाषा बोलतो. तो तुमच्याच 'जाती'चा आहे. उलट गियानी आपल्या वडलांचीच भाषा लिहितो-बोलतो.

अगदीं लहान असतांना गियानी 'रेडिओ'ला 'रारा' म्हणायचा आणि त्याचे बाबा सांगायचे, "त्याला रारा नाहीं म्हणायचं, 'आराडिओ' म्हणायचं."

आतां शक्य असेल तर गियानीनंहि ‘रेडिओ’ म्हणायला शिकणं चांगलंच कीं! योग्य वेळीं तुमची भाषा त्याच्या फायद्याचीच ठरेल. पण तोंपर्यंत त्याला शाळेंतून काढून नका लावूं.

‘भाषेचे भेदभाव न करतां सर्व नागरिक समान आहेत’ असं घटना सांगतें तें गियानीसारख्याला लक्षांत घेऊनच.

**आज्ञाधारक बाहुलं** पण तुम्हीं घटनेपेक्षांहि व्याकरणाला जास्ती मान देतां. आणि मग गियानी कधींच परत आला नाहीं. आमच्याकडेसुद्धां नाहीं.

तरी तो आमच्या मनांतून कांहीं जात नाहीं. आम्हीं दुरून त्याच्यावर लक्ष ठेवतों. तो आतां कधी चर्चला किंवा कुठल्याहि राजकीय सभेला जात नाही असं आम्हीं ऐकलं. तो एका कारखान्यांत झाडू मारतो आणि मोकळ्या वेळांत एखाद्या कळसूत्री बाहुल्याप्रमाणं ‘चालू’ गोष्टी करत राहतो. शनवारीं नाच, रविवारीं खेळाचं मैदान.

पण तुम्हीं! तो जिवंत आहे याचीहि आठवण तुम्हांला नाहीं.

**इस्पितळ** तुमची-आमची पहिली गांठ पडली ती त्यांच्यामुळं – तुम्हांला नको झालेल्या मुलांमुळं. ह्यांना घेऊन शाळा चालवणं किती कठिण आहे हें आम्हांला पण लवकरच उमजलं. त्यांच्यापासून सुटका करून घेण्याचा जबरदस्त मोह कधींकधीं होतों. पण त्यांच्याशिवाय शाळा ही शाळाच राहणार नाहीं.

आजाऱ्याला नाकारून धडधाकट निरोगी माणसाची देखभाल करणारं इस्पितळ ठरेल तें. आधींच असलेले भेदभाव आणखी पक्के करायचं तें साधन होईल. मग त्यापासून कधींच मागं फिरतां येणार नाहीं.

याला तुमची तयारी आहे का? नाहीं तर त्यांना शाळेंत परत आणा. खनपटीलाच बसा. श्रीगणेशापासून पुन्हां सुरवात करा. तुम्हांला कुणीं वेडं म्हटलं तरीसुद्धां.

वंशवादाचं उपकरण होण्यापेक्षां वेडं म्हणवून घेणं बरं!

## परीक्षा

**चांगल्या लेखनाचे नियम** बार्बियानामधें तीन वर्षं शिकल्यानंतर जूनमधें खाजगी शाळेंतला उमेदवार म्हणून मीं माध्यमिक पदविकेची परीक्षा दिली. निबंधाचा विषय होता : 'रेल्वेच्या वाघिणींचं मनोगत'.

बार्बियानाला मी चांगल्या लेखनाचे नियम शिकलों ते असे :

'सांगण्यासारखं महत्त्वाचं कांहीं असायला हवं. तें सर्वांना किंवा निदान अनेकांना उपयोगीं वाटेल असं हवं. तुम्हीं कुणासाठीं लिहितां आहांत तें लक्षांत घ्या. त्यासाठीं जें उपयोगीं असेल तें सार जमा करा. विषयाचा उलगडा करण्यासाठीं तर्कशुद्ध अशी पद्धत निवडा. प्रत्येक निरुपयोगी शब्द काढून टाका. रोजच्या बोलण्यांत वापरला न जाणारा प्रत्येक शब्द टाळा. वेळेचं बंधन कधींहि घालून घेऊं नका.'

मी आणि शाळेंतले माझे मित्र हें पत्र या पद्धतीनंच लिहीत आहोंत. आणि मी शिक्षक झाल्यावर माझे विद्यार्थी पण याच पद्धतीनं लिहितील अशी आशा मी बाळगून आहें.

**सुरी तुमच्या हातीं** पण निबंधाचा हा विषय समोर असतांना लेखनकलेच्या या साध्यासुध्या पण समर्पक सनातन नियमांचा मला काय उपयोग करतां येणार? प्रामाणिक राहायचं तर मीं

पान कोरंच सोडायला हवं होतं. किंवा तो विषय आणि ज्यानं कुणीं तो निवडला त्याच्यावरहि टीका करायला हवी होती.

पण मी होतों चौदा वर्षांचा. डोंगराळ भागांतून आलेला. अध्यापक-शाळेंत जाण्यासाठीं मला पदवीची जरूरी होती. हा पदवीचा तुकडा माझ्या जीवनाशीं आणि माझ्या माहितीच्या नि जिव्हाळ्याच्या प्रत्येक गोष्टीशीं पार परक्या अशा पांच-सहा लोकांच्या हाती होता. अशा बेजबाबदार लोकांच्या हातांत ही उगारलेली सुरी!

तुम्हांला हव्या असलेल्या पद्धतीनं लिहायचा प्रयत्न मीं केला. त्यांत यश आलं नाहीं हें मला सहजच उमजलं. शिळ्या कढीला ऊत आणण्यांत पटाईत असलेल्या तुमच्या तरुण मंडळींनीं मात्र तावामागून ताव लिहिले असतील.

**सांपळण्यांत पकडण्याचा गंड** फ्रेंचची परीक्षा तर अपवादांनींच ठेंचून भरली होती.

खरं तर परीक्षाच नसाव्यात. पण तुम्हीं त्या घेतल्याच तर किमान त्यांत सचोटी तरी ठेवा. अडचणीदेखील प्रत्यक्ष आयुष्यांत येणाऱ्या अडचणींच्या प्रमाणांतच निवडल्या जायला हव्यात. तुम्हीं वारंवार अवघड प्रश्नच निवडाल तर दुसऱ्याला सांपळ्यांत पकडण्याचा हा गंड तुम्हांला भोंवतो आहे असा त्याचा अर्थ होतो. जणूं तुम्हीं मुलांविरुद्ध युद्धच पुकारलं आहे!

असं कां वागतां तुम्हीं? हें विद्यार्थ्यांच्या भल्यासाठीं आहे का?

**घुबड, गोटे नि पंखे** नक्कींच नाहीं.

फ्रान्समधें गेला तर 'संडास कुठं आहे?' हें पण ज्याला धड विचारतां येणार नाही अशा मुलाला तुम्हीं फ्रेंचमधें 'अ' वर्ग दिलांत.

त्याला फक्त घुबडं, गोटे नि पंखे एवढंच काय तें एकवचनांत किंवा अनेकवचनांत मागतां आलं असतं. सगळे मिळून दोनएकशे शब्द फार तर त्याला माहीत असतील. अवघड म्हणून निवडलेले – रोजच्या वापरांतले नव्हेत.

परिणाम – कांहीं लोक जसा गणिताचा द्वेष करतात तसा हा फ्रेंचचा करायला लागतो.

**उद्दिष्ट** उलट मी ध्वनिमुद्रिकांवरून भाषा शिकलों. पहिल्यांदा सर्वांत उपयोगी आणि सर्वसामान्य वापरांतले शब्द मी विनासायास शिकलों. स्वतःची मातृभाषा जशी सहज शिकावी तसं.

त्या उन्हाळ्यांत मी ग्रेनोबलला एका हॉटेलमधें कपबशा धुण्याचं काम केलं. मला तिथं मुळींच परकं वाटलं नाहीं. युथ होस्टेलमधे युरोप आणि अफ्रिकेमधून आलेल्या मुलांशीं मला सहज बोलतां आलं.

घरीं परतल्यावर मीं एकामागून एक भाषा शिकायचं ठरवलं. खूप भाषा - एकाच भाषेंत पूर्ण प्रावीण्य मिळवण्यापेक्षां खूप भाषा - उत्कृष्ट न आल्या तरीं! म्हणजे मला सर्व प्रकारच्या लोकांबरोबर संवाद साधतां येईल. नवे प्रश्न, नवी माणसं भेटतील. सगळ्यां मातृभूमींच्या पवित्र मानलेल्या सीमांकडे बघून हंसतां येईल.

**साधनं** माध्यमिक शाळेच्या तीन वर्षांमधें आम्हीं केवळ एकाऐवजीं दोन भाषा शिकलों – फ्रेंच आणि इंग्रजी. कुठलीहि चर्चा करण्यासाठीं पुरेसा शब्दांचा साठा आम्हीं मिळवला होता.

व्याकरणाच्या प्रत्येक चुकीशीं आम्हीं घुटमळत थांबलों नाहीं. व्याकरण मुख्यतः लिहिण्यासाठीं असतं. वाचणं, बोलणं

त्याच्याशिवाय-सुद्धां होऊं शकतं. ऐंकून तें हळूंहळूं लक्षांत येतं. नंतर त्याचा सखोल अभ्यास करतां येतो.

आपली स्वतःची भाषा अशीच तर येते. व्याकरणाचा पहिला धडा आपण आठ वर्षांचे झाल्यावर शिकतों. पहिलीं तीन वर्षं लिहिणं-वाचणं झाल्यानंतर मग.

तुमच्या नव्या अभ्यासक्रमांत ध्वनिमुद्रिकांची शिफारस केली आहे. पण आमच्या दिवसभराच्या शाळेंमधें ध्वनिमुद्रिका चांगल्या उपयोगीं पडतात. तिथं दुसऱ्या कामाचा कंटाळा आल्यावर विरंगुळा म्हणून मुलं भाषा शिकतात. दररोजच दोन तास. तुम्हीं करतां तसं आठवड्यांतून फक्त तीन तास नव्हे.

तुमच्या शिकवायच्या पद्धतींत ध्वनिमुद्रिका न वापरणंच चांगलं.

**ल्वार नदीवरले किल्ले** तोंडी परीक्षेच्या वेळीं आम्हांला एक आश्चर्याचा धक्का बसला. तुमचे विद्यार्थी फ्रेंच संस्कृतीच्या ज्ञानाचे अगदीं गड्डेच दिसले. उदाहरणार्थ, ल्वारच्या किल्ल्यांबद्दल ते मोठ्या अधिकारवाणीनं बोलत होते.

नंतर आम्हांला समजलं कीं त्यांनी वर्षभर फक्त याच एका गोष्टीचा अभ्यास केला होता. अभ्यासक्रमांतले कांहीं निवडक वेचे पण त्यांनीं तयार केले होते. ते त्यांना वाचतां येत होते आणि त्यांचं भाषांतर पण करता येत होतं.

कधीं कुणी शाळा-तपासनीस आलेच तर आमच्यापेक्षां त्या मुलांचीच एकदम छाप पडायची. आंखलेल्या अभ्यासक्रमाबाहेर कांहीं विचारायच्या भानगडींत शाळा-तपासनीस पडत नाहींत. खरं तर हें असं फ्रेंच शिकण्यांत कांहीं अर्थ नाहीं, हें तुम्हां दोघांनाहि चांगलं ठाऊक आहे.

मग हें तुम्हीं कुणासाठीं करत असतां? तुम्हीं हें तपासनिसासाठीं करतां. तो शाळेच्या पर्यवेक्षकासाठी करतो. आणि पर्यवेक्षक शिक्षणमंत्र्यासाठीं करतो.

हें तुमच्या शाळेचं सगळ्यांत अस्वस्थ करणारं रूप आहे. उगा आपली शाळा पाहिजें म्हणून शाळा!

**बाराव्या वर्षींच सामाजिक 'शिडी' चढणारे** पण तुमच्या विद्यार्थ्यांचं स्वतःचं ध्येय काय हेंहि एक गूढच आहे. मुळांत तसं कांहीं नसेलच बहुतेक. आणि असलंच तरी अगदीं फालतू असेल.

दिवसरात्र ते अभ्यास करतात केवळ मार्क, अहवाल आणि पदवीसाठीं. या उद्योगांत अभ्यास करत असलेल्या कुठल्याच चांगल्या गोष्टींमधें त्यांना रसच राहात नाहीं. भाषा, शास्त्र, इतिहास - सर्वांचे निव्वळ पास करणारे मार्क बनतात.

त्या कागदांच्या चवडीमागं हांव आहे केवळ वैयक्तिक लाभाची. पदवी म्हणजे पैसा. याचा उल्लेख सहसा कुणी करत नाहीं. पण वरचा मुलामा खडवडून पाहिलं तर हेंच पितळ दिसतं.

तुमच्या शाळेंत विद्यार्थ्याला सुखानं राहायचं असेल तर बाराव्या वर्षापासूनच सामाजिक 'शिडी' चढायच्या मार्गाला त्यानं लागलं पाहिजे. पण या वयांत असे थोडेचजण असतात. म्हणून तुमची बरींच मुलं शाळेचा तिटकाराच करतात. तुमच्या क्षुद्र उद्देशाविरुद्ध दुसरी कोणती प्रतिक्रिया होणार?

**इंग्रजी** पलीकडच्या वर्गात इंग्रजीची परीक्षा सुरूं होती. पुरतं गोंधळून टाकणारी.

इंग्रजी ही सगळ्या भाषांमधें सर्वांत उपयोगी आहे असं मला वाटतं. पण ती तुम्हांला येत असेल तरच! तुम्हीं ती नुकतीच वरवर खरवडायला लागलां असाल तर नाहीं. घुबडं आणि गोटे? या विद्यार्थ्यांना तर 'गुडनाइट' सुद्धां म्हणतां येत नव्हतं आणि ते कोणतीहि भाषा शिकण्याबद्दल कायमचे नाउमेद होऊन गेले.

पहिली परकी भाषा म्हणजे तरुण विद्यार्थ्यांच्या जीवनांतली एक मोठीच घटना असते. तिच्यांत यश मिळायलाच हवं, नाहींतर तापच होईल.

आमचा अनुभव असा आहे कीं इटालियन माणसाला हें यश सुरवातीला फ्रेंचच्या बाबतींतच शक्य आहे. आमच्याकडे जेव्हां जेव्हां फ्रेंच बोलणारा पाहुणा आला, तेव्हां त्याचं बोलणं समजण्याचा आनंद आमच्या कांहीं मुलांना गवसला. त्याच रात्रीं तिसऱ्या एका भाषेच्या ध्वनिमुद्रिका लावायला काढतांना त्यांना आम्हीं पाहिलं आहे.

सगळ्यांत महत्त्वाचीं साधनं आतां त्यांच्या हातीं होती : उद्दिष्ट, आपण वाट काढूं शकूं असा विश्वास, भाषाविषयक प्रश्नांनीं वेधलं गेलेलं मन.

**गणित आणि क्रूर आनंद** परीक्षेंतल्या भूमितीच्या प्रश्नानं नवकलेच्या प्रदर्शनांतल्या एक शिल्पाची आठवण करून दिली. 'अर्धवर्तुळाच्या ३/७ पृष्ठभाग असलेल्या लंबवर्तृळावर एक अर्धवर्तृळाकार ठेवल्यावर बनणारा त्रिमित धनाकार हा –'

पृष्ठभाग मापूं शकणारं एखादं उपकरणच नाहीं. तेव्हां लांबी, रुंदी उंची कळल्याशिवाय पृष्ठभाग मापणं प्रत्यक्ष आयुष्यांत कधीं होतच नाहीं. असा प्रश्न एखादं कुजलेलं मनच घालूं शकतं.

**नवीन लेबलं** सुधारित माध्यमिक शाळांमधून आतां हें दिसणार नाहीं. आतां प्रश्न प्रत्यक्ष उदाहरणावर आधारावे लागतील.

म्हणून यंदा कार्लाला तिच्या परीक्षेंत 'बॉयलर' वर आधारलेला आधुनिक प्रश्न विचारण्यांत आला :

'बॉयलरचा आकार हा एखादं अर्धवर्तुळ लंबवर्तुळावर ठेवून...' पुन्हां एकदां पृष्ठभागच.

केवळ लेबलं बदलून स्वतःला आधुनिक समजणाऱ्या शिक्षकापेक्षां जुन्या पठडीचा शिक्षक पत्करला.

**अर्धवटांचा वर्ग** आमचे शिक्षक जुन्या वळणाचे होते. गंमत अशी कीं त्यांच्या एकाहि विद्यार्थ्याला तो प्रश्न सोडवतां आला नाहीं. पण आमच्या शाळेंतल्या चारापैकीं दोन विद्यार्थ्यांनीं तें गणित बरोबर सोडवलं. परिणाम - अठ्ठाविसांपैकीं सव्वीसजण नापास.

'साऱ्या अर्धवटांचा वर्ग माझ्या गळ्यांत पडला आहे' असं सगळीकडे सांगत ते शिक्षक फिरले.

**पालक संघटना** त्यांना कोण आंवरणार?
मुख्याध्यापक किंवा शिक्षकांच्या सल्लागार-मंडळाला हें करतां आलं असतं. पण त्यांनीं नाहीं केलं.

पालकांनाहि कदाचित् हें करतां आलं असतं. पण जोंपर्यंत त्या रामपुरीवरची तुमची पकड पक्की आहे, तोंपर्यंत ते गप्पच राहतील. म्हणजे एकतर आम्हांला तुमच्या हातांतून त्या सगळ्या सुऱ्या (मार्क, अहवाल, परीक्षा) हिसकून घ्यायला हव्यात किंवा सगळ्या पालकांना संघटित तरी करायला हवं.

आईवडलांची अशी एक छान संघटना - तुम्हांला आठवण करून देण्याकरतां – कीं तुम्हांला पगार आम्हीं देतों. आणि

हा पगार आमची सेवा करण्यासाठीं आहे, आम्हांला शाळेच्या बाहेर हांकलून लावण्यासाठीं नाहीं.

असं झालं तर कदाचित् तुमचं भलंच होईल. ज्यांना कधीं टीका ऐकावी लागत नाहीं ते प्रगल्भहि होत नाहींत. हें आयुष्य आणि त्यांत सतत घडणाऱ्या घटनांशीं त्यांचा संबंधच तुटतो. आणि अशी तुमच्यासारखी केविलवाणी अवस्था होते.

**वर्तमानपत्रं** या पन्नास वर्षांचा इतिहास मला सर्वात चांगला ठाऊक होता. रशियन राज्यक्रांति, फॅसिझम, युद्ध, प्रतिकार, आफ्रिका आणि आशियाची मुक्तता – माझे बाबा आणि आजोबा तर हा इतिहास प्रत्यक्ष जगले आहेत.

माझ्या स्वतःच्या काळचा इतिहासहि मला चांगला ओळखीचा होता. हा इतिहास म्हणजेच बार्बियानामधें अथपासून इतिपर्यंत आम्हीं नेहमीं मोठ्यानं वाचत असलेलं रोजचं वर्तमानपत्र.

परीक्षेसाठीं धोकंपट्टी करतांनाच दररोज आम्हीं एखादा तास तरी वर्तमानपत्र वाचण्यासाठीं बाजूला काढायचों – आमच्या कंजुषीवर मात करून. कारण तुमच्या परीक्षा पास होण्यासाठीं आम्हांला मदत होईल असं त्या पेपरांत कांहीच मिळायचं नाहीं.

जगण्यासाठीं उपयोगी असं तुमच्या शाळेंतून किती थोडं मिळतं हेंच यांत पुन्हां सिद्ध होतं.

म्हणूनच रोजची बातमी आम्हांला वाचलीच पाहिजे. हें म्हणजे ‘तुमच्या त्या गलिच्छ प्रमाणपत्रांनीं अजून आम्हांला जनावर बनवलेलं नाहीं’ असं तुमच्या तोंडावर ओरडून सांगण्यासारखं आहे. पदवी आम्हांला आमच्या पालकांखातर हवी आहे. पण रोजचं राजकारण आणि बातम्या या दुसऱ्यांच्या

दुःखांच्या कहाण्या आहेत. आणि त्या तुमच्या नि आमच्या स्वार्थापेक्षां मोलाच्या आहेत.

**घटना** एका शिक्षिकेनं पहिल्या महायुद्धाआधींच आपले इतिहासाचे धडे थांबवले. जिथं प्रत्यक्ष आयुष्याशीं आमची गांठ शाळा घालून देऊं शकली असती, नेमकी तिथंच ती थांबली. पुऱ्या वर्षांत एकदांसुद्धां वर्गांत तिनं वर्तमानपत्र वाचलं नाहीं.

अजुनी तिच्या डोळ्यांसमोर त्या फॅसिस्ट भित्तिपत्रिका लटकत असाव्यात : 'इथं राजकारणावर बोलूं नये.'

एक दिवस गियानोपेत्रोची आई ह्या शिक्षिकेजवळ बोलत होती : 'दोपोस्कुओलांत जायला लागल्यापासून माझा मुलगा किती सुधारला आहे म्हणून सांगूं! संध्याकाळचा तो घरी वाचत बसलेला मी बघतें.'

'वाचन? तो काय वाचतो ठाऊक आहे तुला? **घटना!** गेल्या वर्षीं तो मुलींच्या विचारांनीं हैराण होता. यंदा ही घटना –'

हें कांहींतरी घाणेरडं पुस्तक असलं पाहिजे अशी त्या बिचाऱ्या आईची समजूत करून दिली गेली. त्या रात्रीं गियानोपेत्रोच्या वडलांनीं त्याला चांगलं बडवून काढावं असा तिचा आग्रह होता.

**व्हिन्सेंझो मोंती** याच शिक्षिकेला आपल्या वर्गाला काय वाट्टेल तें झालं तरी होमरच्या अद्‌भुतकथा शिकवायच्या होत्या. ती होमर शिकवती निदान, तरी एकवेळ ठीक होतं. पण छे, तें होतं मोंतीचं भाषांतर!

आम्हीं बार्बियानामधें तें वाचलंच नाहीं. पण एकदां अगदीं गंमत म्हणून होमरचं मूळ ग्रीक पुस्तक उचलून एका कडव्यांतले सारे शब्द मोजले. होमरच्या शंभर शब्दांना याचे एकशेचाळीस!

प्रत्येक तीन शब्दांतले दोन होमरचे नि एक मोंतीच्या डोक्यांतून निघालेला!

कोण हा मोंती? आम्हांला सांगण्यासारखं जवळ कांहीं आहे असा कुणी आम्हांला शिकायची असलेली भाषाच बोलतो असा कुणी? छे, त्याहूनहि वाईट : स्वतःच्या काळांतसुद्धां वापरांत नसलेल्या भाषेंत लिहून ठेवणारा कुणीतरी.

तुमच्या माध्यमिक शाळेंत नुकत्याच नापास झालेल्या एका मुलाला एक दिवस मी भूगोल शिकवत होतों. त्याला कांहीं म्हणतां कांहीं येत नव्हतं. पण जिब्राल्टरचा उल्लेख मात्र त्यानं 'हरक्यूलसचे स्तंभ' म्हणून अचूक केला.

स्पेनमधें कुठल्या तरी स्टेशनांत तिकिटाच्या खिडकीशीं जाऊन तो तिकिट मागतो आहे अशी कल्पना तरी करतां येईल का तुम्हांला?

**अग्रक्रम कशाला?** शिक्षण जर इतक्या थोडक्या काळांत द्यायचं तर सगळ्यांत तांतडीच्या गरजा लक्षांत घेऊन तशी त्याची आंखणी व्हायला हवी.

डॉक्टरांच्या छोट्या पिएरिनोला परीकथा वाचायला भरपूर वेळ आहे. गियानीला तसा नाहीं. तो पंधराव्या वर्षींच तुमच्या हातून निसटला. तो फॅक्टरींत काम करतो. त्यामुळं ज्युपिटरनं मिनर्व्हाला जन्म दिला कीं मिनर्व्हानं ज्युपिटरला, हें माहींत असायची त्याला गरज नाहीं.

त्याच्या इटालियन साहित्याच्या अभ्यासक्रमांत धातुकामगार संघटनेच्या कराराचा समावेश असता तर चांगलं झालं असतं. बाई, तुम्हीं हा करार कधीं वाचला आहे का? तुम्हांला लाज नाहीं वाटत? हा पांच लाख कुटुंबांच्या जीवनाचा सवाल आहे.

आपण किती सुशिक्षित आहोंत असं तुम्हीं स्वतःलाच सांगत असतां. पण तुम्हीं साऱ्यांनीं तींच तींच पुस्तकं वाचलेलीं आहेत. त्याहून वेगळं कधीं कुणी तुम्हांला विचारतच नाहीं.

**बिचारीं मुलं** व्यायामाच्या परीक्षेंत शिक्षकांनीं आमच्याकडे एक चेंडू फेंकून सांगितलं, 'बास्केटबॉल खेळा.' कसं खेळायचं आम्हांला माहीत नव्हतं. शिक्षकांनीं कींव करत आमच्याकडे पाहिलं : 'बिच्चारीं मुलं!'

ते पण तुमच्यापैकींच. एक ठरीव कर्मकांड पार पाडणंच त्यांच्या लेखीं इतकं महत्त्वाचं होतं.

'ह्यांना कोणतंहि शारीरिक शिक्षण दिलं गेलेलं नाहीं, तेव्हां ह्यांची परीक्षा आतां हिंवाळ्यांत घ्यावी' असं त्यांनीं मुख्याध्यापकांना सांगितलं.

ओकच्या झाडावर आमच्यापैकीं कुणालाहि चढतां आलं असतं आणि एकदां वर चढल्यावर हातांतल्या कुऱ्हाडीनं दोनशे पौंडी फांदीदेखील तोडून नंतर बर्फातून ती ओढत घराच्या पायऱ्यांपर्यंत नेऊन टाकतां आली असती.

फ्लोरेन्समधल्या एका गृहस्थाबद्दल मी ऐकून आहें तो लिफ्टमधून वरच्या मजल्यावर जातो. म्हणजे त्यानं एक महागडी चीज विकत घेतली आणि आपण स्वतःच ती चालवतो असं त्याला वाटतं. त्याला बहुतेक 'शारीरिक शिक्षणां'त तुम्हीं 'अ' वर्ग द्याल.

**म्युगेल्लोंतलं लॅटिन** बार्बियानामधें आम्हीं फारच थोडं लॅटिन शिकलों. नवीन कायदा करून लोकसभेनं तें गाडून टाकलं होतं. त्याच वर्षीपासून केंब्रिज आणि ऑक्सफर्डमधें पण प्रवेश मिळवण्यासाठीं लॅटिनची आवश्यकता राहिली नव्हती.

पण म्युगेल्लोमधल्या शेतकऱ्यांना मात्र लॅटिन शिकणं अगदीं भाग होतं. मोठ्या धर्मोपदेशकांप्रमाणं दिसणारे गंभीर शिक्षक बाकांमधून फिरत होते. विझलेल्या दिव्याचे सच्चे रक्षक!

माणसाच्या या जातीकडे मी डोळे विस्फारून एकटक पाहात राहिलों. माझ्या आयुष्यांत त्यांच्यासारखं कांहीं मीं पाहिलेलंच नव्हतं.

## नवीन माध्यमिक शाळा

**तुमच्या हातीं** नव्या माध्यमिक शाळेसाठी आंखलेले अभ्यासक्रम आणि केलेला नवा कायदा आम्हीं वाचत होतों.

वाचलं त्यांतलं बरंचसं आम्हांला आवडलं. विशेष म्हणजे नवी माध्यमिक शाळा प्रत्यक्ष आहे, सार्वत्रिक आहे, सक्तीची आहे, नि उजव्या गटांना ती आवडलेली नाहीं. हें सर्व खरंच आहे.

पण दुर्दैव एवढंच कीं ती परत तुमच्याच हातीं आली आहे. पुन्हां पूर्वीसारखीच तुम्हीं त्यांत वर्गभेदाची जाणीव जोपासणार आहांत का?

**वेळापत्रक** जुन्या माध्यमिक शाळेनं आपलं वेळापत्रक आणि शाळेचे तास थोडे नि सुट्टया लांब यांमधून वर्गभेद अगदीं तीक्ष्ण केले होते. हे नव्या पद्धतींतहि बदलेलं नाहीं. ती श्रीमंतांसाठींच बेतलेली शाळा राहिली आहे. त्यांना त्यांची सारी संस्कृति घरबसल्या मिळते नि शाळेंत फक्त ते पदव्या गोळा करायला येतात.

नव्या कायद्याच्या तिसऱ्या कलमांत थोडा आशेचा किरण आहे. आठवड्याला किमान दहा तास चालणाऱ्या ‘दोपो-स्कुओला’ची स्थापना करावी असं त्यांत म्हटलेलं आहे. पण

त्याच कलमांत खालींच यांतून बाहेर पडण्यासाठीं तुम्हांला एक पळवाट पण ठेवली आहे : स्थानिक परिस्थिति कशी आहे तें अजमावूनच दोपोस्कुओला चालूं केली जाईल. म्हणजे निर्णय पुन्हां तुमच्याच हातांत!

**परिणाम** नव्या माध्यमिक शाळेच्या पहिल्या वर्षात फ्लोरेन्स प्रांतामधल्या एकावन्नपैकीं पंधरा शहरांत दोपोस्कुओला सुरूं झाली.

दुसऱ्या वर्षी ती फक्त सहाच शहरांतून राहिली. ७.१ टक्के विद्यार्थ्यांसाठीं. गेल्या वर्षी अवघ्या २.९ टक्क्यांसाठीं फक्त पांच शहरांत ती चालूं होती.

या घडीला सरकारी शाळापद्धतींत दोपोस्कुओला अस्तित्वांतच नाहीं.

तुम्हीं पालकांना दोष देऊं शकत नाहीं. दोपोस्कुओला सुरूं करायला तुम्हीं उत्सुक नाहीं हें त्यांच्या लक्षांत आलं. नाहींतर ते इतके उत्सुक आहेत कीं दिवसभर दोपोस्कुओलांतच काय झोंपायलासुद्धां आपल्या मुलांना तुमच्याचकडे पाठवायला ते तयार झाले असते.

**विरोधी** व्हिच्चिओच्या महापौरांनीं दोपोस्कुओला सुरूं करण्यापूर्वी सरकारी शाळांतल्या शिक्षकांचं मत विचारलं. पंधरा पत्रं आलीं. तेरा प्रतिकूल आणि दोन अनुकूल. दोपोस्कुओला नीट चांगली चालवली जात नसेल तर कशीतरी चालवण्यापेक्षां ती नसलेलीच अधिक बरी असा त्या पत्रांचा कायम सूर.

इकडे शहरीं मुलं रस्ते आणि गुत्त्यांतून घुटमळत राहिलीं होतीं, तर खेड्यांतलीं पुन्हां परत उघड्यावर – शेतांत गेली होतीं. अशी परिस्थिति असतांना कशीहि दोपोस्कुओला चालली

असती. कांहींहि चालेल. अगदीं कांहींच नसण्यापेक्षां तुमची वांझोटी शाळासुद्धां चांगलीच.

माझा तुम्हांला एक सल्ला आहे. दोपोस्कुओलाला तुमचा विरोध असलाच तरी तो कुणाला कळू देऊं नका. लोक जरा खुनशी असतात. त्यांना वाटायचं, दुपारच्या वेळीं बड्यांच्या घरीं शिकवण्या करणं आणि जरा जास्तीचा पैसा मिळवणं हेंच तुम्हांला हवं आहे.

**दक्षिण अफ्रिका** कांहीं लोक समानतेचा द्वेष करतात. फ्लोरेन्समधल्या एका मुख्याध्यापकानं एका विद्यार्थ्याच्या आईला सांगितलं, "बाई, तुम्हीं कांहीं काळजी करूं नका. तुमच्या मुलाला आमच्याकडे पाठवा सबंध इटालीमधें आमची शाळा समानतेचं कमींत कमी पालन करणारी आहे."

'सार्वभौम जनते'ची फसवणूक करणं अगदींच सोपं आहे. फक्त 'चांगल्या' मुलांसाठीं खास वर्ग सुरूं केले कीं झालं. त्यांची व्यक्तिशः ओळख असण्याची गरज नाहीं त्यासाठीं. त्यांचीं अहवालपत्रं, त्यांचं वय, त्यांचा पत्ता (शेतवाडी का शहर), जन्मठिकाण (दक्षिण का उत्तर), वडिलांचा व्यवसाय आणि वजनदार संबंध आणि नाती यांच्यावर नजर टाकली तरी पुरे!

अशानं दोनतीनच काय, अगदीं चार माध्यमिक शाळा एकाच शाळेंत एकावेळीं एकत्र राहूं शकतील.

'अ' तुकडी हा जुन्या धर्तीचा माध्यमिक वर्ग - सुरळीतपणं चालणारा. ही तुकडी मिळवण्यासाठीं चांगलेचांगले शिक्षक झगडतील.

या वर्गांत मुलाला प्रवेश मिळावा म्हणून कांहीं प्रकारचे पालक वाटेल तेवढा त्रास घेतील. 'ब' तुकडी इतकी चांगली नसेल. याच उतरत्या क्रमानं खालचे वर्ग.

**पुढं ढकलणं कर्तव्यच** पण हे सारे सन्माननीय लोक आहेत. मुख्याध्यापक नि शिक्षक कांहीं स्वतःच्या फायद्यासाठीं हें करत नाहींत. ते हें करताहेत संस्कृतीच्या भल्यासाठीं!

अगदीं पालकसुद्धां स्वतःसाठीं म्हणून कांहीं करत नाहींत. आपल्या मुलाच्या भवितव्यासाठीं ते हें सारं करतात. स्वार्थीपणानं आपलंच घोडं पुढं दामटणं बरोबर नाहीं. पण मुलाच्या भल्यासाठीं असं करणं हें पवित्र कर्तव्यच आहे. हें केलं नाहीं तर त्यांना लाजिरवाणं वाटेल.

**निःशस्त्र** सर्वांत गरीब पालक असलं कांहीहि करत नाहींत. काय चाललं आहे याचा त्यांना अंदाज पण नसतो. मग शंका कुठली? उलट त्यांनीं नवव्या वर्षींच शाळा सोडलेली असते.

सगळं कांहीं बरोबर चालत नसेल तर त्यांच्या मुलाचं शिक्षणांत डोकं नाहीं हें उघड आहे : "शिक्षकदेखील असंच म्हणाले. अगदीं मला गृहस्थ. त्यांनीं मला बसायला सांगितलं. प्रगतिपुस्तक दाखवलं. आणि लाल खुणांनीं भरलेला परीक्षेचा निकाल. आपल्या नशिबांतच हुशार मुलगा नव्हता झालं! आपल्या-सारखाच तो पण शेतांतच खपणार."

## आंकडेवारी

**राष्ट्रीय पातळीवर** आतां तुम्हीं कदाचित् आक्षेप घ्याल कीं 'तुम्हीं शिकलांत त्या शाळा भलत्याच गचाळ होत्या त्याला

आम्हीं काय करणार?’ तुम्हीं असंहि म्हणाल कीं ‘दुसऱ्या शाळांच्याकडून आमच्याकडे आलेले जे अहवाल आहेत तेसुद्धां असेच खिन्न करणारे आहेत.’ शिवाय आमच्याइतकींच खरीं पण बरोबर उलट निष्कर्ष निघणारी कैक उदाहरणं तुम्हांला ठाऊक असतील.

जाऊं द्या, आपण सगळेच हा हळवेपणा सोडून देऊन शास्त्रशुद्ध विचार करूं या.

आंकडे घेऊनच सुरवात करूं या.

**शिकायला नालायक** आंकडेवारी गोळा करायचं काम गियांकार्लोनं स्वतःकडे घेंतलं. तो पंधरा वर्षांचा आहे. तुम्हीं ज्यांना शिक्षण घ्यायला नालायक ठरवलंत अशा अनेक खेडवळ मुलांपैकींच तो एक.

आमच्याकडे त्याचं सगळं सुरळीत चाललं आहे. गेले चार महिने या आकड्यामधेंच डोकं खुपसून तो बसला आहे. आतां त्याला गणितसुद्धां रुक्ष वाटत नाहीं.

हा जों शैक्षणिक चमत्कार त्याच्या बाबतींत आम्हीं घडवून आणला त्यामागं एक अगदीं साधी योजना आहे.

आम्हीं त्याला एका प्रचंड ध्येयासाठीं अभ्यास करण्याची संधी दिली : आपल्यासारखीच नापास झालेलीं १० लाख ३१ हजार मुलं आपल्याला भावासारखींच आहेत, तेव्हां नीट आंकडेबिकडे गोळा करून आपल्याला ह्या सगळ्यांच्या वतीनं तुमच्यावर सूड उगवायचा आनंद चाखतां येईल.

**आगाऊ शिक्षक** कैक आंकडेवाऱ्यांची जमवाजमव, शाळांत घातलेले खेटे, पत्रांनीं केलेल्या चौकश्या, आणखी माहिती

गोळा करण्यासाठीं शिक्षण मंत्रालयांत आणि सेंट्रल इन्स्टिटट्यूट ऑफ स्टॅटिस्टिक्समधें घातलेल्या खेपा आणि गणकयंत्राशीं मोजलेले दिवस न् दिवस!

आमच्याआधीं इतरांनींही असं संशोधनं केलेलं असेल तर आपले निष्कर्ष साध्या भाषेत मांडणं त्यांना जमलेलं नाहीं.

त्यांचे निष्कर्ष आम्हींहि वाचलेले नाहींत कीं तुम्हीं शिक्षकानींहि!

म्हणून शाळांमधून खरोखरीं काय चालतं याची तुम्हां कुणालाच स्पष्ट कल्पना नाहीं.

आमच्या शाळेला भेट द्यायला आलेल्या एका शिक्षकापाशीं आम्हीं हें म्हटलं तर त्याच्या वर्मावरच आघात झाला. “मी गेलीं तेरा वर्षं शिकवतों आहें. हजारों विद्यार्थी नि पालकांना मी भेटलों आहें. तुम्हीं गोष्टी बाहेरून बघत असतां. शाळेंत कायकाय अडचणी येतात याचं सखोल ज्ञान तुम्हांला नाहीं.”

म्हणजे सखोल ज्ञान काय तें त्यालाच आहे - आधींच निवड केलेलीं मुलंच तेवढीं ओळखतो त्याला! अशीं जितकीं जास्त मुलं तो ओळखतो, तितका तो जास्ती घसरतच जातो.

**एक गियानी म्हणजे लाखों गियानी** शाळांपुढं खरा प्रश्न एकच आहे - गमावून टाकत असलेलीं मुलं - गियानी, कैक गियानी.

तुमची सक्तीची शाळा दरवर्षी ४ लाख ६२ हजार मुलं गमावते. हें खरं असलं तर इथं नालायक कुणी असेल तर ते इतकीं मुलं गमावणारे आणि त्यांना परत शोधायला न जाणारे तुम्हीं लोकच. आम्हीं नव्हे. आम्हीं त्यांना शेतांतून, कारखान्यांतून शोधून काढतों आणि अगदीं जवळून ओळखतों.

गियानीच्या आईला वाचतां येत नाहीं. पण शाळेचे प्रश्न काय आहेत तें तिला उमजतं. आणि मुल नापास झाल्यावर त्याला जें भोगायला लागतं तें ज्यानं पहिलं आहे, त्यालाच कळतं आणि ही आंकडेवारी पाहायची मेहनत घ्यायलां तयार असलेल्या कुणालाहि तें कळेल.

मग हे आंकडे तुमच्या तोंडावर किंचाळून सांगायला लागतील - असे लाखों गियानीं आहेत आणि तुम्हीं एक मूर्ख तरी आहांत, नाहीं तर दुष्ट तरी.

**पिरॅमिड** आंकडेशास्त्रावर आधारलेले तक्ते समजायला कदाचित् कठिण जाईल. इथं त्यांना आम्हीं माणसाच्या पातळीवर आणलं आहे. एका प्रेमळ नजरेंत सामावेल असा हा शाळेचा वर्ग!

आम्हीं इथं पिरॅमिडची आकृति ठेवली आहे. नुसतं नजरेला पडलं तरी परिणाम करून जाईल असं तें प्रतीक आहे.

कुऱ्हाडीच्या घावांनीं छिलून काढल्यासारखी दिसते ही आकृति. प्राथमिक शाळेंनंतरचा प्रत्येक आघात म्हणजे ‘समान’ होण्यापूर्वींच कामावर जावं लागलेला मुलगा.

**१९५१ च्या वर्गाचा घेतलेला भाग** मात्र या पिरॅमिडमधें सहाव्या वर्षापासून तिसाव्या वर्षापर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना एकाच कागदावर ठेवावं लागतं आहे, ही उणीव आहे. नवे-जुने सारे नापास झालेले एकत्रच.

सक्तीच्या शिक्षणाच्या आठहि वर्षांमधें मुलांच्या एकाच वर्गाचा आपण मागोवा घेत जाऊं.

अलीकडच्या माहितीच्या अभावीं १९५१ मधें जन्मलेल्या मुलांचा आढावा आपण घेतों आहोंत.




आकृति १

**१९६३-६४ मधें भरती झालेलीं मुलं**

**पहिलं वर्ष** ऑक्टोबरमधल्या शाळेच्या पहिल्या दिवसाचा पहिल्या यत्तेचा वर्ग. बत्तीस विद्यार्थी दिसताहेत. एकदम पाहिलं तर सगळे सारखेच वाटतील. प्रत्यक्षांत मात्र त्यांच्यापैकीं पांच पुन्हांपुन्हां परीक्षा देत राहतील.

सात वर्षांचीं, पण आत्तांच 'मागासलेला' असा शिक्का बसलेली हीं मुलं. हा शिक्का पुढं माध्यमिक शाळेंत त्यांना महागांत जाणार आहे.

**गमावलेलं उत्पन्न** शाळेची पहिली सहामाही सुरूं होण्याआधींच तीन मुलं गायब झालीं. शिक्षिका त्यांना ओळखत नाहीं. पण आधींतीं शाळेत येत होतीं. आपलं पहिलंच अपयश त्यांनीं चाखलं आणि मग तीं परत आलींच नाहींत.

तीं परत आलीं असतीं तर याच शिक्षिकेच्या वर्गांत असतीं. म्हणजे एका परीनं तिनं त्यांना गमावलं आहे – कुणी आपलं उत्पन्न गमावतो तसंच!

पुढल्या येणाऱ्या सर्व वर्षांत हीच कथा घडत राहते. हलकटपणानंच वागायचं ठरवलं तर दरवर्षीं गमावल्या जाणाऱ्या मुलांची संख्या आम्हांला दुप्पट करतां येईल. कांहीं तुम्हीं हुसकून लावलेलीं, आणि कांहीं पुन्हां त्याच वर्गांत बसवल्यामुळं गायब झालेलीं.

खरं तर ही मोजदाद तुम्हींच करायला हवी.

**चुकार मुलं** शाळेला कधीं आलींच नाहींत अशा मुलांना आम्हीं यांत धरलेलंच नाहीं. राष्ट्रीय पातळींवर यांची आंकडेवारीच गोळा केलेली नाहीं. अशीं थोडीफार तरी नक्कींच आहेत. पण म्युगेल्लो विभागांत मात्र गियांकार्लोला असा एकहि सांपडला नाहीं.

तें कांहीं असो, हें खापर कांहीं तुमच्यावर नाहीं फोडतां येणार. यांत दोषी आहेत ते दुसरेच! सर्वांत जास्त धर्मोपदेशक – त्यांना आपला टापू चांगला माहीत आहे आणि त्यांना पालकांशीं बोलतां आलं असतं किंवा शाळाधिकाऱ्यांना त्या मुलांची नांव देतां आलीं असतीं – पण त्यांनीं ह्यापैकीं कांहींच केलं नाहीं.

**नापास** शाळेच्या दोन वर्षांच्या पहिल्या सत्रांत ह्या साऱ्या मुलांना वर चढवावं असं २४ डिसेंबर १९५७ चा कायदा शिक्षकांना सांगतो. पण कायदा धुडकावून शिक्षिकेनं जूनमधें सहा मुलांना नापास केलं!

आमची ही तरुण शिक्षिका 'सार्वभौम जनतेचा' हुकूम मानत नाहीं. ती त्यांना नापास करते आणि सुट्टी घालवायला समुद्रकिनारीं निघून जाते!

**आंधळा नेम** एखाद्याला नापास करणं हे झाडाझुडपांत बंदूक झाडण्यासारखंच आहे. कदाचित् मुलगा सांपडेल, कदाचित् ससा. वेळ येईल तेव्हां कळेलच.

आपण काय केलं आहे तें पुढल्या ऑक्टोबरपर्यंत तुम्हांला कळत नाहीं. तो कामाला लागला का पुन्हां शाळेंत त्याच यत्तेंत आला? त्यानं परत तोच अभ्यास केला तर त्याला त्यांतून कांही मिळेल का? अभ्यास पुढं सुरूं ठेवण्यासाठीं कांहीं आधार त्याला हातीं लागेल का? का आपल्याजोगता नसलेला अभ्यास करतच तो कसातरी वाढेल?

**दुसरं वर्ष** पुढल्या ऑक्टोबरांत सात-आठ वर्षांच्या या मुलांच्या शिक्षिकेला आपल्या वर्गांत पुन्हां बत्तीसच मुलं दिसतात. त्यांत सव्वीस ओळखीचे चेहरे. आणि तिला आपल्या या मुलांमधें आलं कीं बरंच वाटतं. तिला त्यांची माया लागलेली असते.

थोड्या वेळानं सहा विद्यार्थी नवीन तिला दिसतात. पांच पुन्हां याच वर्गांत राहिलेले. आणि त्यांतला एक तर आधींहि दोन वर्षे याच वर्गांत होता. आतां तो जवळजवळ नऊ वर्षांचा असतो.

सहावा नवा चेहरा आहे डॉक्टरांच्या मुलाचा - पिएरिनोचा. पिएरिनो हें दरवर्षी शाळेची पहिली यत्ता गाळून एकदम दुसरींत बसणाऱ्या ३० हजार मुलांचं प्रतीक.

**पिएरिनो** डॉक्टरांचं घराणं पिढीजातच 'पॉवरफुल' आहे. पांच वर्षांचा असल्यापासूनच पिएरिनोला लिहितां येत होतं. त्याला पहिल्या यत्तेंत बसण्याची गरज नाहीं. सहा वर्षांचा झाल्यावर तो एकदम दुसऱ्या यत्तेंत येतो. आणि छापील पुस्तकासारखंच तो बोलतो.

त्याच्यावरसुद्धां शिक्का बसलेला आहेत - पण निवडक वर्गाच्या खुणेचा!

**कडू घांस** नापास झालेल्या सहापैकीं चार पुन्हां पहिल्या यत्तेंत आहेत. त्यांना शाळेनं गमावलेलं नाहीं, पण त्यांच्या वर्गमित्रांनीं गमावलं आहे.

शिक्षिकेला त्यांची विशेषशी काळजी नाहीं. कारण शेजारच्या दुसऱ्या शिक्षिकेच्या वर्गांत तीं व्यवस्थित आहेत हें तिला माहीत आहे. कदाचित् ती त्यांना एव्हांना विसरलीहि असेल.

तिच्या लेखीं बत्तीसांमधला एक मुलगा हा एवढासा अंश - १/३२. पण मुलाच्या लेखीं शिक्षिका कितीतरी जास्ती असते. त्याला फक्त एकच शिक्षिका असते. आणि तिनंच त्याला बाहेर काढलेलं असतं.

बाकीचीं दोन परतून शाळेंत आलींच नाहींत. तीं शेतांत कामावर लागलीं. आपण खात असलेल्या प्रत्येक घांसांत आतां त्यांच्या 'निरक्षर' घामाचा थेंब आहे.

**आया** तुमची शाळा हा काय प्रकार आहे हें ह्या सहा आयांना केव्हांच कळून चुकलं आहे. चारजणींनीं आपल्या मुलांनां त्यांचे वर्ग आणि मित्र यांमधून मुळासकट उपटून टाकलेलं पाहिलं आहे. आपल्याहून लहान वर्गमित्रांतच वाढण्यासाठीं हद्दपार केलेले.

दोघीनीं तर आपलीं मुलं या सगळ्यापासून कायमचीं तुटलेलीं पाहिलीं आहेत.

आया म्हणजे संत नव्हेत. आपल्या उंबरठ्याबाहेरचं त्या पाहात नाहींत. हा मोठा दोष आहे. पण त्यांचीं मुलं उंबरठ्याच्या त्याच बाजूला राहात असतात. हें विसरणं ह्या आयांना कधीच शक्य नाहीं.

**धर्मोपदेशक आणि वेश्या** उलटपक्षीं विसरण्यासाठीं शिक्षिकांना कितीतरी सबबी मिळत असतात. त्या फक्त अर्धवेळ आया असतात. आतां हजर नसलेल्या त्या मुलाचा दोष एवढाच कीं तो तिथं नसतो. त्याची आठवण म्हणून त्याच्या जुन्या डेस्कावर खरं तर क्रूस किंवा शवपेटीच हवी.

त्याऐवजीं एक नवा विद्यार्थी तिथं बसतो. आधींच्यासारखंच एक बिचारं! आणि शिक्षिकेला. तें एव्हांना आवडायलासुद्धां लागलेलं असतं.

शिक्षक हे धर्मोपदेशक आणि वेश्यांसारखेच असतात. भेटेल त्या प्रत्येकाच्या प्रेमांत त्यांना ताबडतोब पडलंच पाहिजे. नंतर त्यांच्यासाठीं खंत करायला त्यांना वेळ नसतो. सबंध जग म्हणजे एक मोठ्ठं कुटुंब आहे. आणि ज्यांची सेवा करावी असे हवे तेवढे असतातच.

आपल्या उंबरठ्यापलीकडचं पाहूं शकणं केव्हांहि उत्तमच! पण आपण एखाद्या मुलाला त्या उंबरठ्याबाहेर हुसकावून लावलेलं नाहीं ना याची खात्री हवी.

**समतेचा फक्त एक अंश** प्राथमिक शाळेचीं पांच वर्षं पुरीं होईतो अकरां मुलं शाळेमधून नाहीशीं झालेलीं असतात. आणि याचा दोष शिक्षकांकडेच जातो. 'शाळा सर्वांना खुल्या आहेत. सर्व नागरिकांना शाळेच्या आठ यत्ता शिकण्याचा अधिकार आहे. सर्व नागरिक समान आहेत.' – पण त्या अकराजणांचं काय?

त्यांच्यापैकीं दोन कोणत्याच बाबतींत समान नाहींत. सहीच्या जागीं ते अंगठा उठवतात. या अकरांपैकी एकाला एक-अष्टमांश समानता आहे - त्याला सही करतां येते. इतरांना दोन-तीन चार किंवा पांच-अष्टमांश समानता मिळाली आहे. त्यांना अक्षरं लावतां येतात. पण वर्तमानपत्रंसुद्धां समजत नाहीं.

**कुटुंबभत्ते** यांच्यापैकीं एकहिजण श्रीमंत आईबापांचा मुलगा नाहीं. हें सारंच इतकं उघड आहे कीं आम्हांला हंसूंच लोटतं.

हल्लीच कुठं शेतकरी कुटुंबांना आर्थिक साहाय्य मिळायला लागलं आहे. प्रत्येक मुलामागं दररोज ५४ पैसै.* कामगारांना दररोज १८७ पैसे.

शिक्षिका स्वतः कायदे बनवत नाहीं हें खरंच. पण ते असे आहेत हें तिला माहीत असतं. ज्या ज्या वेळीं ती एखाद्या

---

* खरं तर लिरा. १ लिरा म्हणजे आपला साधारण १ पैसा. हा भत्ता फक्त कामाच्या दिवसांसाठींच मिळतो, आणि गरिबांच्या मुलांना तर रविवारीदेखील जेवायची खोड असते.




आकृति २
**पालकांचा व्यवसाय**

गरीब मुलाला नापास करते, तेव्हांतेव्हां ती त्याला शाळा सोडून जाण्याच्या मोहांत पाडत असते. श्रीमंतांचं असं होतं नाहीं.

**शेतकरी** गरीब शेतकरी आणि शेतमजूर या दोघांच्याहि मुलांवर शाळा सोडून कामावर जाण्याच्या मोहाचं दडपण येतं. वेगवेगळ्या वयांत हा मोह त्यांना खेचून नेतो. प्राथमिक शाळेच्या

पांच वर्षांत कामावर लागलेलीं हीं अकरा मुलं सात ते चौदा या वयांतलीं होती.

तीं बरींचशीं शेतकरी कुटुंबांतलीं किंवा एकाकी राहणाऱ्या जमातींमधलीं होतीं. तिथं अगदीं लहानांतल्या लहानासाठीं पण कांहीं-ना-कांहीं काम असतंच.

**वेळेआधींच वाढलेले बाप्ये** सरकारला या मुलांचा केव्हांच विसर पडला आहे. त्यांची आतां विद्यार्थी म्हणून नोंद नाहीं. पण ते अजून कामगार म्हणून पण नोंदलेले नाहींत. तरीसुद्धां ते काम करताहेत. आणि हे पुढचे दोन कायदे ताडून पाहा आणि मग प्रत्यक्षांत काय घडलं आहे हें – मान्य नका करूं वाटल्यास पण - बघून तरी घ्या.

'बाल-कामगारांच्या रक्षणासंबंधीं'चा २० जानेवारी १९६१ चा कायदा १५ पेक्षां कमी वयाच्या मुलाला कामाला लावायची मनाई करतो. हा कायदा शेतीकामाला लागूं नाहीं. अर्थातच या कनिष्ठ वर्गाला मुलं अशीं कधीं नसतातच. वेळेआधींच आम्हीं बाप्ये बनतों.

तर राज्य कामगार विमा संस्थेंच्या २०५ व्या कलमानुसार शेतमजुराला अपघाताच्या भरपाईची तरतूद बाराव्या वर्षापासून केलेली आहे. म्हणजे आम्हीं या वयापासून काम करतों हें ह्यांना ठाऊक असल्याचंच सिद्ध होतं.

**गूढ** आकृति १ मधल्या त्या पिरॅमिडकडे पाहिलं तर प्राथमिक शिक्षिका इतकीं मुलं गमावत असली तरी तिला थोडंसं श्रेय द्यावंच लागतं. या पिरॅमिडला खरा आकार माध्यमिक शाळेंतच यायला लागतो.

प्राथमिकच्या पहिल्या यत्तेंत या शिक्षिकेचे बत्तीस विद्यार्थी होते. पांचव्या यत्तेंत तिच्याजवळ अट्ठावीस विद्यार्थी आहेत. वरवर पाहता तिनं फक्त चारच विद्यार्थी गमावले.

पण प्रत्यक्षांत तिनं गमावले आहेत वीस. बत्तीस विद्यार्थ्यांच्या वर्गांत तिनं वीस गमावूनसुद्धां अट्ठावीस कसे उरतात हें कोडंच आहे याचा थोडा उलगडा करायला हवा.

**तळं** कुठल्याहि नकाशावर एखादं तळं पाहा. त्यांत इतकं पाणी दिसतं! पण खरं पाहिलं तर ओढ्यानं जेवढं पाणी त्याला पुरवलं असेल तेवढंच त्यांत असतं. पाण्याचा ओघ मंदावला आहे इतकंच. बरीच जास्त जागा व्यापण्यात त्याचा खूप वेळ जातो. वाट सांपडली कीं पुन्हां हें पाणी धांवायला लागतं. आणि तो पूर्वी होता तसाच ओढा आहे हें आपल्याला दिसतं.

प्राथमिकचीं पांच वर्षे म्हणजे हें तळं. दरवर्षी पास होत जाणारा मुलगा पांच डेस्कं अडवतो. तो नापास होऊन पुन्हां त्याच यत्तेंत बसला कीं सहा-सांत-आठ डेस्कसुद्धां अडवतो. तो ‘लाडका’ पिएरिनो - त्याला फक्त चारच डेस्क लागतात.

तुम्हीं विद्यार्थ्यांना नापास करणं थांबवाल त्या क्षणीं दाटीवाटी झालेल्या वर्गांचा प्रश्न पण सोडवल्यासारखं होऊन जाईल.

**भटके** असे सतत नापास होणारे गियानी म्हणजे एका शिक्षिकेनं आपल्या सहकाऱ्यांकडे लोटून दिलेला कचरा. पण करावं तसं भरावं. शेजारच्या वर्गांतल्या बाई पण तुमच्याकडे तितकाच कचरा आणून टाकतात.

गोळाबेरीज अशी - पांच वर्षांच्या या अवधींत अठ्ठेचाळीस मुलं या शिक्षिकेच्या ताब्यात होतीं. त्यांतलीं तेवीस तिनं पुढं

सोंपवलीं. बाकीचे एकोणतीस गियानी तिच्या वर्गात आले न् गेले - आपली कांहीं खूणसुद्धां न ठेवतां. सुरवातीला तिच्याकडे सोंपवलेल्या बत्तीस मुलांपैकीं फक्त एकोणीस उरले.+

**वाढीला मनाई** नापास करून चुकीच्या वर्गांतून डांबलेल्या या अठरा मुलांचं झालेलं नुकसान माध्यमिक पातळीवर आणखीच गंभीर होतं. ते वयानं वाढलेले असतात - आणि वाढीला तर मनाई आहे!

जोंपर्यंत फक्त पांचच यत्ता सक्तीचं शिक्षण होतं तोंपर्यंत परिस्थिति वेगळी होती. सहा न् पांच अकरा होतात. कायद्यानं मानलेलं वय होईपर्यंत दोन-तीन वर्षं विद्यार्थ्याला त्या यत्तेंत काढायला मिळत होतीं. पण आज सहा न् आठ* चौदा होतात. आणि कामाचा परवाना पंधराव्या वर्षी मिळतो.**

**नापास व्हायला वेळ नाहीं** वरवर बघतांना वाटेल कीं एकदां नापास होण्याइतका वेळ आहे. पण पहिल्या यत्तेंतल्या या मुलांचा जन्म कोणत्या महिन्यांत झाला तें आपण पहावं. या

---

\+ ११ कामावर गेलेले + १८ नापास होऊन परत त्याच वर्गात बसलेले = २९ वर्गांनं गमावलेले + १९ पहिल्या वर्षांतून तगलेले = ४८.

* सहाव्या वर्षी मुलं शाळेंत येतात. आठ वर्ष सक्तीच्या शिक्षणाचीं.

** हेंहि जरा नीट पाहिलं पाहिजे. कांहींजण तेरा-चौदाव्या वर्षीसुद्धां बेकायदेशीरपणदेखील काम मिळवूं शकतात. कधींकधीं तर 'कायदेशीरपणं' देखील. आम्हीं तपासून बघितलेल्या वर्षांत खास परवाना घेऊन काम करणारीं १० ते १४ वर्षे वयाचीं १ लाख २९ हजार मुलं आम्हांला आढळलीं.

गटांतला सगळ्यांत मोठा मुलगा आहे जानेवारीमधला. तो पावणेसात वर्षांचा आहे.

सगळ्यांच्या तारखा तपासल्या तर लक्षांत येईल की यांतलीं ३/४ मुलं पहिलींत येतात तेव्हांच सहा वर्षांहून मोठीं असतात.

तेव्हां त्यांना एकदासुद्धां नापास होण्याइतका अवधि नसतो.

**नापास करण्याचा निर्धार** कुणालातरी नापास करण्याच्या निर्धाराला शिक्षिका बळी पडते तेव्हां तो तिनं श्रीमंतांच्या मुलांवर भागवून घ्यावा.

मला पालकांबरोबर करार करायला आवडेल. पिएरिनो अजून इतका लहान आहे! समज येण्याआधींच त्याला अनेक पर्यायांतून निवड करावी लागेल. तर डॉक्टर, तुम्हांला काय वाटतं, त्याला एक वर्ष मागं ठेवावं का?

**बालिश** पण बाईंचं मत निराळं असतं. पिएरिनोला नेहमींच पास केलं जातं. हें विचित्र आहे. पिएरिनो इतका लहान आहे! मानस शास्त्रज्ञ सांगतील कीं तो गोत्यांत येईल. हासुद्धां त्या पिढीजात 'पॉवर'चाच प्रताप!

नवव्या वर्षी पिएरिनो १० ते ११ वर्षं वयाच्या मुलांच्या वर्गांत येतो. त्यानं आपला सारा वेळ स्वतःपेक्षां प्रौढ मुलांमधेंच घालवला आहे. त्यामुळं त्याची समजूत अधिक वाढली असं नाहीं. पण प्रौढाशी वागण्याचं कसब त्याला पढवलेलं आहे. तुमच्याबरोबर वागायला त्याला आरामांत जमतं.

उलट गियानी शाळेंत नेहमींच आपल्यापेक्षां लहान मुलांच्या बरोबर असतो. तो कधींकधीं दादागिरी करतो त्यांच्याशीं. पण आपल्यापेक्षां मोठ्या माणसापुढं तो नेहमीच तोंड बांधून असतो.




आकृति ३

**माध्यमिकची पहिली यत्ता** माध्यमिकच्या पहिल्या यत्तेंत बावीस मुलं आहेत. शिक्षिकेला ते सारेच नवे चेहरे आहेत. गळलेल्या त्या अकराजणांबद्दल तिला कांहींच ठाऊक नाहीं. कुणींच हरवलें नाहीं याबद्दल तिची पुरतीं खात्री आहे.

कधीकधी ती कुरकुर करते – 'हल्लीं कुणीहि शाळेला येतं, त्यामुळे शिकवणंच मुश्किल झालं आहे! इतके निरक्षर विद्यार्थी आम्हांला मिळतात!'

तिनं लॅटिनचा बराच अभ्यास केला आहे, पण आंकडेवारीचा तक्ता कधीं पाहिलेलाच नाहीं.

**फळा** अर्थात् त्यामुळं कांहीच फरक पडणार नाहीं आहे. तरी तिला आपल्या वर्गांतल्या विद्यार्थ्यांच्या वयांचा अभ्यास करावा लागेल. कारण तिच्या विद्यार्थांचे कोवळे चेहरे आणि नाजूक शरीरं फसवीं असूं शकतील.

जन्मनोंदणी कार्यालयांतले लोक चेहऱ्यांकडे पाहण्याची तसदी घेत नाहींत. वयानं पुरेसा मोठा असेल त्याला कामाचा परवाना मिळूं शकतो. बघा, तुमच्या वर्गांमधून तो कुठल्याहि क्षणीं पळून जाईल.

यांतल्या प्रत्येक मुलानं खरं म्हणजे एक मोठी पाटी गळ्यांत लटकवून फिरावं : 'मी तेरा वर्षांचा आहें. मला नापास करूं नका.'

**मोठ्यांची कत्तल** पण कुणीच अशी पाटी वागवत नाहीं. आणि शिक्षक त्यांच्या मार्कांकडे बघतात. त्यांच्या जन्मतारखांकडे बघत नाहींत.

कांहीजण चांगल्या उद्देशानंच वागत असतील. कांहींना मोठ्या विद्यार्थ्यांना वांचवावंसंसुद्धा वाटत असेल. पण चुकांनीं भरलेला विद्यार्थ्यांचा पेपर समोर आला कीं आपले सगळे चांगले हेतू ते विसरतात.

वस्तुस्थिति अशी आहे कीं वयानं मोठे असलेलेच नेहमीं नापास होताहेत. सहजपणं लगेंच कामाला लागूं शकतील असेच.

पण तुमच्या वळणांतलीं मुलं पास होत राहतील. त्यांना आधींच्या वर्षांत पण नापास व्हायचं कारण नव्हतं. याहि वर्षीं नाहीं.

त्या सर्वांचींच घरं काहीं पिएरिनोसारखीं नाहींत हे उघड आहे. पण ती फार वेगळीहि नाहींत.

या पद्धतीनं वर्गाची छाटणी होत राहते :

**गरिबांची कत्तल** वयानं सगळ्यांत मोठ्या मुलांना नापास करतां करतांच सगळ्यांत गरिबाला तडाखा द्यायचं काम शिक्षक करतात.

वयानं वाढत प्राथमिक यत्तांतच राहणाऱ्या मुलांच्या वडलांच्या व्यवसायांची पाहणी आम्हीं केली आहे. तिचे निष्कर्ष आकृति ५ मधें दिसतील.



१५ १४ १३ १२ ११

आकृति ४

**पहिल्या पगाराचं पाकिट** गियानी चौदा वर्षाचा झालासुद्धां. आणि त्याला पुन्हां माध्यमिकच्या पहिल्या वर्गांतच बसणं भाग आहे. या टप्प्यावर शिक्षण चालूं ठेवणंदेखील मूर्खपणाचं होतं. यापुढं तो प्रत्येक वेळी पास होत गेला तरीसुद्धां माध्यमिक शिक्षण पुरं होईतो तो सतरा वर्षांचा होईल.

शाळेमधें कंटाळवाणेपणा तर कळसाला गेला आहे. काम मिळणं सोपं आहे. आणखी कांहीं महिन्यांत तें कायदेशीर पण होऊन जाईल.

कामाला लागलों म्हणजे कांहीं स्वर्गाला हात पोचले नाहींत, हे गियानीला पुरतं ठाऊक आहे. पण तरी आपण आतां पैसे मिळवून घरी आणावे असं त्याला वाटतं. तो खर्चत असलेल्या प्रत्येक पैशाबद्दल बोलणीं खायचा त्याला वीट आला आहे.

आणि त्यानं शाळा सोडण्याला आईवडलांचा विरोध पण कमी-कमी होत चालला आहे. याच्या उलट व्हायचं तर त्या मुलाला आणि त्याच्या आईवडलांना पण विलक्षण चिकाटी हवी. प्रत्येक अपयशाला तोंड देण्याइतकी स्वतः खतपाणी घालून जोपासलेली शिकण्याची जबरदस्त तहान हवी.

तुमचा मदतीचा हात पुढं येता तर फरक झाला असता. तुम्हीं हात पुढं केलांत - पण तो त्याला कायमचा कोलमडून टाकण्यासाठीं.

**भाजीवाला** कदाचित् तुमचा तसा हेतु नसेललहि. तुमच्या वर्गाच्या मानानं वयानं मोठ्या असलेल्या विद्यार्थ्याला तुमच्या गळ्यांत टाकणारी शिक्षिकाहि यांत नक्कीच दोषी आहे. बाहेरच्या जगाचा पण अपराध असेल आणि तसंच पाहिलं तर गियानीचा स्वतःचा पण दोष असेल.




आकृति ५
**गरिबांची कत्तल**

पण जेव्हां तुम्हीं एखादा लहान मुलगा भाजीच्या हातगाडीमागं उभा पाहतां, तेव्हां तुमच्या जागीं मीं असतों तर 'मीं याला नापास केलेलं आहे' ही जाणीव मला सहन झाली नसती.

'तूं शाळेंत परत कां येत नाहींस? तुला परत येतां यावं एवढ्यासाठीं मीं तुला पास केलेलं आहे. तुझ्याशिवाय, कां कोण जाणे, शाळेंत कांहीं गंमत येंत नाहीं.'

एवढंच फक्त तुम्हांला म्हणतां आलं असतं तर –

**माध्यमिकचं दुसरं वर्ष** माध्यमिक शाळेच्या दुसऱ्या वर्षापासून विद्यार्थ्यांचं सरासरी वय कमी असतं. कारण मोठीं मुलं बेपत्ता झालेलीं असतात. पिएरिनो आणि दुसरीं मुलं यांच्यातलं अंतर कमी व्हायला लागतं.

पुन्हां त्याच यत्तेची उजळणी करणाऱ्या मुलांमुळं प्राथमिक यत्तांत वर्ग वयानं मोठे दिसतात. नंतर माध्यमिक शाळेंत ते वयानं लहान दिसायला लागतात. कारण मोठ्या मुलांनीं कामावर जाण्यासाठी शाळा सोडलेली असते.

**घरांची भूमिका** शाळेची सामाजिक रचना पण आतां बदलते. जवळच्याच शहरांतल्या आमच्या मित्रांनीं केलेला याचा अभ्यास आम्हीं इथं दिला आहे. पहिल्या नि दुसऱ्या माध्यमिक यत्तेतल्या नापास विद्यार्थ्यांची त्यांनीं सामाजिक वर्गवारींत पुन्हां विभागणी केली. त्याचे निष्कर्ष आकृति ६ मधें दिले आहेत.

**परीक्षेंत चौथी श्रेणी मिळते तेव्हां** हें चित्र म्हणजे शिक्षकांना आपल्या निःपक्षपाती परीक्षेच्या सचोटीचा अपमान वाटला.

त्यांच्यापैकीं सगळ्यांत क्रुद्ध शिक्षिकेनं हरकत घेतली कीं 'मीं तर विद्यार्थ्यांच्या कुटुंबांची कुठलीहि माहिती कधीं मिळवली नाहीं. किंवा कुणाकडून ती मला मिळाली नाहीं. जेव्हां पेपर चौथी श्रेणी देण्याच्या लायकीचा असतो, तेव्हां मी तिथं ४ चीच




आकृति ६

खूण करीन.’ बिच्चारी! तिच्याविरुद्ध नेमका हाच आक्षेप आहे हें तिला समजूंच शकलं नाहीं.

विषम पातळीवर असलेल्यांत समान वांटणी करण्यापेक्षां दुसरा अन्याय तो कोणता?

**ती कुणाबद्दल बोलते आहे?** प्रश्न वयाचा असो कीं विद्यार्थ्यांच्या सामाजिक दर्ज्याचा, ते माध्यमिकच्या दुसऱ्या यत्तेंत गेले की शिक्षिका मोकळेपणानं श्वास घ्यायला लागते. आतां ठरलेला अभ्यासक्रम तिला सहज पुरा करतां येणार असतो.

आतां तिचं लक्ष असतं जूनकडे. तेव्हां तिच्या वाटेंतले उरलेसुरले चार कांटे पण दूर होणार असतात आणि तिच्या जोगता वर्ग अखेर तिला मिळणार असतो.

'ते माध्यमिकच्या पहिल्या यत्तेंत आले तेव्हां खरंच निरक्षर होते. हां, पण आतां त्यांचे पेपर अगदीं सगळे बरोबर असतात.'

कुणाबद्दल बोलते आहे ती हें? पहिल्या यत्तेमधले तिचे विद्यार्थी कुठं आहेत आतां? ज्यांना सुरवातीपासूनच बरोबर लिहितां येत होतं तेच फक्त आतां शिल्लक आहेत. त्यांना प्राथमिकच्या तिसऱ्या यत्तेंत असतांनासुद्धां असंच लिहितां येत होतं. हे सारे तर घरीच लिहायला शिकलेले!

पहिल्या वर्षामधले तिचे निरक्षर असलेले विद्यार्थी अजुनी तितकेच निरक्षर आहेत. फक्त तिनं त्यांना नजरेआड टाकून दिलं आहे.

**सक्तीचं** आणि हें तिला चांगलं ठाऊक आहे. इतकं कीं माध्यमिकच्या तिसऱ्या यत्तेंत ती अगदीं मोजक्याच मुलांना नापास करते. पहिलीमधें सात, दुसरींत चार, आणि तिसरींत फक्त एक नापास! तिनं करायला हवं त्याच्या नेमकं उलटं!

सक्तीच्या शाळेच्या पद्धतींत सगळे विद्यार्थी माध्यमिकच्या तिसऱ्या यत्तेपर्यंत सरळ वर जायला हवेत. मग शेवटच्या परीक्षेच्या वेळीं शिक्षकानं आपल्या निवडीला पुरता वाव द्यावा.

त्याच्याविरुद्ध आम्हीं चकार शब्द काढणार नाहीं. एव्हानासुद्धां मुलगा लिहायला शिकला नसेल तर तिनं त्याला खुशाल नापास करावं.

**सारांश** या सक्तीच्या शिक्षणाच्या आठ वर्षांत ज्या एकाच वर्गाचा विचार आपण करतों आहोंत त्याचं चित्र ७ व्या आकृतींत रेखाटलं आहे.


नापास होऊन परत
त्याच यत्तेंत बसलेंले
बरोबर राहिलेंले
दुसऱ्यांदा नापास होऊन
त्याच यत्तेंत बसलेले
नापास होऊन
त्याच यत्तेंत बसलेले
कामाला लागलेले.

आकृति ७




आकृति ८
**पालकांचा व्यवसाय**

या वर्गानं चाळीस मुलं गमावलीं आहेत. शाळेंचीं आवश्यक वर्षे पुरीं करायच्या आधींच सोळा मुलं कामाला लागलीं. चोवीस पुन्हां त्याच वर्गांत हजेरी लावणारीं. एकंदर छपन्न मुलं या वर्गांतून गेली. प्राथमिकच्या पहिल्या यत्तेंत शिक्षिकेकडे सोंपवलेल्या मूळ बत्तीस मुलांपैकीं फक्त अकराजण माध्यमिक शाळेच्या तिसऱ्या वर्षांपर्यंत पोंचलेले दिसतात.

**वडलांचा व्यवसाय इथ** आपल्याला या माध्यमिक पदविका घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या व्यवसायांची पाहणी करण्याची गरज भासते. सेंट्रल इन्स्टिटट्यूट ऑफ स्टॅटिस्टिक्सनं अशी पाहणी केलेली नाहीं. 'शक्तीची शिक्षणपद्धति' सामाजिक भेदभाव करत असेल असं त्यांना वाटेलच कसं?

पण उच्च माध्यमिक पदविका असलेल्या विद्यार्थ्यांच्या वडलांच्या व्यवसायांचा अभ्यास मात्र इन्स्टिटट्यूटनं केला आहे. त्याचे निष्कर्ष आपल्याला ८ व्या आकृतींत पाहायला मिळतात.

तुमच्या पद्धतीचं शिक्षण १२-१३ वर्ष मिळालेले हे सगळे विद्यार्थी यांतलीं आठ वर्षं सक्तीचीं आहेत.

**हा केवळ पैशांचां प्रश्न नाहीं** कांहीं मुलांनीं पैसा नाहीं म्हणून शाळा सोडली असेल, तो तुमचा दोष नाहीं. पण असेहि कांही कामगार आहेत कीं आपल्या मुलांनीं माध्यमिकची तिसरी यत्ता पास व्हावी म्हणून दहा-अकरा वर्षसुद्धां ते त्यांना पोसत राहतील.

त्यांनीं अगदीं पिएरिनोच्या डॅडींइतकाच पैसा खरचलेला आहे. पण त्यांच्या मुलांच्याएवढा असतांनाच पिएरिनोला माध्यमिक पदविका मिळूनहि गेली आहे.

## जन्मतःच वेगळे?

**अडाणी आणि आळशी** तुम्हीं आम्हांला सांगतां कीं आपण फक्त अडाणी नि आळशीं मुलांनाच नापास करतों.

नंतर तुम्हीं दावा करतां कीं देव अशा अडाणी नि आळशांना गरिबांच्या घरांतच जन्माला घालतो. पण ईश्वर गरिबांना असं

कधीच डिंवचणार नाहीं. अशी दुष्ट बुद्धि तुमच्यांतच असण्याची शक्यता जास्ती आहे.

**वर्णभेदाचं समर्थन** घटनासमितीमधें जन्मजात भेदभावांच्या सिद्धान्ताचं समर्थन करणारा एक फॅसिस्टच होता. 'आवश्यक सक्तीचं' या शब्दांचा निर्देश करून माननीय मास्त्रोइयानी म्हणाले होते की कांहीं मुलांमधें शाळेंत जाण्याची नैसर्गिक क्षमताच नसते.

आणि एका माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांनीं लिहिलं आहे - 'दुर्दैवानं घटना सगळ्या मुलांना सारख्याच मानसिक वाढीची किंवा सारख्याच शैक्षणिक वृत्तीची हमी देऊं शकत नाहीं.'

पण हें ते स्वतःच्या मुलांबाबत कधींच मान्य करणार नाहींत. त्यांचं माध्यमिक शिक्षण पुरं करायला ते हयगय करतील का? शेतांत खणायला ते त्याला बाहेर पाठवतील? माओच्या चीनमधें अशा गोष्टी घडत आहेत असं मला कुणींतरी सांगितलं. पण तें खरं असेल का?

श्रीमंतांचं प्रत्येकच पोरंग हुशार असतं का? पण ते त्यांना पुढं लोटतच असतात.

**दुसऱ्याचं तें कार्टं** दुसऱ्याच्या पोटीं आलेलीं मुलं कधीकधीं अडाणी वाटतात खरीं. आपलीं मुलं कधींच वाटत नाहींत. जवळीक निर्माण झाली कीं आपल्या लक्षांत येतं - ही कांहीं इतकी अडाणी नाहींत, की आळशीहि नाहींत. किंवा निदान, हा कांहीं अवधीचाच प्रश्न आहे. तीं यांतून बाहेर येतील आणि आपण यावर उपाय शोधला पाहिजे.

म्हणजे जन्मतः सर्व मुलं समानच असतात असं म्हणणं जास्ती प्रामाणिकपणाचं ठरेल. नंतर तीं बरोबरीचीं राहात नसतील तर तो दोष आपला आहे. आणि त्यावर इलाज आपल्याला शोधला पाहिजे.

**अडचणी दूर करणं** गियानीला डोळ्यांपुढं ठेवून घटना नेमकं हेंच म्हणते – "जन्म, भाषा वा वैयक्तिक आणि सामाजिक परिस्थितीचा कोणताहि भेदभाव न करतां कायद्यासमोर सर्व नागरिक समान आहेत.

"नागरिकांची समानता आणि स्वातंत्र्य मर्यादित करून, मानवी व्यक्तित्वाच्या संपूर्ण विकासाला आणि देशाच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक बांधणीमध्यें सर्व कामगारांच्या पूर्ण सहभागाला पायबंद घालणाऱ्या आर्थिक वा सामाजिक परिस्थितीनें निर्माण केलेल्या अडथळ्यांना दूर करणें हें प्रजासत्ताक राज्याचें कर्तव्य आहे."

## हें तुमच्यावर होतं

**ओझीं उतरवणारी** तुमच्यापैकीं एकीनं (ही आहे तरुण गोड नववधू. हिनं माध्यमिकच्या पहिल्या यत्तेंत २८ पैकीं १० मुलांना नापास करून दाखवलं. ती आणि तिचा नवरा दोघंहि कम्युनिस्ट आणि अगदीं लढाऊ आहेत.) आमच्याशीं असा युक्तिवाद केला : "मीं कांहीं त्यांना पळवून लावलं नाहीं. मीं फक्त त्यांना नापास केलं. ती परत येतील अशी काळजी त्यांच्या पालकांनीं घेतली नाही तर तो त्यांचा प्रश्न आहे."

**गियानीचा बाप** पण गियानीचा बाप बाराव्या वर्षीच लोहार म्हणून काम करायला लागला. ती शाळेच्या चौथ्या यत्तेपर्यंतदेखील पोंचला नाहीं.

एकोणीस वर्षांचा असतांना तो दुसऱ्या महायुद्धांत फॅसिस्ट विरोधी 'गनिमी सैनिकां'ना सामील झाला. आपण काय करतों आहोंत हें त्यालाहि पुरतं कळलं नव्हतं. पण तरी तुमच्या कुणाहिपेक्षां त्याला जास्त चांगलं उमजलं होतं. अजून जन्माला पण न आलेल्या गियानीसाठीं आतांच्यापेक्षां जास्ती न्याय्य आणि जिथं गियानीला निदान इतरांच्या इतकाच मान असेल असं जग त्याला हवं होतं.

घटनेचं तिसरं कलम त्याच्या कानांत घुमतं आहे तें असं – "सारे अडथळे दूर करणें हें श्रीमती स्पादोलिनींचें (शिक्षिकेचें) कर्तव्य आहे..."

आणि तो तुम्हांला पगार पण अगदी चांगला देतो. त्याला ताशीं ३०० लिरा मिळतात. आणि त्यांतून तो तुम्हांला ४३०० लिरा देतो.

तुम्हीं पुरेसे तास काम केलंत तर तो तुम्हांला जास्तीसुद्धां द्यायला राजी होईल.

तो वर्षांत २१५० तास काम करतो. तर तुम्हीं फक्त ५२२! परीक्षेचे तास मीं जमेला धरलेले नाहीत. ते कांहीं शिकवण्याचे तास नसतात."*

---

* माध्यमिक शाळेंतल्या शिक्षकाला कर वजा जातां किमान १२, २३० ते कमाल ३३, १११० रुपये पगार दरवर्षी मिळतो. शिकवायचे तास दरवर्षी किमान ४६८ आणि कमाल ५४०. कामाचे जास्तींत जास्त तास आणि किमान पगार ताशीं २२.६४ रुपये. किमान तास, कमाल पगार - ७०.८४ रुपये ताशीं असा हिशेब पडतो.

**बदली** पण दडपून टाकणारे अडथळे गियानीचे वडील एकटे स्वतःच्या बळावर दूर करूं शकत नाहींत. माध्यमिक शाळेंत शिकणाऱ्या मुलाला शिस्त कशी लावायची ह्याची त्यांना कल्पना नाहीं. मुलानं टेबलाशीं बसून किती वेळ अभ्यास केला पाहिजे, त्याला अभ्यासाखेरीज दुसरा विरंगुळा असणं चांगलं का? अभ्यासामुळं डोकं दुखतं आणि डोळ्यांतून पाणी यायला लागतं असं गियानी म्हणतो तें खरं का?

आत्तां प्रत्येक गोष्ट आपण स्वतःच कशी सांभाळावी हें गियानीच्या वडलांना कळतं तर त्यांना गियानीला शिक्षणासाठीं तुमच्याकडे पाठवावंच लागलं नसतं. गियानीला शिक्षण आणि शिस्त दोन्ही देणं तुमच्याच हातीं आहे. एकाच प्रश्नाचीं तीं दोन रूपं आहेत.

तुम्हीं त्याला मार्गदर्शन केलंत तर गियानी तुमच्याबरोबर वेगळ्या तऱ्हेनं काम करूं शकेल. आणि उद्यां तो अधिक लायक बापहि होईल. आज मात्र गियानीचे वडील आहेत हे असे आहेत. श्रीमंतांनीं त्यांना जसं असण्याची मुभा दिली तसे!

**शिकवणी** गरीब बिचारा! या गरीब माणसाला भोंवतीं काय घडत होतं तें कळतं तर आपलं हत्यार उचलून तो पुन्हां एकदां 'गनिमी सैनिक' बनता. आपल्या रिकाम्या वेळांत पैशासाठीं शिकवण्या करणारे कांहीं शिक्षक आहेत. अडथळे दूर करण्या-ऐवजीं विद्यार्थ्यांमधले भेदभाव जास्ती तीव्र करायचंच काम ते करत असतात!

सकाळीं शाळेच्या ठराविक तासांत सगळ्यांना सारखंच शिकवण्यासाठीं आम्हीं त्यांना पगार देतों. नंतर दिवसभरांत ते श्रीमंतांकडून त्यांच्या 'बालकांना' वेगळ्या तऱ्हेनं शिकवण्यासाठी

पैसे घेतात. नंतर जूनमधें आमच्याच खर्चानं ते स्पर्धेचे परीक्षक होतात आणि निकाल देणारेहि तेच असतात!

**लहानसा मुलकी नोकरदार** एखाद्या लहानशा मुलकी नोकरदारानं कागदपत्रं पाहण्याचं काम चांगल्या मोबदल्यांत तत्परतेनं आणि व्यवस्थितपणें आपल्या घरीं केलं, पण तेंच काम सावकाश कसंतरी ऑफिसमधें टेबलावर केलं, तर तुम्हीं त्याला गजांआड अडकवून ठेवाल.

आणखी विचार करा कीं तो जरा अशिलाजवळ कुजबुजला की 'या ऑफिसमधें तुमचे कागदपत्र तुम्हांला उशिरां आणि तेहि उलटे-सुलटे दिले जातील. मी असं सुचवीन कीं थोड्याशा जास्त खर्चात हें काम घरीं जास्ती चांगल्या तऱ्हेनं करणारं कुणी तुम्हीं शोधा.' तरी तो पकडला जाईल.

पण – 'तुमचा मुलगा आपलाआपण अभ्यास करूं शकणार नाहीं आहे. त्याला शिकवणी ठेवा.' असं एका आईला एक शिक्षक सांगतांना मी ऐकलं आहे – त्या शिक्षकाला कुणी गजांआड टाकत नाहीं. तो शब्दन्शब्द असंच बोलला आहे. माझ्याजवळ साक्षीदार आहेत. मी त्याला कोर्टात खेचूं शकतों.

कोर्टांत? ज्याची बायकोच शिकवण्या करून थोडी जास्त कमाई करते आहे अशा न्यायाधिशासमोर? कांहीं का असेना! काय कारणांसाठीं कोण जाणे, पण इटालियन दंडसंहितेंत असा गुन्हा नोंदलेलाच नाहीं.

**कांदे** तुमचं सर्वांचं अगदीं एकमत आहे. आम्हीं चिरडून जावं असं तुमच्या मनांत आहे. व्हा पुढं! करा तसं! पण निदान

प्रामाणिकपणाचा आंब तरी आणूं नका. काय पण! ही संहिता तुम्हीं स्वतःच स्वतःच्या सोयीचीच लिहिलेली आहे. आणि म्हणे प्रामाणिकपणा!

माझ्या एका मित्रानं एका भाजीच्या मळ्यांतून चाळीस कांदे चोरले. त्याला तेरा महिने तुरुंगाची हवा खावी लागली. तिथं दया-माया नाहीं. न्यायाधीश अर्थातच कांदेबिंदे चोरत नाहीं. त्यांत त्रासच भारी! तो मोलकरणीला ते विकत आणायला सांगतो. कांदे आणि मोलकरीण दोघांनाहि द्यावे लागणारे पैसे त्याची बायको शिकवण्या करून आणते.

**पाद्री जास्त प्रामाणिक आहेत** कांहीं धार्मिक शाळा जास्ती प्रामाणिक दिसतात! वर्गलढ्यांत त्याहि जरी त्यांची भूमिका वठवत असल्या तरी निदान तें लपवून ठेवायचा प्रयत्न त्या करत नाहींत. फ्लोरेन्सच्या बार्नाबिती ऑर्डरच्या शाळेची फी वसतिगृहांतल्या विद्यार्थ्यांसाठीं दरमहा ४०० रुपये आहे. स्कालोपी ऑर्डरच्या शाळेंत ती ३६० रुपये आहे.

रात्रंदिवस ते एकाच धन्याची चाकरी करतात. तुमच्यासारखी एकाच वेळीं दोन मालकांची नोकरी करायचा खटाटोप ते करत नाहींत.

**स्वातंत्र्य** दुसरा पण एक अडथळा दूर करण्याचा प्रयत्नच तुम्हीं करत नाहीं. तो म्हणजे फॅशनची पकड!

एक दिवस टीव्हीबद्दल बोलतांना गियानी आम्हांला म्हणाला, “ते आपल्याला कचरा भरवत राहतात. त्यापेक्षां त्यांनीं आपल्याला शाळेची वाट दाखवली तर आपण तिथं तरी जाऊं”

त्यानं 'ते' हें सर्वनाम वापरलं. 'ते' म्हणजे त्याच्याभोंवतींचा समाज, जग. असं कुणीतरी ज्याचं चित्र त्याच्या मनांत स्पष्ट नाहीं. पण जो गरिबांची आवडनिवड स्वतःच ठरवतो!

आम्हीं त्याला खूप नांवं ठेवलीं : "पण तुझ्या तर एव्हांना दोन शाळा झाल्या आहेत. आणि तूं दोन्ही सोडून दिल्या आहेस." पण खरं सांगा, त्याला निवड करायची मोकळीक खरोखरच होती का?

शहरामधें नानातऱ्हेचे छंद त्याला दडपून टाकतात. त्यांतला महत्त्वाचा म्हणतां येईल असा कोणताच नसतो. आणि जो मुलगा या 'छंदां'च्या मागं लागत नाहीं तो 'वाळींत' पडतो.

नाहींतर त्याच्यापाशीं धाडस असावं लागतं – जें गियानीजवळ नाहीं. गियानी कोंवळा, अनपढ – त्याला कुणाचीच मदत नाहीं. त्याच्या वडलांची पण नाहीं. कारण तेसुद्धां या चाकोरींतच रुतलेले! मदत इटालियन कामगारांच्या कॅथॉलिक संस्थेच्या काउंटरवर खेळ विकणाऱ्या धर्मोपदेशकांकडून नाहीं, कीं सामाजिक सभागृहांत खेळायला बोलावणाऱ्या कम्युनिस्टांकडून! तर सगळे अहमहमिकेनं त्याला खालींखालीं खेंचण्यासाठींच झटताहेत.

जणूं काहीं आमच्या नैसर्गिक इच्छा आम्हांला कमीच त्रास देत असतात!

**'फॅशन'** आजचं अद्यावत् शास्त्र सांगतं – बारापासून एकवीस वर्षांपर्यंतचा काळ खेळण्याचा, लैंगिक कुतूहलाचा आणि अभ्यासाचा तिटकारा करण्याचा असतो.

खरं तर १२ ते १५ हें वय भाषा शिकण्यासाठीं सगळ्यांत उत्तम आणि १५ ते २१ हें वय संघटना आणि राजकीय सभांमधून

या भाषेचा उपयोग करण्यासाठीं सगळ्यांत चांगलं. पण या गोष्टी गियानीपासून लपवून ठेवल्या गेल्या आहेत.

गमावण्यासाठीं जवळ वेळ नाहीं हेंहि त्यांच्यापासून दडवलेलं आहे. पंधराव्या वर्षी शाळेला रामराम. एकविसाव्या वर्षांपासून वैयक्तिक प्रश्न घेरून टाकतात : साखरपुडा, लग्न, मुलं, जगण्यासाठी कमावणं. मग त्याच्याजवळ सभांसाठी वेळच असणार नाहीं. तो चारचौघांत मिसळायला पण घाबरेल. आणि घराबाहेर स्वतःला सर्वस्वीं झोंकून देऊंच शकणार नाही.

**गरिबांचे बचाव** तुम्हीं शिक्षकच फक्त या फॅशनच्या बडग्या-पासून गरिबांचा बचाव करूं शकलां असतां. हें तुम्हीं करावंत म्हणून सरकार तुम्हांला दरवर्षी आठशे कोटी रुपये देत. पण तुम्हीं इतके क्षुद्र आहांत! शाळेचे दिवस १८०,* तुमच्या सुट्टीचे १८५! शाळेंत फक्त चार तास, तर बाहेर बारा तास.** आणि तो मुर्ख मुख्याध्यापक वर्गांत शिरून जाहीर करतो - 'तीन नोव्हेंबरला एक नवीन सुट्टी शिक्षणाधिकाऱ्यानं मंजूर केली आहे.' – आनंदाचा जल्लोष ऐकतो आणि चेहऱ्यावर एक संतुष्ट स्मित झळकवतो.

शाळा म्हणजे कटकट हें तुम्हीं च ठसवलं आहे, मग मुलांना ती कशी आवडावी?

**आपण सगळे एकमेकांना मिठ्या मारूं या** बोर्गी शहरांत मुख्याध्यापकानं माध्यमिकाच्या तिसऱ्या यत्तेंतल्या मुलां-मुलींसाठीं शाळेचा एक वर्ग नाचाचा हॉल म्हणून वापरायची परवानगी

---

* ह्या हिशेबांत परीक्षेचे ३० दिवस धरलेले नाहींत. कारण ते कांहीं शिकवण्यांचे दिवस नाहींतच.

** ह्याचा खुलासा पुढं आहेच.

दिली आहे. आपण यांत मागं पडूं नये म्हणून सेल्सियानी ऑर्डर आपल्या धार्मिक शाळेंत 'मुखवट्यांची मिरवणूक' भरवते. माझ्या माहितीचे एक शिक्षक खिशांतून डोकावत असलेल्या 'स्पोर्ट्स गॅझेट' दैनिकाच्या अंकासकट इकडेतिकडे फिरत असतात.

मुलांच्या गरजांची अगदीं पूर्ण जाण असलेली ही मंडळी! कांहीं झालं तरी चालूं रहाटीत वावरणं इतकं सोपं असतं! स्पोर्ट्स गॅझेटवाला हा शिक्षक आणि तोच अंक खिशांत असलेला कुणी कामगार – बाप ह्यांची गाठ पडली आणि कांखेंत चेंडू घेऊन हिंडणाऱ्या मुलाचा किंवा केशप्रसाधनगृहांत तासच्यातास घालवणाऱ्या मुलीचा विषय निघाला, तर त्या दोघांचं इतकं छान जुळतं!

मग प्रगतिपुस्तकांत तो शिक्षक एक बारीकशी खूण करतो आणि कामगारांच्या मुलांना वाचायलाहि शिकायच्या आधींच कामावर जावं लागतं. पण शिक्षकाचीं मुलं? तीं आपला अभ्यास शेवटपर्यंत पुरा करणारच – त्यांना 'कांहीं कलत नसलं' तरी किंवा 'करावसं वाटत नसलं' तरीहि!

## निवड कांहींना सोइस्कर

**दैव कीं योजना** इथं कुणी नशिबाला बोल लावायला लागतील. नशिबाशीं जोडून दिलेला इतिहास वाचणं इतकं सुखाचं असत!

राजकारणाशीं नातं जोडून इतिहास वाचणं जास्ती अस्वस्थ करणारं आहे. मग फॅशनी हा गियानीसारख्यांना वगळण्याकरतां रचलेला अगदीं हिशेंबी बेत आहे हें उघड होईल. राजकारणाचं सोयरसुतक नसलेला शिक्षक हा वरच्या साहेबांनीं प्रगतिपुस्तक न् अहवालाच्या शस्त्रांनी सज्ज केलेल्या ४ लाख ११ हजार मुर्खांपैकीं एक बनतो. हें राखीव दल आहे. त्यांच्याकडे कामगिरी

आहे दरवर्षी १० लाख ३१ हजार गियानींना थोपवून धरण्याची. फॅशनींच्या लाटेंतसुद्धां हे गियानी वाहून नाहींच गेले तर काय घ्या!

दरवर्षी नाकारली जाणारी (रेस्पिंती) १० लाख ३१ हजार मुलं. 'रेस्पिंती' – तुमच्या शाळांतून वापरला जाणारा एक तांत्रिक शब्द. पण हा लष्करांत पण वापरला जातो. लष्करांत सक्तीनं नांव नोंदण्याचं वय होण्याआधींच नाकारणं. परीक्षांचा शोध प्रशियनांनीं लावावा हा कांहीं योगायोग नव्हता.

**कर** चमत्कारिक गोष्ट अशी कीं आम्हांला बाहेर फेंकण्यासाठीं तुम्हांला दिला जाणारा पगार हा आम्हीं नाकारले गेलेलेच देत असतों.

आपली सारी मिळकत खर्च करावी लागणारा गरीबच देत असतो. आणि मिळकतीचा केवळ कांहीं अंश खर्चणारा श्रीमंत. कां कोण जाणे, पण इटालींमधें ग्राहकाच्या अत्यावश्यक वस्तूंवर अगदीं शेवटच्या पैशापर्यंत कर बसवलेला आहे. पण प्राप्तिकर हा मात्र खराच विनोद आहे.

अर्थशास्त्राच्या क्रमिक पुस्तकांत या करपद्धतीला 'वेदनाहीन' म्हणतात म्हणे. म्हणजे लक्षांत न येतां गरिबानं कर भरावे अशी जी व्यवस्था श्रीमंत करतात, ती 'वेदनाहीन'!

विद्यापीठांतून अशा प्रश्नांबद्दल अनेकदां उघडपणं बोललं जातं, पण तिथं फक्त सभ्य माणसं असतात. खालच्या शाळांतून या अशा चर्चांना मनाई आहे. शाळेमधें राजकारणाबद्दल बोलणं चांगलं नाहीं. 'साहेबा'ला तें आवडत नाहीं.

**फायदा कुणाचा?** शाळेच्या तासांची संख्या कमींतकमी ठेवल्या-मुळं कुणाचा फायदा होतो तें पहायचा जरा प्रयत्न करूं या.

वर्षभरांत ७२० तास म्हणजे दररोज सरासरी दोन तास शाळा. पण आणखी चौदा तास तो मुलगा जागा असतो! सुखवस्तु कुटुंबांतून हे चौदा तास सांस्कृतिक प्रगतीसाठीं असतात.

पण शेतकऱ्यांना ते चौदा तास एकाकीपणाचे आणि निमूटपणाचे असतात. त्यांचा बुजरेपणा वाढवायलाच फक्त ते उपयोगाचे! शहरांत कामगारांच्या मुलांसाठी हे चौदा तास छुप्या भुल-भुलैय्यांच्या* शाळेमधले ठरतात.

विशेषतः उन्हाळी सुट्टी तर सरळसरळ श्रीमंतांच्या फायद्या-साठींच ठेवलेली वाटते. त्यांचीं मुलं परदेशी जातात. आणि हिवाळ्यांत इथं शिकतात त्याहून कितीतरी जास्त तिथं शिकतात. पण गरीब मात्र जूनमधें जें कांहीं थोडं त्यांना येत असतं तेंहि शाळा परत उघडेपर्यंत विसरून गेलेले असतात. उन्हाळ्याच्या सुट्टींत एखाद्या कच्च्या राहिलेल्या विषयाची पुन्हां परीक्षा द्यायची म्हटलं तर त्यांची तयारी करण्यासाठीं शिकवणी ठेवणं पण त्यांना परवडत नाहीं. साधारणपणानं ते नाद सोडून देतात आणि परीक्षेलाच बसत नाहींत. कंटाळवाण्या उन्हाळ्यांत शेतकरी मुलं पोटासाठीं शेतावर पडेल तें काम करतात.

**उघड बोलणं** गेल्या शतकाच्या अखेरीला गिओलितीच्या** वेळीं राजकारणीं माणसाला प्रत्येक गोष्ट उघडपणं मांडता येत होती : म्हणजे वाचायला शिकतांना शेतकरी आणि

---

* अनावश्यक गोष्टी आवश्यक कशा आहेत हे गरिबांना पटवून देणाऱ्या जाहिराती म्हणजेच हे छुपे भूलभुलैय्ये!

** इटालियन राजकारणपटू. १८९२ ते १९२१ च्या दरम्यान तो अनेकदां सरकारांत होता.

खाणकामगारांच्या डोक्यांत कोणत्याहि नवीन कल्पना शिरूं नयेत म्हणून काल्तोगिरोनला बड्या जमीनदारांच्या सभेंत सर्व प्राथमिक शिक्षण बंद करण्यासाठीं एक दुरुस्ती सुचवली गेली.

फेर्दिनांदो मार्तिनी हा त्या काळचा शिक्षणमंत्री. हा पण तितकाच स्पष्ट होता. गरिबांना माध्यमिक शाळा खुल्या केल्या याबद्दल खेद व्यक्त करतांना तो म्हणाला – "याच कारणासाठीं आतां उच्चवर्गीयांनीं आपले प्रयत्न अधिक तीव्र केले पाहिजेत. किंवा सगळ्या राजकीय आणि आर्थिक फायद्यांना मुकण्याची तयारी तरी ठेवली पाहिजे."

**फॅसिस्ट** आणि फॅसिस्ट राजवटींत तर कायदे अगदीं स्पष्टच होते. नागरी किंवा मोठ्या ग्रामीण केंद्रांच्या शाळांत सामान्यपणानं पूर्व आणि उच्च प्राथमिक शिक्षण पांच वर्षांचं असेल. पण लहानशा ग्रामीण भागांतल्या शाळांतून तें फक्त पूर्व प्राथमिक शाळांच्या तीन यत्ता इतकंच असेल.

नंतर घटनासमितींत पुन्हां शाळा सोडण्याचं वय आणखी कमी करून तेरावर आणावं ही शिफारस करणारे पण फॅसिस्टच होते.

**बिचारा पिएरिनो** पण असं बोलणारे थोडेच होते. आतां आपल्याला अधिक सावधपणानं बोललं पाहिजे हा धडा बाकीच्या राजकारण्यांनी घेतला आहे.

विधानसभेंत नव्या माध्यमिक शाळेवर चर्चा सुरूं होती. तेव्हा गरिबांच्या विरुद्ध बोलण्याची सक्त मनाई होती. 'बिचारा पिएरिनो' आणि मावळतं लॅटिन यांच्याबद्दल शोक करण्याखेरीज हातांत कांहींच उरलं नव्हतं.

ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पक्षाच्या एका सभासदानं हृदयस्पर्शी भाषण केलं : "मंदबुद्धि मुलांबरोबर ज्यांना आपली झेंप जुळवून घ्यावी लागेल, जिथं आपले पंखच त्यांना छाटावे लागतील, अशा शाळेत कोंडून अत्यंत बुद्धिमान् मुलांना आपण खरोखरीं कां म्हणून शिक्षा करावी?"

## स्वामी

**तो अस्तित्वांत आहे का?** तुमचीं सूत्रं हलवणाऱ्या कुणा धन्याचं अस्तित्व आम्हीं सुचवतों आहोंत असं तुम्हांला वाटेल. ज्यानं शाळा अगदीं गरजेप्रमाणं मापांत बेतल्या आहेत असा कुणीतरी!

तो खरोखरींच आहे का? बँका, उद्योगधंदे, राजकीय यंत्रणा, वर्तमानपत्रं, फॅशनी – साऱ्यांचीं सूत्रं ज्यांनीं आपल्या हातीं ठेवलीं आहेत असे टेबलाभोंवतीं जमलेले मूठभर लोक आहेत का?

आम्हांला ठाऊक नाहीं. ठाऊक आहे म्हटलं तर आमच्या ह्या पुस्तकाला एखाद्या रहस्यकथेचा वास यायचा. ठाऊक नाहीं म्हटलं तर आम्हीं बावळटपणाचा आंव आणतों आहोंत असं वाटेल. एखाद्या अगडबंब यंत्राचे सुटे भाग अगदीं आपोआपच आपापल्या जागीं चपखल बसले आहेत असं म्हटल्यासारखं होईल. आपलाआपणच युद्धाला सज्ज होऊन बाहेर आलेला, कुणी ड्रायव्हर नसलेला, रणगाडाच जणूं!

**पिएरिनोचं घर** याची किल्ली कदाचित् पिएरिनोच्या आयुष्याच्या कहाणीत गवसेल. तेव्हां त्याच्या घराकडे जरा प्रेमानं नजर टाकूं या.

डॉक्टर आणि त्यांची बायको दोघं सुखाच्या अगदीं शिखरावर पोचले आहेत. ते वाचतात, ते प्रवास करतात, मित्रांना भेटतात. ते आपल्या मुलाबरोबर खेळतात. त्याच्यावर बारीक लक्ष ठेवण्यासाठीं ते फुरसत काढतात. आणि हें सगळं ते फार चांगल्या तऱ्हेनं करतात. त्याचं घर पुस्तकांनीं आणि संस्कृतीनं भरलेलं आहे. पांचव्या वर्षीं मी फावडं धरायला शिकलों, तर पिएरिनो पेन्सिल धरायला.

एक दिवस, जणूं वस्तुस्थितीनंच हा निर्णय दिलेला आहे अशा रीतीनं, अर्धवट विनोदानं ते म्हणतात - "याला पहिलींत कशाला घालायचा? सरळ दुसरींतच बसवूं या ना!" मग आणखी विचार पण न करतां ते सरळ त्याला चांचणी परीक्षेला पाठवतात. झाला नापास तर झाला. त्याची चिंता कशाला!

पण तो नापास होत नाहीं. तो सगळे – ९ च्या ९ – गुण मिळवतो. त्यांच्या कुटुंबात प्रसन्न आनंद भरून राहतो – जसा तो माझ्या घरीं पण भरला असता.

**ओल्या जमिनीवर पाऊस** यांतला एकच विचित्रपणा असा की पिएरिनोच्या आईवडलांना जणूं कांहीं केवळ त्यांच्यासाठींच बनवलेला असा कायदा मिळतो. हा कायदा पांच वर्षांच्या मुलाला पहिलींत यायला मज्जाव करतो. पण सहा वर्षांच्या मुलाला दुसरींत प्रवेश करायला तो परवानगी देतो.

हा कायदा मुर्ख आहे कीं खरोखरी अतिधूर्त!

हा कायदा कांहीं या दोघांनी लिहिलेला नाहीं. याच्याआधीं तर त्यांना त्याबद्दल कांहींच माहिती नव्हती. पण मग हा कुणीं लिहिलेला आहे?

**खास प्रकार** हें असं चालूं झालं तसंच वर्षांमागून वर्ष सुरूं आहे. पिएरिनो नेहमींच वरच्या वर्गात जातो. आणि तो अभ्यास असा जवळजवळ करतच नसतो.

मी दांतओठ खात झगडून माझी वाट काढत असतों. आणि मी नापास होतों. पिएरिनो तर खेळ, आजची तरुण फॅसिस्ट संघटना, निरनिराळ्या संघटनांच्या सभा यांच्यासाठी वेळ काढतो. शिवाय वाढत्या वयांतले मानसिक ताण – एक वर्ष बंडखोरीचं तर एक मलूल होऊन बसण्याचं – या साऱ्यासाठीं त्याला वेळ असतो.

मला बाराव्या वर्षी जी समज होती तेवढी त्याला अठराव्या वर्षी पण नाहीं. पण तरी तो पुढंपुढंच सरकत राहतो. तो पूर्ण सन्मानांसकट पदवी घेईल. मोफत काम करणारा पदवीधर विद्यार्थी होईल.

**मोफत काम** होय. फुकट. पदवीधर विद्यार्थी विनापगार काम करतात. यावर कुणाचा विश्वास बसेल?

इथं आपल्याला दुसरा एक चमत्कारिक कायदा दिसतो. याला पूर्वीचे थोरथोर असे कायदेशीर दाखले आहेत. कार्लो आल्बेर्तोच्या कायद्यानं जाहीर केलं – "आमदार वा प्रतिनिधि यांच्या कार्यासाठीं कोणतेंहि वेतन वा भरपाई नको."

आतां हें कांहीं आर्थिक हिताबद्दलचें स्वप्नाळू दुर्लक्ष नव्हे पण तसं तोंडावर न बोलतां खालच्या वर्गांना बाहेर ठेवण्याची ती संभावित पद्धत आहे.

सभ्यगृहस्थ जेव्हां वर्गलढा चालवतात तेव्हां तो नेहमींच सभ्य रीतीचा असतो. 'पुरोगामी' किंवा बुद्धिवंत किंवा धर्मोपदेशक या कुणालाच तो कशाला दुखवेल?

**पिएरिनोची ‘मम्मा’** पिएरिनो मग प्राध्यापक होईल. आपल्या-सारखीच बायको तो शोधेल. दुसरा पिएरिनो ते जन्माला घालतील. पिएरिनोचीच आणखी पुढची आवृत्ति.

पिएरिनोच्या आईचा एकटीचा विचार आपण केला तर ती कांहीं जंगली जनावर नाहीं. ती फक्त जराशी स्वार्थी आहे. दुसरीं पण मुलं आहेत इकडे तिनं फक्त डोळेझांक केली आहे. मात्र तिनं पिएरिनोला इतर पिएरिनोंच्या भेटीपासून दूर ठेवलेलं नाहीं. ती आणि तिचा नवरा दुसऱ्या बुद्धिवंतांनींच घेरलेले आहेत. बदलायचं त्यांच्या मनांतच नाहीं हें उघड आहे.

पिएरिनोच्या वर्गबंधूंच्या एकतीस आयांना एकतर वेळ नाहीं. किंवा आहे त्याहून अधिक चांगलं कांहीं त्यांना माहीत नाहीं. त्या करतात तीं कामं इतक्या अपुऱ्या पगाराचीं आहेत कीं खर्च भागवण्यासाठीं त्यांना बाळपणापासून म्हातारपणापर्यंत पहांटेपासून रात्रीपर्यंत राबाबं लागतं.

पण ‘तिला’ – पिएरिनोच्या आईला – मात्र चोविसाव्या वर्षापर्यंत शिकणं शक्य होतं. खेरीज या इतर एकतीस आयांपैकीं कुणा एकीची तिला घरांत मदत होती – कुणा गियानीची आई – जिनं पिएरिनोच्या आईचं घरकाम करण्यापायीं स्वतःच्या मुलाची हेळसांड केली.

स्वतःच्या आवडी-छंद जोपासण्यासाठीं ‘तिला’ सारा वेळ मोकळा मिळतो. ही गरिबांकडची भेट आहे कीं श्रीमंतांनीं केलेली चोरी? तो हें दुसऱ्याबरोबर वांटून कां घेत नाहीं?

**सिंहाचा वांटा** पिएरिनोच्या आईबद्दल शेवटीं एवढंच म्हणतां येईल कीं ती क्रूर पशूहि नाहीं, पण ती निष्पापहि नाहीं. तिच्यासारख्या हजारों छोट्याछोट्या स्वार्थी वृत्ती एकत्र केल्या

तर भल्यामोठ्या वांट्यावर स्वतःचा हक्क सांगणाऱ्या या साऱ्या वर्गांचा पुरता स्वार्थीपणा आपल्याला दिसून येईल.

फॅसिझम, वर्गवाद, युद्ध, बेकारी या साऱ्या गोष्टी मोकाट सोडतांना हा वर्ग जराहि कचरलेला नाहीं. 'कांहींहि बदलूं नये यासाठी सारं कांहीं बदलून टाकणं' जर आवश्यक झालं तर कम्युनिझमला कवटाळायलाहि हा वर्ग जरासुद्धां मागंपुढं पाहणार नाहीं.

नेमकी यंत्रणा माहीत असणं कुणालाहि अशक्यच आहे. पण जेव्हां प्रत्येक कायदा पिएरिनोच्या फायद्याचा आणि आम्हांला दडपून टाकणारा असाच घडवलेला दिसतो, तेव्हां योगायोगावर विश्वास ठेवणं आम्हांला कठिण जातं.

## निवडपद्धतीनं आपलं ध्येय गांठलं आहे

**विद्यापीठामधें** विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांमधें हे 'लाडके लेक' ८६.५ टक्के आहेत. कामकऱ्यांचीं मुलं १३.५ टक्के. यांतल्या पदवी मिळवणारांत ९१.९ टक्के तरुण सद्गृहस्थ आणि ८.१ टक्के कामगार कुटुंबांतले आहेत.

साऱ्या गरिबांनी विद्यापीठांत एकजूट केली तर त्यांना आपला अर्थपूर्ण ठसा उमटवतां येईल. पण छे! श्रीमंतांकडून एखाद्या भावाप्रमाणं त्यांचं स्वागत केलं जातं आणि आपले सारे दोष बक्षीस म्हणून त्यांना बहाल केले जातात.

अंतिम परिणाम : १०० टक्के 'लाडके लेक'!

**राजकीय पक्षांत** निरनिराळ्या राजकीय पक्षांतून वेगवेगळ्या थरांवर काम करणारीं माणसं सारीं विद्यापीठाचीं पदवीधर असतात.

या बाबतींत कामगार संघटना पण निराळ्या नसतात. कामगार संघटना या लाडावलेल्या मुलांकडे बघून नाक मुरडत नाहींत. शिवाय हेसुद्धां मजूर-कामगार संघटनांकडे तुच्छतेनं बघत नाहींत. अर्थात् महत्त्वाच्या जागा त्यांना स्वतःला मिळत असतात तोंपर्यंतच.

‘गरिबांबरोबर’ काम करणं ही श्रीमंतांमधली ‘चालू’ गोष्ट आहे. म्हणजे ‘गरिबांबरोबर’ तितकंसं नाहीं, ‘गरिबांचं पुढारीपण’ खरं तर!

**उमेदवार** राजकारणी लोक उमेदवारांच्या छोट्या याद्या बनवतात, तेव्हां रंगसफेतीदाखल थोड्या कामगारांचीं नांवं त्यांत घालतात – लाज राखण्याइतपतच. पण तेव्हांसुद्धां विद्यापीठाच्या पदवीधरांना प्राधान्य मिळेल अशी ते काळजी घेतात. ‘काम कसं करून घ्यावं हें ज्यांना ठाऊक आहे, त्यांच्यावरच हें सोंपवा. कायदेमंडळांत वावरतांना एखाद्या कामगाराला वाट चुकल्यासारखं होईल. आणि शिवाय डॉ. क्ष आपल्यापैकींच तर आहे!’

**कायदेमंडळ** थोडक्यांत जुन्या कायद्यांवर खूष असलेलीं माणसंच नवे कायदे करण्यासाठीं निवडून आलीं आहेत. बदलली गेलीच पाहिजे अशा परिस्थितीत स्वतः कधींच न जगलेलीं अशींच केवळ हीं माणसं आहेत – खरं तर राजकारणांत काम करतां कामां नये अशींच!

लोकसभेंत ७७ टक्के पदवीधर आहेत. ह्यांनीं आपल्या मतदारांचं प्रतिनिधित्व करावं अशी कल्पना. पण लोकसंख्येच्या १.८ टक्के मतदारच फक्त विद्यापीठाची पदवी असलेले आहेत.

लोकसभेत कामगार आणि मजूर संघटनेचे प्रतिनिधि ८.४ टक्के. इकडे मतदारांत हेंच प्रमाण ५१.१ टक्के. शेतकरी लोकसभेत ०.१ टक्का, तर एकंदर मतदारांत २८.८ टक्के.

**काळी शक्ति** स्टोकली कारमायकेल आतांपर्यंत सत्तावीस वेळां तुरुंगांत गेला. त्याच्या शेवटच्या खटल्याच्या वेळीं त्यानं जाहीरपणं सांगितलं की "मी विश्वास टाकूं शकेन असां एकहि गोरा माणूस नाहीं."

तेव्हां आपलं सारं आयुष्य निग्रो लोकांच्या प्रश्नाला वाहिलेला एक गोरा युवक ओरडला, "स्टोकली, एकहि नाहीं का?" तेव्हां स्टोकली जमावाकडे वळला, आपल्या मित्राकडे त्यानं रोखून पाहिलं आणि पुन्हां सागितलं, 'नाहीं, एकदेखील नाहीं!'

कारमायकेलचं बोलणं त्या गोऱ्या तरुणाला अपमानाचं वाटलं तर कारमायकेल बरोबर ठरेल. तो जर खरोखरींच या निग्रोंच्या बाजूनं असेल तर त्या गोऱ्या तरुणानं हें गिळलंच पाहिजे. त्यानं बाजूला व्हावं आणि या निग्रोंवर प्रेम करत राहावं. कदाचित् कारमायकेल याच क्षणाची वाट पाहात असेल!

बार्बियानाच्या शाळेच्या कुठल्याहि प्रकाशनाचं डाव्या आणि तटस्थ वर्तमानपत्रांनी कौतुकच केलं आहे. या पुस्तकानंतर मात्र ते कदाचित् उजव्यांना सामील होऊन आमचा राग करायला लागतील. मग इतर साऱ्या पक्षांपेक्षां मोठा असा एक पक्ष आहे हें स्पष्ट होईल – 'इटालियन महाविद्यालयीन पदवीधरांचा पक्ष'.

## तुम्हीं कुणासाठीं शिकवतां आहांत?

**चांगुलपणा** शिक्षकांचा चांगुलपणा ही अगदीं वेगळीच गोष्ट आहे.

तुम्हांला पगार सरकारकडून मिळतो. मुलं तर अगदीं तुमच्यासमोरच असतात. तुम्हीं तुमचा इतिहास अभ्यासला आहे. तुम्हीं तो शिकवतां पण. तुम्हांला खरं तर अधिक स्वच्छपणं उमजायला हवं.

अर्थात् तुम्हीं फक्त निवडक मुलांनाच बघतां आणि तुमचे संस्कार तुम्हांला पुस्तकांमधून मिळालेले आहेत. आणि हीं पुस्तकं प्रस्थापित समाजांतल्या लोकांनींच लिहिलेलीं आहेत. लिहितां येतं असे तेच फक्त आहेत पण तुम्हांला ओळीमधल्या कोऱ्या जागा वाचतां यायला हव्या होत्या. हें सारं आम्हीं तुमच्या बऱ्यासाठींच करतों आहोंत अस तुम्हीं कसं म्हणून शकतां?

**नाझी** तुम्हांला समजून घेण्याचा मी प्रयत्न करतों. तुम्हीं इतके सुसंस्कृत दिसतां! गुन्हेगाराची पुसटशी झांकसुद्धा तुमच्यामधें नाहीं. पण कदाचित् नाझी गुन्हेगाराचा थोडासा अंश असावा. साबणाच्या पेट्यांची संख्या तपासणारा तो अतिप्रामाणिक, एकनिष्ठ नागरिक! आंकड्यामधें चुका होऊं नयेत म्हणून तो डोळ्यांत तेल घालून काळजी घेईल – (चार, की चाराहून कमी?) पण हा साबण माणसाच्या चरबीपासून बनवला आहे किंवा काय हा प्रश्न त्याला पडत नाहीं!

**माझ्यांपेक्षांहि भित्रे** हें तुम्हीं कुणासाठी करतां आहांत? शाळेचा तिटकारा वाटावा अशी कळा तिला आणून आणि सगळ्या गियानींना रस्त्यावर फेंकून देऊन तुम्हांला काय मिळतं?

मी कधींहि नव्हतों इतके तुम्हीं भित्रे आहांत, हें मी दाखवून देऊ शकेन तुम्हांला! तुम्हीं पिएरिनोच्या आईवडलांना घाबरतां का? कीं उच्च माध्यमिक शाळेंतल्या तुमच्या सहकाऱ्यांना घाबरतां? कीं शिक्षणाधिकाऱ्याला?

तुमच्या व्यावसायिक जीवनाचीच जर तुम्हांला चिंता असेल तर त्याला एक उपाय आहे. तुमच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या वेळीं थोडी लबाडी करा. बाकांच्या रांगांमधून वर्गांत फेऱ्या मारतांना विद्यार्थ्यांच्या पेपरांतल्या थोड्या चुका दुरुस्त करा.

**शाळेच्या चांगल्या नांवासाठीं** किंवा कदाचित् जें इतकं साधं नि स्पष्ट आहे त्याला नसाल तुम्हीं घाबरत. कदाचित् तुमच्या सद्सद्विवेकबुद्धीलाच तुम्हीं भीत असाल! असं असेल तर तुमची सदसद्विवेकबुद्धि चुकीच्या पायावर उभारलेली आहे.

'या मुलाला वर चढवणं शाळेच्या नांवलौकिकाला हानिकारक आहे असं मला वाटतं.' – एका मुख्याध्यापकानं आपल्या अहवालांत लिहिलं.

पण शाळा कोण? आम्हींच तर शाळा! तिची चाकरी म्हणजे आमचीच चाकरी!

**मुलाच्या भल्यासाठीं** "अखेर हें सारं मुलाच्याच भल्यासाठी आहे. हे विद्यार्थी माध्यमिक शाळेच्या उंबरठ्यावर उभे आहेत हें आपण विसरून चालणार नाहीं." – एका छोट्या ग्रामीण शाळेचा मुख्याध्यापक तोऱ्यांत ओरडला.

तिसांपैकीं फक्त तीनच मुलं वरच्या वर्गात जाणार आहेत हें लगेंचच कळून चुकलं. एका दुकानदाराची मुलगी

मारिया, एका शिक्षकाची मुलगी ॲना, आणि अर्थातच पिएरिनो. पण आणखी मुलं पुढं शिकायला गेली असतीं तर काय फरक पडणार होता?

तो मुख्याध्यापक रेकॉर्ड-प्लेअरवरची आपली ध्वनीमुद्रिका बदलायला विसरला आहे. शाळेमधल्या विद्यार्थ्यांच्या संख्येंतली वाढ अजून त्याच्या लक्षांत आलेली नाहीं. पहिल्या यत्तेमधलीं ६ लाख ८० हजार मुलं – हें एक जिवंत वास्तव! त्यांतलीं बरीचशीं गरीब. श्रीमंत अगदींच हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीं.

ते म्हणतात तसा हा प्रश्न वर्गविहीन शाळेचा नाहीं. त्यांची स्वतःची शाळा एकवर्गीयच आहे. इतरांना मागं सारून पुढं जाण्याकरतां जवळ पैसा असलेल्यांच्या सेवेसाठीं!

**न्यायासाठीं** एक नाजूक भावली म्हणाली - "अभ्यासांत मागं असलेल्या विद्यार्थ्याला पास करणं म्हणजे चांगल्या विद्यार्थ्यावर अन्यायच!"

पिएरिनोला बाजूला घेऊन एका उपदेशकथेंत द्राक्षमळ्यां-तल्या कामगारांबद्दल येशू म्हणाला होता तसं कां सांगू नये – 'मी तुला पास करतों आहें. कारण तूं शिकला आहेस. तुला दुहेरी वरदान मिळालं आहे. तूं पासहि होतोस, आणि शिकलाहि आहेस. गियानीला पण मी पास करणार आहें – उत्तेजन देण्यासाठीं. शिकतां नाहीं आलं बिचाऱ्याला!'

**समाजासाठीं** समाजाची कांहीं जबाबदारी आपल्यावर आहे अशी दुसऱ्या एका शिक्षिकेची खात्री आहे : "आज मीं त्याला पास करून चौदा वर्षं वयाच्या मुलांच्या वर्गात घातलं – आणि उद्यां तो एम.डी. होऊन बाहेर पडला तर –"

**समता** व्यवसाय, संस्कृति, कुटुंब, शाळेचा लौकिक – तुमच्या विद्यार्थ्यांच्या प्रतवारीसाठी अगदीं छोटे तराजू तुम्हीं वापरतां आहांत. ते खरोखरींच क्षुद्र आहेत. शिक्षकाचं जीवन व्यापण्यासाठीं फारच लहान!

तुमच्यापैकीं कांहींना उमगलं आहे, पण बाहेर पडायची वाट सांपडत नाहीं. सारखी त्या पवित्र शब्दाची धास्ती. आणि तरी दुसरा कांहीं पर्यायच नाहीं. आज माणसाचं जीवन फक्त राजकारण व्यापूं शकतं.

अफ्रिकेंत, आशियामधें, लॅटिन अमेरिकेंत, दक्षिण इटालींत, डोंगराळ भागांत, शेतांत – अगदीं शहरांतूनसुद्धां – लक्षावधि मुलं बरोबरीनं ओळखलं जाण्याची वाट पाहात आहेत – माझ्यासारखी बुजरीं, सांद्रोसारखीं मूर्ख, गियानीसारखीं आळशी – मानव समाजाचं सर्वात चांगल रूपडं!

# आम्हीं ह्या सुधारणा सुचवतों

१. विद्यार्थ्यांना नापास करूं नका.
२. निर्बुद्ध वाटणाऱ्या मुलांसाठीं दिवसभराची शाळा ठेवा.
३. आळशासमोरसुद्धां कांहीं उद्दिष्ट ठेवा.

## १. नापास करूं नका

**टर्नर** फक्त चांगले बनलेले तेवढेच भाग पोंचवण्याची परवानगी लेथवर काम करणाऱ्या कामगाराला नसते. नाहींतर सारेच भाग चांगले बनावेत म्हणून तो धडपडणारच नाहीं.

पण तुम्हीं – तुम्हीं मात्र मनाला येईल तेव्हां आपल्याला न आवडणारे भाग टाकून देऊं शकतां. नक्कींच पास होतील असे आणि तेसुद्धां कांहीं शाळेमुळं नाहींच, बाहेरच्याच गोष्टींमुळं – अशांचींच काळजी घेण्यात तुम्हांला धन्य वाटतं.

**लघुतम साधारण विभाजक** ही पद्धत आज बेकायदेशीर आहे.

३४ व्या कलमामधें घटनेनं प्रत्येकाला आठ वर्षं शाळेच्या शिक्षणाचं आश्वासन दिलं आहे. आठ वर्षं याचा अर्थ आठ वेगवेगळ्या यत्ता. प्रत्येक यत्तेंत दोन वर्षं घालवून चार यत्ता नव्हेत. एरवीं कलम चौतीस हा घटनासमितीला न शोभणारा आणि दळिद्री असा शब्दांचा खेळ ठरेल.

माध्यमिक शाळेंतल्या शेवटच्या यत्तेंपर्यंत पोंचणं ही आज चैनीची गोष्ट नाहीं. ती किमान सांस्कृतिक गरज आहे, तो प्रत्येकाचा हक्क आहे. ज्या माणसाला तो मिळत नाहीं तो समान नाहीं.

**स्वाभाविक कल** चांचणी घेऊन स्वाभाविक कल ठरवण्याच्या वर्गीय सिद्धांतामागं यापुढं तुम्हांला दडतां येणार नाहीं.

सगळ्या विषयांत पास होऊन माध्यमिक शाळेच्या तिसऱ्या यत्तेपर्यंत पोंचण्याइतका पुरेसा 'कल' प्रत्येक मुलाजवळ असतोच.

'हा विषय तुझ्यासाठीं नव्हेच' असं एखाद्या मुलाला सांगणं इतकं सोयीचं आहे! तो मुलगा तें मान्य करेल. कारण तो शिक्षकाइतकाच आळशी आहे. पण त्याला ठाऊक असतं कीं आपले शिक्षक कांहीं आपल्याला 'समानां'त गणत नाहींत.

अन् दुसऱ्या एखाद्या मुलाला मात्र हाच शिक्षक म्हणतो, 'तूं बघ, ह्याच विषयासाठीं जन्मला आहेस." हें कांहीं शहाणपणाचं लक्षण नाहीं. उलट त्याला एखाद्याच विषयाची वाजवीपेक्षां जास्त गोडी असली तर त्याचा अभ्यास करायची मनाई त्याला केली पाहिजे. त्याची केस 'तोल गमावलेली किंवा 'खास' अशी समजा. एकाच खास विषयांत स्वतःला कोंडून घ्यायला त्याला नंतरच्या आयुष्यांत भरपूर अवधि आहेच.

**किरकोळीनं** कोणत्याहि मार्गानं प्रत्येक मुलाची प्रत्येक विषयांत प्रगति करून घेणं तुम्हांला बंधनकारक असतं तर त्या सर्वांनीं व्यवस्थित अभ्यास करावा असा मार्ग शोधण्यासाठीं तुम्हीं आपल्या बुद्धीला ताण दिला असतां.

मी तर तुम्हांला किरकोळीनंच पैसे देईन. एक विषय शिकणाऱ्या प्रत्येक मुलागणिक इतके! किंवा याहून चांगलं म्हणजे तो विषय शिकूं न शकणाऱ्या प्रत्येक मुलामागं दंड!

मग तुमची नजर नेहमीं गियानीवरच खिळून राहील. सगळ्या मुलांप्रमाणं त्यालाहि देवानं दिलेली बुद्धि तुम्हीं त्याच्या मंद नजरेत शोधाल. कोणत्याहि कुटुंबांत दिसतं तसंच तुम्हीहि बुद्धिमान् मुलाकडे दुर्लक्ष करून तुमची सर्वांत जास्त गरज असलेल्यासाठीं झगडाल. रात्रीं झोंपेंतदेखील त्याचाच विचार करतांना तुम्हांला जाग येईल. आणि त्याला शिकवण्यासाठीं नवेनवे मार्ग शोधायला तुम्हीं धडपडाल – त्याच्या गरजांना पूरक ठरतील असे मार्ग. तो वर्गांत दिसला नाहीं तर त्याला आणण्यासाठी त्याच्या घरीं तुम्हीं जाल.

तुम्हीं स्वतःला स्वस्थ बसूंच देणार नाहीं. कारण जी शाळा गियानींना शिक्षण अपुरं टाकूं देते ती 'शाळा' म्हणवून घ्यायच्या लायकीचीच नाहीं.

**तुम्हीच मध्ययुगीन आहांत** फारच झालं तर आमच्या शाळेंत आम्हीं छडीचादेखील वापर करतों.

उगीच फार शिष्टपणा दाखवूं नका. तुमचे सगळे शैक्षणिक सिद्धांत विसरून जा. तुम्हांला चाबकाची गरज असेल तर मी तो देईन. पण प्रगतिपुस्तकांच्या गठ्ठयावर पडलेलं तें पेन आधीं फेंकून द्या. चाबकाची निशाणी दुसऱ्याच दिवशीं नाहींशी होते. त्या पेनची खूण साऱ्या वर्षभर शिल्लक राहते.

तुमच्या त्या सुंदर 'आधुनिक' पेनमुळं गियानी आयुष्यांत कधींहि एकदेखील पुस्तक वाचूं शकणार नाहीं. त्याला साधं पत्र लिहितां येणार नाहीं. ही प्रमाणाबाहेरची क्रूर शिक्षा झाली.

**गणित** एकाहि विद्यार्थ्याला नापास करतां येत नसेल तर तक्रारीला जागा फक्त गणिताच्या शिक्षकाला राहील. कारण पहिल्या यत्तेचाच अभ्यास न शिकलेल्याला दुसऱ्या-तिसऱ्या यत्तेचे धडे देणं निरर्थक आहे.

पण गणित हा अनेक विषयांमधला एक आहे. न येणाऱ्या गणिताच्या दर आठवड्याच्या तीन तासांमुळं चांगला अभ्यास करता येतो असे बाकीचे २३ तास विद्यार्थ्याला गमवायला लागतां काम नयेत.

**थोडसं पुरे आहे** विधानसभेंत लॅटिनवर झाली तशी एखादी चर्चा इथं आपल्याला गणिताच्या प्रश्नावर करतां येईल.

कामावर किंवा घरीं तांतडीच्या कामांसाठीं कुणाहि माणसाला किती गणित येण्याची गरज आहे? किंवा वर्तमानपत्र वाचण्यासाठीं? दुसऱ्या शब्दांत विचारायचं तर तज्ज्ञबिज्ज्ञ नसलेल्या सामान्य सुसंस्कृत माणसाला कितीसं गणित लक्षांत असतं?

आठवर्षांच्या शिक्षणक्रमांत शिकलेलं साधं अंकगणित – गुंतागुंतीच्या आंकडेमोडी – नि बीजगणित सोडून!

बीजगणित हा शब्द भाषेचा एक अर्थपूर्ण भाग कसा करावा हा प्रश्न उरतोच. पण वर्षभरांतल्या एखाद्या तासांतसुद्धां तें करतां येईल!

## २. पूर्णवेळ शिकवणं

**उजळणी** अभ्यासक्रम पुरा करण्यासाठीं प्रत्येक विषयाला आठवड्याचे दोन तास हे प्रत्येक विद्यार्थ्याला पुरेसे नाहींत, हें तुम्हांला पण पुरतं ठाऊक आहे.

यावर आत्तांपर्यंत आपल्याजवळ ठरीव उच्चवर्गीय तोडगा होता - गरिबानं पुन्हां त्याच यत्तेंत बसावं. मध्यमवर्गीय लोकांसाठीं तुम्हीं शिकवणी देऊं करतां. शाळेच्या तासांनंतर – पैशासाठीं. म्हणजे धड्यांची पुन्हां उजळणी करणं शक्य होतं. आणि उच्चवर्गीय मुलांच्या बाबतींत याची काळजी आधींच घेतलेली असते. कारण त्यांना जें आधींच ठाऊक असतं त्याचीच ते शाळेंत उजळणी करत असतात. पिएरिनोला प्रत्येक गोष्ट घरींच समजावून सांगितलेली असते.

‘दोपोस्कुओला’ हा याला कितीतरी चांगला पर्याय आहे. मुलगा तोच अभ्यास पुन्हां दुपारीं करेल. पण त्याला वर्ष गमवावं लागणार नाहीं, पैसे खर्चावे लागणार नाहींत आणि त्याच्या प्रयत्नांत आणि – समजा तो नापासच झाला तर – अपयशांत तुम्हीं त्याच्या पाठीशी असाल.

**वर्गविहीन शाळा** हा मुखवटा आपण जरा दूर करूं या. जोपर्यंत तुमची शाळा वर्गनिष्ठ राहते आणि गरिबांना पळवून लावते, तोंपर्यंत श्रीमंताला हुसकावून लावणारी ‘दोपोस्कुओला’ निर्माण करणं हाच ही व्यवस्था मोडण्याचा प्रामाणिक मार्ग आहे.

आमच्या या उपायामुळं तुमच्यापैकी कुणी अस्वस्थ होतील. पण तरीहि खाजगी शिकवण्या आणि नापास होणारीं इतकीं मुलं यामुळं तर त्यांना कधींच धक्का बसत नाहीं. ते कसले आले आहेत प्रामाणिक!

पिएरिनो कांहीं वेगळ्या वंशांत जन्मलेला नाहीं. तो वेगळा झाला त्याच्या घरच्या – शाळेबाहेरच्या – तासांत मिळणाऱ्या वेगळ्या वातावरणामुळं. बाकीच्या मुलांसाठीं त्यांची स्वतःची

संस्कृति कायम राखून दोपोस्कुओलानं या तोडीचं वातावरणं निर्माण केलं पाहिजे.

**वातावरण** तुम्हांला घाबरवतो 'पूर्णवेळ' हा शब्द! सध्यां तुम्हीं मुलांना कांहीं तासच ताब्यांत ठेवतां. तेंसुद्धां पुरतं कठिण आहे असं तुम्हांला वाटतं. पण खरं तर तुम्हीं कधीं धड प्रयत्नच केलेला नाहीं.

आतांपर्यंत तुम्हीं वर्ग चालवला आहे तो शाळेच्या घंटेच्या दडपणाखालीं आणि जूनपर्यंत पुऱ्या करायच्या अभ्यासक्रमाला धास्तावून! एखादी चर्चा तुम्हीं कधी शेवटापर्यंत चालवूं शकलां नाहींत. समोरच्या कोंवळ्यां मुलांच्या कुतूहलाला कधीं उत्तर दिलं नाहींत. आपलं क्षितिज तुम्हांला कधीं विस्तारतांच आलं नाहीं.

परिणाम असा झाला कीं प्रत्येक गोष्ट तुम्हीं वाईट तऱ्हेनंच केलीत. तुम्हीं सदैव वैतागलेल्या असतां आणि तशींच मुलंहि! कामाच्या तासांनीं नाहीं - तर या वैतागानंच तुम्हांला थकवलं आहे.

**श्रद्धा हवी** अगदीं प्राथमिक यत्तेपासूनच 'दोपोस्कुओला' सुरु करा. अगदीं रविवार, नाताळ, ईस्टर आणि उन्हाळ्याच्या सुट्टींतसुद्धां. मुलांना आणि त्यांच्या पालकांना असं कांहीं दिलेलंच नाहीं तोपर्यंत त्यांना तें नकोच आहे असं कसं म्हणतां येईल.

परिपत्रकाच्या विटलेल्या प्रतीच फक्त पालकांना पाठवून देणारा मुख्याध्यापक – त्यानं 'दोपोस्कुओला' सुरूं करायचा खरोखरीं प्रयत्न केला होता असं नाहीं म्हणतां यायचं. एखादी नवी चांगली वस्तूदेखील बाजारांत जशी जाहिरात-मोहीम काढून

आणली जाते, 'दोपोस्कुओला'ची सुरवात तशीच केली पाहिजे. सुरवात व्हायच्या आधींच विश्वास वाटला पाहिजे.

## पूर्णवेळ काम आणि कुटुंब

**ब्रह्मचर्य** पूर्णवेळ शाळा असं धरून चालते कीं शिक्षकांची कौटुंबिक कर्तव्यं आड येणार नाहींत. जोडप्यानं-पतिपत्नींनीं मिळून - घरीं चालवलेली, ठरीव वेळापत्रक नसलेली आणि प्रत्येकाला खुली असलेली शाळा - हें पूर्णवेळ शाळेचं उत्तम उदाहरण होईल.

गांधींनी हें केलं. त्यांनीं आपलीं मुलं दुसऱ्या मुलांमधें ठेवलीं. तीं आपल्यापेक्षां वेगळीं होण्याचा धोका पत्करूनदेखील! तुम्हांला जमेल हें?

दुसरा उपाय म्हणजे ब्रह्मचर्य!

ब्रह्मचर्य हा सध्यांचा चलतींतला शब्द नाहीं.

येशूच्या मृत्यूनंतर हजार वर्षंपर्यंत धर्मोपदेशकांपुरती चर्चला ही कल्पना कळली होती.

गांधी पस्तीस वर्षांचे असतांना, लग्नाला बावीस वर्षं लोटल्यावर, त्यांना याचा अर्थ उमगला तो शाळेच्या संदर्भांत.

स्वतःचे निर्बीजीकरण करून घेतलेल्या एका कामगाराकडे एकदां माओनं आपल्या सहकाऱ्यांचं लक्ष वेधलं. त्यांनीं त्याचं कौतुक करावं म्हणून. इटालियन 'चिनी' याचा उल्लेख करायला-सुद्धां बिचकतात.

**८८,०००** ब्रह्मचर्य स्वीकारायला तुम्हांला अजून हजार वर्षं लागतील. पण मधल्या काळांत तुम्हांला निदान एवढं करतां येईल : ब्रह्मचर्याच्या विचाराचं गुणगान करा. आणि तुमच्याकडे

असलेल्या अविवाहित शिक्षकांचा चांगला उपयोग करून घ्या.

सगळ्या शाळांतल्या ४ लाख ११ हजार शिक्षकांपैकी ८८ हजार सध्यां अविवाहित आहेत. पैकीं ५५ हजार कधींच लग्न करणार नाहींत. शिकवण्यासाठीं आपण पूर्ण वेळ देऊं शकतों, हें दुर्दैव नसून वरदान आहे – हें दुसऱ्यांना आणि स्वतःलाहि कां सांगत नाहीं?

अविवावहित शिक्षकांत मानवी भावना कमी असतात अशी एक सध्यां समजूत आहे. ती कितपत खरी आहे मला ठाऊक नाहीं.

ज्या दिवशीं शिक्षक ब्रह्मचर्याचा निःस्वार्थीपणं स्वीकार करतील, त्या दिवशीं कदाचित् त्यांना शाळेबद्दल उत्कट आत्मीयता वाटायला लागेल. ते मुलांवर प्रेम करायला लागतील आणि त्यांना पण मुलाचं प्रेम मिळेल. सर्वांत महत्त्वाचं असं कीं एक यशस्वी शाळा चालवण्याचा आनंद त्यांना मिळेल.

## पूर्णवेळ आणि संघटनेचा हक्क

**मोठ्या लढाया** शिक्षक संघटनेचं बातमीपत्र आमच्या वाचण्यांत आलं. त्यांत म्हटलं होतं – “नाहीं! शिकवण्याच्या तासांत वाढ! – शक्य नाहीं! शिकवण्याच्या कामाचं वेळापत्रक कमी करण्यासाठीं मोठेमोठे लढे झाले. आतां पुन्हां मूळपदावर येणं हा मूर्खपणा ठरेल!”

आम्हांला धक्काच बसला. स्पष्ट सांगायचं तर एकहि शब्द आमच्या तोंडून निघत नाहीं. प्रत्येक कामगार आपले कामाचे तास कमी करण्यासाठीं लढा देत असतो आणि त्यानं तें करावंहि.

**असामान्य विशेष हक्क** पण तुमचं कामाचं वेळापत्रक खरोखरींच लाज आणणारं आहे.

मजूर वर्षाकाठीं २१५० तास काम करतो. सरकारी नोकरी-मधले तुमचे सहकारी १६३० तास काम करतात. आणि तुम्हीं जास्तींत जास्त ७३८ पासून कमींत कमी ४६८ तास काम करत असतां.

आपल्याला घरीं अभ्यास असतो आणि पेपर तपासावे लागतात, हा तुमचा खुलासा कांहीं खरा नाहीं. न्यायाधिशांनासुद्धां आपलीं निकालपत्रं कोर्टाबाहेरच लिहावीं लागतात. खेरीज तुम्हांला चांचण्या टाळतां येतील किंवा घेतल्याच तरी त्या घेतांघेतांच मुलांबरोबर वर्गांतच पेपर तपासतां येतील.

तुमच्या तयारीबद्दल आणि अभ्यासाबद्दल म्हणाल तर अभ्यास आपल्या सर्वांनाच करावा लागतो. मजुरांना तर तुमच्याहूनदेखील जास्ती. आणि संध्याकाळचा एकदा अभ्यासक्रम घेतला तर त्याबद्दल कांहीं ते मोबदला मागत नाहींत.

आम्हीं पुन्हां एकदां म्हणतों कीं तुमचे कामाचे तास हा संचालक मंडळींनीं तुम्हांला दिलेला विशेष हक्क आहे. त्यामागं त्यांचीं कांहीं खास कारणं आहेत. तो कांहीं संघटनेनं मिळवलेला विजय नाहीं.

**मन खचून जाणं** त्याच बातमीपत्रांत आणखी असं पण होतं कीं हे कामाचे तास कुणाहि सामान्य माणसाच्या मनाच्या नि शरीराच्या शक्तींचा ऱ्हास करायला पुरेसे आहेत.

आपला हात कधींहि गमावण्याची सतत धास्ती असतांना कामगार यंत्रावर दिवसाचे आठ तास काम करतो. त्याच्यासमोर तरी अशाप्रकारें बोलायचं धाडस तुम्हीं करूं नये.

शिवाय पैसे देऊं करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिकवणीला मात्र दमणुकीचा मुद्दा येऊ न देतां होकार देणारे हजारों शिक्षक आहेतच. त्यांना तुम्हीं काढून टाकत नाहीं तोंपर्यंत तुमची बाजू लंगडीच आहे. संघटनेचे हक्क मिळायला पात्र असे कामगार म्हणून तुम्हांला मान्यता देणं कठिण आहे.

**संप** उदाहरणार्थ, संप करण्याचा हक्क. तो प्रत्येक कामगाराचा परमपवित्र हक्क आहे. पण तुमच्यासारखं वेळापत्रक असणाऱ्या माणसानं संपावर जाणं किळसवाणं आहे.

गांधींचा जरा जास्त अभ्यास करा. मग संपाइतकीच प्रभावी पण त्यापेक्षां वेगळीं अशी तंत्रं तुम्हांला उमगतील.

यावर खरा उत्तम उपाय म्हणजे तुम्हीं न्यायाधिशांच्या संघटनेंत सामिल होणं. तुमचं काम न्यायाधिशाच्या कामासारखं असतं - परीक्षा, गुणचर्चा, चांचण्या, अहवाल वगैरे. त्या वेळांत तुम्हीं संपावर जायला हरकत नाहीं.

त्यांऐवजीं जे कांहीं थोडे तास प्रत्यक्ष शिकवायचे पडतात त्यांत तुम्हीं काम करणं थांबवाल, तर तुम्हांला आमच्याबद्दल एवढीशीसुद्धां पर्वा नाहीं असंच लोकांना वाटेल.

## पूर्णवेळ कोण शिकवेल?

सध्यांचं वेळापत्रकं पाहिलं तर शाळा म्हणजे गरिबांविरुद्ध युद्ध आहे. शिकवण्याचे तास सरकारला वाढवतां येत नसतील, तर मग सरकारचा शाळांशीं कांही संबंधच नसावा.

हा अत्यंत गंभीर निष्कर्ष आहे. आतांपर्यंत सरकारी शाळा ही खाजगी शाळांपेक्षां सुधारणेची पुढची पायरी समजली जात होती. कदाचित् आतां आपल्याला प्रत्येकच गोष्टीचा पुन्हां

विचार करावा लागेल आणि शाळा दुसऱ्या कुणाच्या तरी हातीं सोंपवाव्या लागतील. शिकवायची – आणि तें पण आम्हांला शिकवायची – ध्येयवादी ऊर्मि असणाऱ्या कुणाच्या तरी हातीं.

**शब्द जपून वापरा** आपले पाय जमिनीवरच टेकलेले असूं देत.

सकाळच्या वेळीं आणि हिवाळ्यामधें शाळा सरकारला चालवूं द्या. त्या तशाच 'वर्गविहीन' पण राहूं देत. तुमचे शब्द बघा! श्रीमंतांचा वर्गवाद 'वर्गविहीनता' म्हणून ओळखला जातो.

दुपारीं आणि उन्हाळ्याच्या दिवसांत दुसऱ्या कुणाला तरी त्या चालवाव्या लागतील – आणि त्यादेखील वर्गभेदांशिवाय. पुन्हां तुमचे शब्द पहा! वर्गभेदांच्या अभावाला श्रीमंतांकडून 'वर्गीयता' म्हटलं जाईल.

**नगरपालिका** पहिला तोडगा म्हणजे ह्या शाळा नगर-पालिकांकडे सोंपवणं. त्यांचं शाळा चालवणं आम्हांला अनुकूल आहे कीं नाहीं, हें आम्हांला बघूं दे. अस्फाल्टचे रस्ते, नवी प्रकाश-योजना किंवा क्रीडांगण काय राजेशाहीचे पुरस्कर्तेदेखील पुरवूं शकतात.

हें काम नगरपालिकेच्या अखत्यारींत पडत नाहीं असं म्हणून प्रादेशिक प्रशासकीय मंडळानं कानांवर हात ठेवले तर 'हा कायदा तर ३१ सालीं फॅसिस्टांनीं बनवलेला आहे' असा प्रतिवाद लोकांना करतां येईल.

प्रादेशिक प्रशासकावर सारा दोष टाकून स्वतः कांहींहि न करणं नगरपालिकेला सोपंच आहे.

**कम्युनिस्ट** नगरपालिका कदाचित जरासुद्धां बधणार नाहीं. वर्गीय प्रश्नांना तोंड देण्याची वेळ येते तेव्हां कम्युनिस्टदेखील कच खातात. पांढरपेशा कामगारांना आणि दुकानदारांना विरोध करण्याचं धाडस त्यांच्यांत आहे का?

पक्षाचा एक बडा पुढारी अगदी ठांसून सांगत होता - शाळा शासनाच्याच अखत्यारीत असणं आवश्यक आहे. 'आम्हीं सत्तेवर आलों कीं – 'वीस वर्षं उलटलीं. कम्युनिस्ट त्या सत्तेपर्यंत अजूनी पोंचलेले नाहींत. आम्हीं गवत वाढायची वाट बघतों आहोंत, पण तोंपर्यंत गाई मरताहेत ना!

**धर्मोपदेशक** 'दोपोस्कुओला' कदाचित् धर्मोपदेशक चालवूं शकतील. पण ईश्वरासारखं बिनशर्त प्रेम त्यांना नाहीं करतां येत. श्रीमंतांना शिकवायचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांचं सारं आहे तसं चालू देणं असंच ते मानतात.

**संघटना सभासद** कामगार संघटना याच फक्त कामकऱ्यांच्या संस्था आहेत. तेव्हां मग दोपोस्कुओला त्यांनींच सुरूं कराव्या.

पण या संघटनांचे सभासद तूर्त तरी कांहीं नुसतं ऐकायला-सुद्धां तयार नाहींत. त्यांचं म्हणणं असं कीं आधुनिक लोकशाहीमधें प्रत्येक सार्वजनिक संस्थेला स्वतःचं असं काम असतं. आणि तिनं दुसऱ्याच्या कामांत लुडबुड करणं कांहीं बरोबर नाहीं.

तेसुद्धां एका दुबळेपणाच्याच आहारीं गेलेले आहेत. आणि तरीदेखील आजकालचे युवक प्रत्येकच गोष्टीबद्दल उदासीन असतात अशी त्यांची कुरकुर असतेच. संप करायला लोकांना संघटित करणं, नवीन सभासद-नोंदणी करणं, कार्यकर्ते आणि पूर्णवेळ पदाधिकारी मिळवणं-हें दिवसेंदिवस कठिण होत चाललं

आहे असं ते म्हणतात. आणि दरम्यान संचालक मंडळींनीं चाललेल्या शाळांमधें मुलं आपलीं वाढत राहतात.

**निदान प्रयत्न तर करा** पुरेशा ठेंचा खाल्ल्यावर संघटनेचे सन्मान्य सभासद आपले हे विचार बदलतीलहि. पण तोंपर्यंत किमान कांहीं स्थानिक प्रयोग सुरूं करायला त्यांना काय हरकत आहे?

शाळेला तसं लागत तरी काय? कांहीं खडू, फळा, थोडीं जुनीं पुस्तकं, शिकवायला चार मोठीं मुलं, आणि अधूनमधून पैसे न घेतां नवनवीन गोष्टींबद्दल बोलेल-सांगेल असं कुणीहि.

## पूर्णवेळ आणि विषय

**डॉन बोर्धी** आम्हीं हें पत्र लिहीत असतांनाच डॉन बोर्धी (डॉन मिलानींचे धर्मोपदेशक मित्र) आम्हांला भेटायला आले. त्यांनीं आमच्यावर टीका केली : "प्रत्येक मुलानं शाळेंत गेलंच पाहिजे आणि तेंहि पुरतं दिवसभर याबद्दल तुमची अगदीं खात्री झालेली दिसते. पण मग हीं मुलंसुद्धां भोंवतालच्या इतर विद्यार्थ्यां-प्रमाणंच राजकारणाबद्दल उदासीन, आपल्यापुरतंच पाहणारीं बनतील. म्हणजे हुकूमशाहीचीं मुळं रुजायला अगदीं उत्तम जमीन!

"शिक्षक आणि त्यांचे शिकवायचे विषय जोंपर्यंत बदलत नाहींत तोंपर्यंत मुलं जितकीं कमी शाळेंत जातील तितकीं तीं चांगलीं राहतील. यापेक्षां एखाद्या कारखान्यांत खूप चांगलं शिक्षण मिळेल."

"शिक्षण आणि विषय बदलण्यासाठीं तुमचं हें पत्र लिहिण्या-पेक्षां जास्ती कांहीं आपण करणं आवश्यक आहे. हे सारे प्रश्न राजकीय पातळीवरच सोडवले पाहिजेत."

**कांहींच नसण्यापेक्षां बरं** हें खरं आहे. केवळ मध्यमवर्गाच्याच नव्हे, तर साऱ्याच लोकांच्या गरजांचा विचार करणाऱ्या लोकसभेला एखाददुसरा कायदा करून तुमच्या आणि शाळेच्या अभ्यासक्रमाचा बंदोबस्त करतां येईलसुद्धां.

पण त्यासाठीं पहिल्यांदा आम्हांला लोकसभेंत शिरकाव मिळवायला हवा. निग्रोंना गरजेचे असलेले कायदे गोऱ्या लोकांच्या हातून कधींच होणार नाहीत.

लोकसभेंत शिरण्यासाठीं आम्हांला भाषेवर प्रभुत्व मिळवावं लागेल. तेव्हां सध्यां तरी, आहे त्यापेक्षां चांगलं कांहीं मिळत नाहीं तोंवर, मुलांना तुमच्या पद्धतीच्या शाळेंतच जायला हवं.

**व्यवसायिक व्यंग** कांहीं झालं तरी डॉन बोर्धींना वाटतं तितके सारेच शिक्षक कांहीं वाईट नसतात.

कदाचित् त्या शाळांमधून शिकवतांनाच तुमच्यांत या व्यंगाची सुरवात झाली असेल. आमच्याबद्दलच्या कांहीं आकसापोटीं या ‘लाडक्या लेकां’ना तुम्हीं झुकतं माप दिलंत असं नसेल कदाचित्. असं झालं असेल कीं ते तुमच्यासमोरच होते. मोठ्या संख्येनं आणि वाजवीपेक्षां बराच काळ. आधीं तुम्हांला त्यांच्या बद्दल जिव्हाळा वाटायला लागला असेल. नंतर त्यांचं कुटुंब, त्यांचं विश्व, अगदीं ते घरीं वाचतात त्या वर्तमानपत्रा बद्दल सुद्धां.

फक्त सुखासीन, नशीबवान माणसंच ज्याला आवडतात तो राजकारणापासून दूरच राहतो. त्याला कशांतच बदल नको असतो.

**गरिबांचा दट्टया** पण आतां गोष्टी बदलायला लागल्या आहेत. तुम्हीं इतक्या विद्यार्थ्यांना नापास करत असतां - तरी शाळेंत विद्यार्थ्यांची संख्या वाढतेच आहे.

प्राथमिक गोष्टींची गरज असणाऱ्या बहुजन समाजाच्या वाढत्या दाबामुळं खास पिएरिनोसाठीं आंखलेल्या अभ्यासक्रमच यापुढं चालवणं तुम्हांला जमणार नाहीं.

तुम्हीं दिवसभर शिकवत असाल तर नाहींच नाहीं. गरिबांचीं मुलं तुम्हांला पण नव्यानं घडवतील नि अभ्यासक्रम पण नवा बनवतील.

गरिबांच्या मुलांना समजून घेणं आणि राजकारण आवडणं एकच गोष्ट आहे. अन्याय्य कायद्यांचे बळी झालेल्या माणसांवर प्रेम करायचं आणि तरीहि चांगले कायदे व्हावे म्हणून धडपड करायची नाहीं – हें तर अशक्यच आहे.

## ३. ध्येय

**धार्मिक शाळा** खऱ्या अर्थानं धार्मिक असणाऱ्या धार्मिक शाळा एकेकाळीं होत्या. त्यांच्यापुढं एक ध्येय होतं आणि गांठायला धडपडावं अशा लायकीचंहि तें होतं. पण नास्तिकांसाठीं त्यांनी कांहींच केलं नाहीं.

तुम्हीं काढलेल्या धर्मनिरपेक्ष तोडग्याकडे प्रत्येकजण उत्सुकतेनं पाहात होतां. पण शेवटीं डोंगर पोखरून उंदीरच बाहेर पडला : वैयक्तिक फायद्यासाठीं शाळा!

धार्मिक ध्येय असलेली शाळा आतां नाहींशीच झाली आहे. धर्मोपदेशकांना नवीन व्यवस्थेंत सामावून घेऊन त्यांना पण तुमच्यासारखेंच गुण, पदविका द्यायला सांगितलं आहे. तेहि आतां त्यांच्या मुलांसमोर 'धनेश्वर'च ठेवतात.

**कम्युनिस्ट शाळा** कम्युनिस्ट व्यवस्था याहून कांहींशी बरी शाळा देऊं शकते. आणि तरी शिक्षकं होणं आणि आपले शब्द बेतून बोलणं मला आवडणार नाहीं. मुलांच्या डोळ्यांतले ते वाढते संशय पहाणं – हा खरं तेंच बोलतो आहे कीं निव्वळ वेळ निभावून नेण्यापुरतं कामचलाऊ असं?

समतेसाठीं ही किंमत आम्हांला खरंच मोजायलाच हवी का?

**प्रामाणिक ध्येयाच्या शोधांत** आम्हीं ध्येयाच्या शोधांत आहोंत. मात्र तें खरंखुरं, प्रामाणिक असलंच पाहिजे. उदात्त. आपण 'माणसां'पेक्षां जराहि कमी असणार नाहीं अशी अपेक्षा त्यानं मुलाकडून ठेवली पाहिजे. हें आस्तिक आणि नास्तिक दोघांनाहि मान्य होण्याजोगं आहे.

हें ध्येय मला ठाऊक आहे. मी अकरा वर्षांचा असल्यापासून माझ्या धर्मोपदेशक शिक्षकानं तें माझ्यावर ठसवलं आहे. आणि याबद्दल मी ईश्वराचा ऋणी आहें. मीं इतका वेळ वांचवला आहे! आपण कां शिकतों आहोंत याची जाणीव मला दर क्षणाला होती.

**अंतिम ध्येय** आपलं सर्वस्व दुसऱ्यांसाठी देणं हें ध्येय योग्यच आहे.

चालूं शतकांत आपलं प्रेम तुम्हीं राजकारण, संघटना, शाळा यांच्याद्वारें नाहीं तर कसं दाखवणार? आम्हीं सार्वभौम नागरिक आहोंत. भीक मागण्याचे दिवस आतां निघून गेले आहेत. वर्गभेद, उपासमार, निरक्षरता, वंशभेद, वसाहतींमधलीं युद्धं – यांच्याविरुद्ध आतां आपण प्रत्यक्ष उठलं पाहिजे.

**जवळचं ध्येय** हें अंतिम ध्येय आहे. याची आठवण वेळोवेळीं ठेवली पाहिजेच. पण प्रत्येक मिनिटाला आठवण ठेवलीच पाहिजे असं अगदीं जवळचं ध्येय म्हणजे दुसऱ्यांना समजून घेणं आणि स्वतःला समजून देणं.

यासाठीं फक्त इटालियन भाषा पुरेशी नाहीं. ती जगभर फारशी वापरली जात नाहीं. आणि आपापल्या देशांच्या सीमा ओलांडून माणसांनीं एकमेकांबद्दल मित्रभाव बाळगण्याची गरज आहे. यासाठीं आपल्याला अनेक भाषांचा अभ्यास करायला हवा – जिवंत भाषांचा.

प्रत्येक विषयांतल्या शब्दानीं मिळून भाषा बनते. तेव्हां आपलं शब्दांचं भांडार वाढवण्यासाठीं सगळ्या विषयांचीं निदान ओळख ही करून घेतलीच पाहिजे. आपल्याला प्रत्येक गोष्टीची तोंडओळख असायलाच हवी, आणि बोलण्याचं कसब पण!

**अभिजात कीं शास्त्रीय** लोकसभेंत नवीन माध्यमिक शाळेबद्दल चर्चा चालूं होती तेव्हां आम्हीं मुके लोक गप्पच राहिलों. कारण आम्हीं तिथं नव्हतोंच. इटालींतल्या शेतकऱ्यांसाठीं शाळांची आंखणी करतांना त्यांनाच त्यांतून वगळलं गेलं होतं.

वरकरणीं एकमेकांच्या विरोधी दिसणाऱ्या पण आंतून सारख्याच असणाऱ्या दोन गटांत न संपणारी चर्चा चालूं होती.

ते सगळे 'लिचिओ'चे पदवीधर होते. ज्या शिक्षणपद्धतीनं त्यांना घडवलं तिच्यापलीकडे इंचभरसुद्धां पाहूं न शकणारे. त्यांच्यापैकीं एकादा तरुण आपल्याच सांवलीशी वाद कसा काय घालतो बुवा? त्याच संस्कृतीच्या पठडींतले शब्द वापरायचे आणि स्वतःवर आणि त्या विकृत संस्कृतीवर थुंकायचं हें कसं जमावं?

लोकसभेत दोन तट पडले. उजव्या गटानं शिक्षणपद्धतींत लॅटिन घुसवलं, तर डाव्यानं विज्ञानं पुढं ढकललं. आमची आठवण कुणालाच झाली नाहीं. त्यांच्यापैकीं एकानं पण प्रश्न आंतून पाहिलेलाच नव्हता. तुमच्या शिक्षणपद्धतीनं आम्हांला किती संकटांना तोंड द्यायला लावलं हें एकालासुद्धां ठाऊक नव्हतं.

उजव्या गटांचे लोक एखाद्या संग्रहालयांतल्या वस्तूसारखे होते, तर कम्युनिस्ट म्हणजे प्रयोगशाळेंतले उंदीर. दोघंहि आमच्यापासून इतके दूर! आणि आम्हीं असे कीं आम्हांला तर अजून बोलतां पण येत नाहीं. जिवाच्या करारानं आम्हांला आजची भाषा यायला हवी आहे. कालची नाहीं, आजची. आणि फक्त भाषाच तेवढी – पांडित्य नाहीं!

**सार्वभौम** फक्त भाषाच तेवढी सगळ्या माणसांना समान बनवते. स्वतःचं म्हणणं सांगतां येणारा आणि दुसऱ्याचं म्हणणं समजायची अक्कल असणारा माणूसच तेवढा समान असतो. तो श्रीमंत आहे कीं गरीब हें अवांतर आहे. फक्त त्यानं तोंड उघडलं पाहिजे.

त्या माननीय खासदारांना वाटत होतं कीं कुणाचं तरी पोट शिवून टाकायला किंवा नावामागं 'डॉक्टर' लावायला आम्हीं अगदीं उतावीळ झालों आहोंत. "लायक आणि क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना अगदीं प्रख्यात खानदान नसलेल्याहि विद्यार्थ्यांना, उच्चतम पातळीचें शिक्षण घेण्याचा हक्क आहे." घटनेचं ३४वं कलम.

आपल्या मुलांना जास्ती उच्च ध्येयाचं शिक्षण देण्याचा प्रयत्न आपण करूं या : सार्वभौम बना! 'डॉक्टर', 'इंजीनिअर' हे विसरून जा.

**सामाजिक मानमान्यतेची शिडी चढणारे** आम्हांला साऱ्यांना बोलण्याची ताकद येईल तेव्हां सामाजिक शिडी चढूं पाहणाऱ्यांना खुशाल आपला अभ्यास करत बसूं दे. त्यांनीं विद्यापीठांत जावं, पदव्या बळकवाव्यात, ढिगावारीं पैसा कमवावा, आणि झाडून साऱ्या 'तज्ज्ञ' जागा खुशाल घ्याव्यात.

आजपर्यंत होता तसा सत्तेचा मोठा वांटा मात्र त्यांनीं मागतां कामां नये.

**विरून जा** बिचारा पिएरिनो! मला तुझी दया येते. तुझ्या खास हक्कांसाठीं तू भरमसाट किंमत मोजली आहेस! तुझा खास व्यासंग, तुझीं पुस्तक, सगळ्या तुझ्यासारख्याच लोकांशीं संबंध – यांचा कायम शिक्का तुझ्यावर बसला आहे. तूं हें सगळं सोडत कां नाहींस?

विद्यापीठ, तुझीं कर्तव्यं, तुझे राजकीय पक्ष – सारं सोडून दे आणि शिकवायला सुरुवात कर. फक्त भाषा शिकवायला लाग. बाकी कांहीं नाहीं.

स्वतःला विसरून गरिबांसाठीं वाट काढ. तुझं वाचन थांबव. विरून जा. हेंच तुझ्या वर्गाचं अंतिम कार्य आहे.

**आत्म्याला वांचवणं** तुझ्या जुन्या मित्रांना वांचवायचा प्रयत्न करूं नकोस. त्यांच्याशी बोलायला म्हणून एकदां जरी तूं माघारीं गेलास, तरी मग आजपर्यंत होतास तसाच तू कायमचा राहशील.

विज्ञानाची काळजी तूं करूं नकोस : स्वतःचा स्वार्थ पाहणारे पुरेसेजण नेहमींच त्या क्षेत्रांत असतील. आपल्याला उपयोगीं पडणारे शोधहि ते लावतील. वाळवंटांत ते पाण्याचे कालवे

काढतील, समुद्रांतून व्हेल माशांचे तुकडे आणतील, रोगांवर विजय मिळवतील.

तुला त्याची काळजी कां? अंगच्या गतीमुळं ज्या गोष्टी पुढं जात राहणारच आहेत, त्यांच्यासाठीं तुझ्या प्रेमाचा आणि आत्म्याचा बळी देऊं नकोस.

उत्तरार्ध

# माजिस्त्रालेमधें तुम्हीहि नापास होतां, पण.....

## इंग्लंड

**खरी परीक्षा** माझ्या परीक्षेंत मी पास झालों. माध्यमिक शाळा सोडली. आणि मी इंग्लंडला गेलों. मी पंधरा वर्षांचा होतों. पहिल्यांदां मी कँटरबरींत एका शेतकऱ्याकडे काम केलं. नंतर लंडनमधें एका दारूच्या व्यापाऱ्याकडे.

परदेशीं जाण्याचा अनुभव हा आमच्या शाळेमधें तुमच्या परीक्षांची जागा घेतो. पण खरं तर परीक्षा आणि शाळा – दोन्हींहि त्यांत एकत्र गुंफल्या जातात.

आमची संस्कृति आम्हीं प्रत्यक्ष जीवनामधून पारखून घेतों.

आमची शेवटची परीक्षा तुमच्या त्या परीक्षेपेक्षां कितीतरी कठिण असते. पण त्यांत आम्हीं निदान भूतकाळांतल्या मेलेल्या गोष्टींवर वेळ वायां घालवत नाहीं.

**सुएझ** माझी परीक्षा चांगली झाली. मी जिवंत घरीं परतलों. आणि बरोबर थोडे पैसेहि कमावून आणले. सगळ्यांत चांगलं म्हणजे मी परत आलों तो नवनवीन अनुभवांनीं ओसंडून जात. त्यांचा अर्थ मला समजला होता. आणि ते मला पुन्हां सांगतांहि येत होते.

या आधीं आमच्या कुटुंबांत फक्त माझा काका रेनातो परदेशीं गेलेला होता. तो इथिओपियांत युद्धावर गेला होता. लहानपणीं भूगोल शिकायला सुरवात केली तेव्हां ‘सुएझ कालव्याबद्दल मला कांहीं सांग’ असं मीं त्याला म्हटलं. पण तो कालवा आपण ओलांडला होता हें त्याला माहीतच नव्हतं.

**शांततावादी** त्याच्यासारखं शेतकऱ्यांना मारण्यासाठीं मला परदेशीं पाठवायला तुम्हांला कधींच जमणार नाहीं. मी परदेशीं गेलों आणि एका शेतकऱ्याच्या घरांतच राहिलों तिथं माझ्याएवढाच एक मुलगा होता. आणि एक त्याच्याहून छोटी मुलगीसुद्धां. त्यांचं छोटंसं कोठार आहे. ते बटाट्याची लागवड करतात. आमच्यासारखेच ते राबतात. मी त्यांना कशासाठीं ठार मारूं?

तुम्हीं मला त्यांच्यापेक्षांहि जास्ती परके आहांत. घाबरूं नका – मी शांततावादी आहें!

**कॉकनी** लंडनमधें तर मजुरांची अवस्था शेतावरच्यांपेक्षां पण खराब आहे. आम्हीं शहराच्या मध्यमार्गीं जमिनीखालीं काम करत होतों – भरलेले ट्रक रिकामे करायचे. माझे सहकारी कामगार इंग्रज होते, पण त्यांना इंग्रजीतून साधं पत्रदेखील लिहितां येत नव्हतं. ते बऱ्याचदा डिककडून लिहून घ्यायचे. डिक कधींकधीं माझा सल्ला विचारायचा. मी तर ध्वनिमुद्रिकांवरून इंग्रजी शिकलेलों. तरीसुद्धां तोहि इतरांसारखा फक्त 'कॉकनी'च बोलायचा.

आमच्या डोक्यावरतीं फक्त पंधरा फुटांवर 'राणीचं इंग्रजी' बोलणारे लोक होते.

कॉकनी कांहीं फारशी वेगळी नाहीं. पण ती बोलणं म्हणजे एक वेगळेपणाचा शिक्का बसणं. इथं इंग्रज लोक शाळांत विद्यार्थ्यांना नापास करत नाहींत. ते त्यांना खालच्या दर्ज्याच्या शाळांकडे वळवतात. मग शाळेंत जेव्हां श्रीमंत लोक आपल्या भाषेला घासून-पुसून चमकदार करत असतात, तेव्हां गरीब लोक वाईट रीतीनं बोलण्याच्या कलेंत पारंगत होत असतात. माणसाच्या बोलण्याच्या धाटणीवरून तो श्रीमंत आहे का आणि

त्याचे वडील कोणता व्यवसाय करतात हें त्यांना सांगतां येतं. क्रांति आली रे आलीं कीं अगदी सहजपणानं ते एकमेकाची आंतडीं बाहेर काढतील.

**भिंतीवर धडक** मी इटालीला परतलों तेव्हां आपण भित्रे-बुजरे होतों हें मी विसरूनहि गेलों होतों.

देशांच्या सरहद्दींवर उभं राहून आपलं म्हणणं समजावण्याचा प्रयत्न करणं, राजसत्तेच्या पुरस्कर्त्यांबरोबर आणि मालकाबरोबर वाद घालणं, वंशवादी आणि समसंभोगी माणसांपासून स्वतःचा बचाव करणं, पैसा जपणं, निर्णय घेणं, अनोळखी अन्न खाणं, पत्रांची वाट पाहणं, घराच्या आठवणी गिळून टाकणं : आपण प्रत्येक वेळींच झुंजलो आहोंत आणि प्रत्येक लढाई जिंकली आहे असंच मला वाटलं.

पण मीं अनुभवली नव्हती अशी एक गोष्ट म्हणजे माजिस्त्राले.* आतां मीं तेंहि केलं आहे. एखाद्या भिंतीवर डोकं आपटत राहावे असा तो अनुभव होता.

**एक तुम्हीं तरी, नाहीं तर आम्हीं** आणि तरी माझे शाळकरी मित्र सगळीकडे यशस्वी झाले आहेत. त्यांच्यापैकीं कांहींजण कामगार संघटनांत पदाधिकारी आहेत आणि त्यांचं अगदीं व्यवस्थित चाललं आहे. दुसरे कांहीं फ्लोरेन्समधें निरनिराळ्या कारखान्यांतून कामाला आहेत आणि त्यांना दडपून टाकणं कुणालाहि शक्य नाहीं. कामगार संघटनांतून, राजकारणांत आणि स्थानिक प्रशासनामधें ते कामं करतात.

---

* प्राथमिक शिक्षकांसाठींचा चार वर्षांचा उच्च अभ्यासक्रम

अगदीं जे दोघं तांत्रिक शाळेंत गेले, त्यांनीसुद्धां यश मिळवलं आहे. पिएरिनोसारखेच तेहि बढती मिळवताहेत.

जिथं खरंखुरं जीवन आहे तिथं आमचं शिक्षण ताठपणं उठून दिसतं. पण माजिस्त्रालेमधें तें निरर्थक ठरतं.

काय घडलं तें जरा तपासून पाहूं या. तुम्हीं किंवा आम्हीं – आपल्यापैकीं कुणीतरी वाट चुकलेला आहे.

**रोजचं वेळापत्रक** फ्लोरेन्सला जाण्यासाठी मला रोज पहाटें पांचला उठावं लागत होतं. फटफटीवरनं व्हिच्चिओपर्यंत. तिथून पुढं आगगाडीनं. गाडींत अभ्यास करणं कठिण आहे. पेंगुळलेपण, गर्दी, गजबजाट.

मी आठ वाजतां शाळेच्या दरवाज्याशीं पोंचायचों. आणि सात वाजतां उठणाऱ्या मुलांसाठीं मला थांबावं लागायचं. दररोज चार तासांची अडथळ्याची शर्यंत.

**आधींचं वेळापत्रक** मी तिथं एक ऑक्टोबरला हजर होतों. पण तुम्हीं नव्हतांत. सहा तारखेला परत या म्हणून आम्हांला सांगितलं. लिओनार्दो शाळेच्या विद्यार्थ्यांना तेरा तारखेला हजर राहायला सांगितलं.

हा सगळा उशीर तुमच्या सुस्त ऐदीपणामुळं होतो आणि आपल्याकडे पुण्यतिथ्यांना पण कांहीं तोटा नाहींच. गरिबांपासून शाळेचा एक दिवस हिरावून घेण्यासाठी अगदीं संत फ्रान्सिसलाहि सबब म्हणून वापरलं जातं.

अगोदरच उन्हाळ्यांचे चार महिने शाळेशिवाय आम्हीं काढल्यानंतर वर हें!

या आळशीपणाची जबाबदारी नक्की कुठं पडते. तें मी अजून शोधलेलं नाहीं. शाळांवर कीं अधिकाऱ्यांवर कीं शिक्षणखात्यावर? वर्षाला १३ महिन्यांचा पगार घेणाऱ्या (एक महिन्याचा पगार बोनस) लोकांचे हे सारे उद्योग!

एखादा कामगार पांच मिनिटं उशिरां आला कीं अर्ध्या तासाचा पगार गमावतो. हें वारंवार झालं तर तो आपली नोकरीसुद्धां गमावून बसतो.

तुमच्याप्रमाणंच आगगाड्यादेखील सरकारच्याच अधिकारांत आहेत. पण त्या सतत चालूंच असतात. रेल्वेचे रूळ आपल्याला अगदीं निश्चितपणानं ओलांडतां येतात. कारण सिग्नल देणारे कामगार कामावर हजर असतात. उन्हाळ्यांत आणि हिंवाळ्यांत, दिवसां आणि रात्रीं. त्यांच्यापैकीं एखाद्याकडून एकदां जरी का चूक झाली तरी साऱ्या वर्तमानपत्रांतून गाजावाजा होईल. कामाच्या विभागणीच्या किंवा पोराचं पोट दुखत असल्याच्या सबबी त्याला देतां येत नाहींत. त्याला सरळ तुरुगांत टाकलं जातं.

मग तुम्हीच असे कोण एवढे मोठे लागून गेला आहांत?

कदाचित् आगगाड्या शाळांपेक्षां व्यवस्थित चालणं कारभार करणाऱ्यांना जास्ती निकडीचं वाटत असावं. आपल्या स्वतःच्या मुलांना घरच्या घरींच शिकवण्याची बरोबर व्यवस्था आहे हें त्यांना माहीत आहे. पण आगगाड्या ही वेगळीच बाब आहे.

पदव्या द्यायला जूनमधें तुम्हीं तयार राहावं एवढीच काय ती फिकिर वरिष्ठांना असते.

## आत्मघातकी निवड

**विसराळू** नापास करून बाजूला टाकलेल्या मुलांचं केवढं मोठं नुकसान तुम्हीं केलेलं आहे तें दाखवायचा प्रयत्न आम्हीं या पत्राच्या पहिल्या भागांत केला. फ्लोरेन्समधें मीं पाहिलं कीं डॉन बोर्धींचं अगदीं बरोबर होतं. सगळ्यांत जास्ती नुकसान केलं गेलं तें त्या निवडक मुलांचंच.

पास होणारं मूल त्याच वर्गाबरोबर राहतं. त्याच्या शिक्षकां-पेक्षांसुद्धा कायम तें तिथं डकवलं जातं. त्याला खरं तर आपल्या शाळासोबत्यांबरोबर मैत्री करतां यायला हवी आणि त्यांचं पुढं काय होतं यांत रस वाटायला हवा.

पण ते संख्येनं इतके असतात! आठ वर्षांत चाळीस शाळासोबती त्याच्यापासून तोडले जातात. जणूं सुकलेल्या फांद्यांसारखे ते जळून गेलेले असतात. माध्यमिक शाळेच्या अखेरीला आणखी पांचजण गळलेले असतात – पास होऊन-देखील. म्हणजे एकंदर झाले ४५. त्यांच्याबद्दल किंवा त्यांच्यापुढच्या प्रश्नांबद्दल कधींच कांहीं पिएरिनोच्या कानांवर येत नाहीं.

**उद्धट** दुसऱ्या यत्तेंत असतांना पिएरिनो अनेक मुलांपैकीं एक होता. पांचव्या यत्तेंत तो जास्ती छोट्या गटामधें जातो. एव्हांना त्याला भेटलेल्या शंभर मुलांपैकीं चाळीस केव्हांच त्याच्याहून 'खालची' झालेलीं असतात.

तो माध्यमिक शाळा सोडतो तेव्हां त्याच्या 'कनिष्ठां'चा आंकडा शंभरांतल्या नव्वदाइतका वाढलेला असतो. त्याच्या उच्च शाळा पदविकेनंतर हाच ९६ होतो. त्याच्या महाविद्यालयीन पदवीनंतर ९९.

नाहींशा होणाऱ्या ह्या शाळासोबत्यांच्या प्रगतिपुस्तकांतल्या मार्कांपेक्षां दरच वर्षी जास्ती मार्क त्यानं आपल्या प्रगतिपुस्तकांत पाहिलेले असतात. हे मार्क देणाऱ्या शिक्षकांनीं इतर ९९ खालच्या संस्कृतींतले आहेत असा ठसा त्याच्या मनावर खोदून ठेवलेला असतो.

एव्हांना त्याचं मन पांगळं झालेलं नसलं तरच नवल!

**गरिबांना भरपाई** त्याचं मन खरोखरच रोगट झालं आहे. कारण त्याचे शिक्षक त्याच्यापाशीं खोटं बोललेले आहेत. त्या ९९ जणांची संस्कृति नीच नाहीं – ती वेगळी आहे.

खरी संस्कृति दोन घटकांची मिळून बनलेली असते. बहुजन-समाजाबरोबरच असणं आणि भाषेवर प्रभुत्व असणं. कुणाहि माणसाला ही संस्कृति अजून मिळवतां आलेली नाहीं.

आम्हीं वर्णन केलेल्या प्रकारची भेदभाव करणारी शाळा संस्कृतीला मारून टाकत असते. ती गरिबांपासून स्वतःचं मनोगत उघड करायचीं साधनंच हिरावून घेते. तशीच ती प्रत्यक्षांत गोष्टी जशा आहेत तशा समजून घेण्याचं ज्ञान पण हिरावून घेते.

दुर्दैवी गियानी! त्याला स्वतःचं मन उघड करतां येत नाहीं. सुदैवी गियानी! कारण तो सगळ्या जगाचा आहे – सगळ्या आफ्रिकेचा, आशिया आणि लॅटिन अमेरिकेचा भाऊ. जगांतल्या बहुसंख्यांच्या गरजांचा जाणकार.

पिएरिनो नशीबवान. कारण त्याला बोलतां येतं. अभागी. कारण तो फार बोलतो. पण त्याच्यापाशीं सांगायला महत्त्वाचं असं कांहीं नाहीं. त्याच्याचसारख्या असलेल्या दुसऱ्यांनीं लिहिलेलीं पुस्तकं तो वाचतो. आणि फक्त त्याच त्याच गोष्टी

पुन्हां पुन्हां बोलून दाखवतो. इतिहास नि भूगोलापासून तो तुटलेला आहे. छोट्याशा संभावित वर्तुळांत तो कोंडलेला आहे.

भेदभाव करणारी शाळा म्हणजे ईश्वर आणि माणसाविरुद्धचं पाप आहे. पण ईश्वर दुबळ्यांचा पाठिराखा आहे. तुम्हांला ते मुके असायला हवे आहेत. आणि म्हणून ईश्वरानं तुम्हांला आंधळं केलं आहे.

**आंधळे** ज्या कुणाचा आमच्यावर विश्वास नसेल त्यानं मात्रिकोल (विद्यापीठाचे पहिल्या वर्षाचे विद्यार्थी) समारंभाच्या दिवशीं शहरांत जावं.

या सद्‌गृहस्थांना आपल्या विशेष दर्ज्याबद्दल लाज तर वाटत नाहींच. उलट आणखी उठून दिसण्यासाठीं ते डोक्यावर हॅट घालतात. नंतर दिवसभर रस्त्यांमधें ते विदूषकी चाळे करत राहतात. अचकट-विचकट विनोद करत फिरतात. कायदे धाब्यावर बसवतात. रहदारीची अडवणूक करतात. आणि प्रत्येकाच्या कामामधें अडथळे आणतात. ते पोलिसाची टोपी काढून घेतात आणि एनिम्याच्या नळीनं त्याचं डोकं सजवतात.

हें सारं पोलिस शांतपणानं सोंसतो. त्याला आपल्या धन्याची इच्छा समजते. पण कामगार जेव्हां कासावीस करणाऱ्या गरजांपोटी संप पुकारतात – शिस्तशीर, गंभीर असा – तेव्हां त्याला मात्र बंडाळी म्हटलं जातं.

पोलिसाची ही लाचारी हा आपल्यावर ठपका आहे असं ह्या चाळे करण्यांत गढलेल्या तरुण सद्‌गृहस्थांना वाटत नाहीं.

चेहऱ्यावर एवढंसंहि हंसूं न उमटतां शेजारून जाणाऱ्या कामगाराची नजरहि त्यांच्या लक्षांत येत नाहीं. भीक मागण्यासाठीं

समोर हात पसरून त्यालाहि थांबावायला ते मागंपुढं पाहात नाहींत.

**'ठेवलेलीं' माणसं** करांच्या रूपानं प्रत्येक कामगार दररोज दानधर्म करतच असतो. अगदीं आमटीमधें मीठ घालतो तेव्हांसुद्धां. त्याच्या खर्चानं विद्यार्थी शिकत असतात. पण विद्यार्थ्यांना तें एकतर माहीत नसतं, किंवा माहीत करून घ्यायची इच्छा नसते.

माध्यमिक शाळेंतल्या विद्यार्थ्यामागं गरीब माणूस दरवर्षी ९८० रुपये खर्च करत असतो. विद्यार्थ्याचा बाप त्यापैकीं फक्त ९८ रुपये करांच्या रूपानं देत असतो. विद्यापीठांत शिकणारा एक विद्यार्थी म्हणजे गरिबाला दरवर्षी ३६८० रुपये मोजावी लागणारी किंमत. ह्या विद्यार्थ्याचा बाप त्यापैकीं फक्त ४४० रुपये देतो.

प्रत्येक गोष्ट विचारांत घेतली तर एका एम.डी. मागं गरिबानं ४५८६० रुपये मोजले आहेत. त्यामधें त्या डॉक्टरच्या बापाची गुंतवणूक आहे. २४४० रुपये. नंतर ही एम.डी. ची पदवी ज्या गरिबानं त्याला बहाल केलेली आहे, त्यालाच हा डॉक्टर १५ मिनिटांच्या व्हिजिटसाठीं १५ रुपयांचं बिल लावेल, सरकारी वैद्यकीय विमा योजनेविरुद्ध संपावर जाईल आणि ब्रिटिश पद्धतीच्या मोफत औषधयोजनेला विरोध करेल.

**संभाव्य हुकूमशहा** फ्लोरेन्समधले माझे बहुतेक शाळासोबती वर्तमानपत्र कधींच वाचत नाहींत. आणि वाचतात ते प्रस्थापितांचं वर्तमानपत्रच तेवढं वाचतात. "या दैनिकाला भांडवल कोण पुरवतं माहीत आहे का?" असं मी त्यांच्यापैकीं एकाला

एकदां विचारलं. तर उत्तर मिळालं, "कुणीच नाहीं. तें स्वतंत्र आहे."

राजकारणाबद्दल कांहीं समजून घ्यावं असं त्यांना कधीं वाटतच नाहीं. त्यांच्यांतल्या एकाला तर कामगारसंघटना म्हणजे काय हेंदेखील माहीत नव्हतं.

संप म्हणजे उत्पादनाची नासाडी करण्याचं एक साधन एवढंच त्यांनीं ऐकलेलं आहे. हें कितपत खरं आहे याचा त्यांना कधींच प्रश्न पडत नाहीं.

त्यांच्यापैकीं तिघं सरळसरळ फॅसिस्ट आहेत. राजकारणा-बद्दल उदासीन असलेले अठ्ठावीसजण अधिक हे तीन मिळून एकतीस फॅसिस्ट होतात.

**आणखीच आंधळे** याहून जरा वेगळ्या प्रकारचे कांहीं विद्यार्थी आणि बुद्धिजीवी आहेत. ते खूप वाचतात आणि ते डावे बंडखोर आहेत. तरीसुद्धां ते आणखीच आंधळे वाटतात.

शिक्षक-पालकांच्या सभेमधें अगदीं कट्टर डाव्या गटाच्या एका शिक्षकाचं भाषण मीं एकदां ऐकलं. भाषण 'दोपोस्कुओला' पर्यंत आलं आणि एकदम स्फोट झाल्यासारखा तो गरजला – 'मी दर आठवड्याला भरपूर अठरा तास शिकवतों हें तुमच्या लक्षांत येत नाहींसं दिसतं!'

५-३९ ची गाडी पकडण्यासाठीं पहांटें चाराला उठणारे कामगार आणि उन्हाळ्यांतसुद्धां दररोज अठराअठरा तास राबणाऱ्या शेतकऱ्यांनीं ती खोली भरलेली होती.

कुणीच बोललं नाहीं कीं हंसलं नाहीं. त्या शांततेमधें शंभर भावशून्य डोळे त्याच्यावर फक्त खिळून होते.

## ध्येय

**कडू फळ** तुमच्या अभ्यासक्रमाच्या निवडीच्या पद्धतीचं फळ हें कधींच न पिकणारं कडू फळ आहे. माझे बहुसंख्य शाळासोबती 'माजिस्त्राले'ला जात होते तें एकतर योगायोगानं किंवा पालकांनीं घातलं होतं म्हणून!

तुमच्या शाळेच्या दरवाज्यापाशीं मीं आलों तेव्हां एक नवी कोरी ब्रीफकेस माझ्या हातांत होती. माझ्या छोट्या विद्यार्थ्यांनीं दिलेली ती भेट होती. १५व्या वर्षींच मीं शिक्षक म्हणून माझा पहिला मोबदला मिळवला होता.

तुम्हांला किंवा माझ्या शाळासोबत्यांना मीं हें कधींच सांगितलं नाहीं. ती कदाचित् माझी चूकहि असेल. पण तुमची शाळा हें मोकळेपणानं बोलण्याचं ठिकाण नाहींच. आपल्याला काय हवं आहे हें माहीत असणाऱ्या आणि कांहींतरी अर्थपूर्ण करूं मागणाऱ्या विद्यार्थ्याला तिथं 'मूर्ख' समजलं जातं.

**चिक्कू** शिक्षक व्हायचं माझ्या शाळासोबत्यांपैकी कुणाच्याच डोक्यांत नव्हतं. त्यांच्यापैकीं एकजण म्हणाला, "मला बँकेंत काम करायचं आहे. तांत्रिक शाळेंत ते गणितावर फार भर देतात. लिचिओमधें लॅटिनचा अतिरेक आहे. म्हणून मी इथं आलों."

या विद्यार्थ्यांच्या परिस्थितीबद्दल माहिती देणारी शेवटची खानेसुमारी १९६१ ची आहे. माजिस्त्रालेची पदविका असलेले नागरिक ६ लाख ७५ हजार ९७५ आहेत. निवृत्त झालेले शिक्षक ६०,०००. त्या वर्षी प्रत्यक्ष शिकवत असलेले २ लाख १ हजार. १ लाख २० हजार जणांनीं शिक्षकाच्या जागेसाठीं

अर्ज केलेला. म्हणजे शिकवूं शकतात पण प्रत्यक्षांत शिकवत नाहींत असे जवळजवळ ३ लाख नागरिक ठरतात - हेच ४३ टक्के होतात.

**असमाधानी** आपल्याला पुढं विद्यापीठांत जायला आवडेल असं अनेक शाळासोबत्यांनीं मला सांगितलं. पण आपल्याला कोणत्या विषयाचा खास अभ्यास करायचा आहे हें त्याचं त्यांनाच ठाऊक नव्हतं.

१९६३ मधें माजिस्त्रालेचे २२ हजार २६६ पदवीधर होते. पुढच्या वर्षी त्यांतले १३ हजार ३७० विद्यापीठांत अर्ज करतांना आपल्याला दिसतात.

म्हणजे शिकवण्याची पात्रता मिळवलेल्या दर शंभरांपैकीं ६० जण शिकवण्याचा विचार पण करत नाहींत.

**कोण स्वतःला शिक्षक म्हणूं शकतो?** माझ्या वर्गांतली एकटीच मुलगी इतरांपेक्षा जरा एक पायरी वरची वाटली.

ज्ञानाच्या प्रेमापोटीं ती शिकली. ती चांगली पुस्तकं वाचायची नि बाखचं संगीत ऐकण्यासाठीं स्वतःला खोलींत कोंडून घ्यायची.

तुमच्या शिक्षणपद्धतीला येतं तें अत्युत्तम फळ हें!

पण माझ्यावर संस्कार झाला आहे तो हा कीं हें फळ सर्वांत धोकेबाज नि मोहकारी आहे. ज्ञान हें दुसऱ्यांना देण्यासाठींच असतं. सांस्कृतिक आस्था निव्वळ स्वतःपुरती मर्यादित नसलेलाच तेवढा आपल्याला शिक्षक म्हणवूं शकतो!

**बंदिस्त शाळा** तुमच्या वर्गांत जसलीं मुलं आहेत त्यांना शिक्षक म्हणजे काय हें समजावून देणं तुम्हांला नाउमेद करणारं

आहे, हें मला ठाऊक आहे. पण - कुणीं कुणाला खच्ची केलं? मुलांनीं तुम्हांला का तुम्हीं  मुलांना?

शिक्षकाच्या पेशांत जाण्याऐवजीं माजिस्त्रालेनंतर विद्यापीठांत अर्ज करण्याची प्रवृत्ति वाढती आहे. त्यामुळं माजिस्त्रालेमधलं प्रशिक्षण जास्तीजास्ती सामान्य आणि ढोबळ होतं आहे.

चांगले शिक्षक निर्माण करण्यासाठीं आपल्याला स्वयंपूर्ण शाळेची गरज आहे. इतर क्षेत्रांत प्रवेश करण्याचा उंबरठा ठरणार नाहीं अशी शाळा. बँकेंत काम करायचं मनांत असलेल्या मुलाला अशा शाळेंत उपऱ्यासारखं वाटलं पाहिजे. शिक्षक व्हायचं ठरवलेल्या शेतावरून आलेल्या मुलाला तिथं घरच्यासारखं वाटावं.

**आवश्यक निवड** आतां आपण आठ वर्षं सक्तीच्या शाळेपेक्षां अगदीं वेगळ्या प्रश्नाशीं येऊन ठेवतों. तिथं प्रत्येकालाच समान दर्ज्याचा पवित्र अधिकार आहे. माजिस्त्रालेमधें मात्र फक्त लायकीचा प्रश्न येतो.

या शाळा नागरिकांना इतरांच्या सेवेचं खास शिक्षणं देतात. त्या विश्वासपात्र असायलाच हव्यात.

शिक्षणक्षेत्राची ही पदविका मिळवणं कठिणच असायला हवं. नंतर आम्हांला कमी लेखून चालणार नाहीं. केमिस्ट, डॉक्टर किंवा इंजीनिअर यांच्या बरोबरीनंच आम्हांला वागवलं जायला हवं.

**ध्येयावर नजर** गणित येत नाहीं म्हणून तुम्हीं एखाद्या टॅक्सीड्रायव्हरला नापास करत नाहीं. किंवा आपले कवी माहीत नाहींत म्हणून डॉक्टरला.

मला मात्र तुम्हीं एकदां अगदीं याच शब्दांत म्हणालां होतांत – “हें बघ, तुला लॅटिन पुरेसं येत नाहीं. तूं तांत्रिक शाळेंत का जात नाहींस?”

चांगल्या शिक्षकांच्या घडणीसाठी लॅटिन अगदीं आवश्यकच आहे अशी तुमची खात्री आहे का? तुम्हीं याचा कांहीं विचार केला आहे? तुम्हीं करतां तें एवढंच कीं आहे ती पठडी जशीच्या तशी चालूं ठेवतां. तुम्हीं तिचं खरोखरीं मूल्यमापन कधींच करत नाहीं.

**व्यक्ती** हा कुठून आला, कोण होता, ह्याला काय साधायचं आहे, हें स्वतःला विचारण्याइतपत तुम्हीं माझ्यामधें खराखुरा रस घेतला असता, तर तुमचं लॅटिन कधींच नजरे आड गेलं असतं.

पण मग आक्षेप घेण्यासारखं दुसरं कांहींतरी माझ्यामधें तुम्हांला मिळालं असतं. आपल्याला काय हवं आहे तें ठाऊक असलेला एक पंधरा वर्षांचा पोरगा समोर दिसणं तुम्हांला धास्तावून टाकतं. त्याच्या शिक्षकाचा प्रभाव तुम्हांला तिथं जाणवतो.

व्यक्तीचा असा खेळखंडोबा करणाऱ्याचा धिक्कार असो! पण व्यक्तित्वाचा मुक्त विकास हेंच तर तुमचं ब्रीदवाक्य आहे. समाजाच्या गरजांशीं तुमचा कांहीं संबंधच नाहीं.

माझ्यावर माझ्या शिक्षकांचा चांगलाच प्रभाव पडलेला आहे. आणि मला ह्याचा अभिमान वाटतो. त्यांनाहि ह्याचा अभिमान वाटतो. शाळेचा अर्थ हा नसेल तर आणखी आहे तरी कोणता?

माणूस आणि पशू यांच्यातला एक फरक म्हणजे शाळा. ज्याच्यावर शिक्षकाचा स्वतःचा विश्वास आहे, प्रेम आहे, जें व्हावं, घडावं अशी तो आशा करतो, तें सारं शिक्षक मुलाला

देतो. मोठा होत असतांना मुलगा त्यांत स्वतःची कांही भर घालेल. मानवजात पुढं जात राहते ती अशी.

जनावरं शाळेंत जात नाहींत. आपल्या व्यक्तित्वाचा स्वतंत्र मुक्त विकास साधतांना पक्षी आज हजारों वर्षं अगदीं तशींच घरटीं बांधत आले आहेत.

**मठ** अगदीं मठांतदेखील आपल्या जीवनकार्याचा शोध घेण्यासाठी तळमळत असलेलीं मुलं आहेत असं मला सांगण्यात आलं आहे. प्राथमिक शाळेंतच जर त्यांना सांगितलं असतं कीं 'आपल्या सर्वांचं जीवनकार्य सारखंच आहे – पण जिथं कुठं असूं तिथं कांहींतरी चांगलं करत राहणं – तर त्यांच्या आयुष्यांतलीं मोलाचीं वर्षं स्वतः बद्दल चिंता करत त्यांना गमवावीं लागलीं नसतीं.

**समाजसेवेची शाळा** दोन वेगळ्या प्रकारच्या शाळा ठेवून विषयाच्या शेवटच्या निवडीसाठीं आपल्याला जरा जास्ती वेळ देतां येईल.

चौदा ते अठरा वर्षं वयाच्या मुलांसाठी एक शाळा. हिला 'सामाजिक सेवा शाळा' म्हणता येईल. आपलं आयुष्य दुसऱ्यांसाठीं द्यायचं आधींच ठरवलेल्या अशा कुणाहिसाठीं ही शाळा धर्मोपदेशक, प्राथमिक शाळाशिक्षक, कामगार संघटना कार्यकर्ते आणि राजकीय कार्यकर्ते या सर्वांसाठीं. आपापल्या विषयांतल्या विशेष व्यासंगासाठीं जास्तीचं एक वर्षं ठेवतां येईल.

बाकी सगळ्या शाळांना आपण 'अहंसेवा शाळा' असं नांव देऊं या. आणि आतां सध्यां आहेत त्याच शाळा तशाच, न बदलतां त्यासाठीं चालूं ठेवतां येतील.

**उच्च ध्येयं** या सामाजिक सेवा शाळेनं जास्तीजास्ती वरची पायरी गांठायचा प्रयत्न करावा आणि त्यांत आनंद मिळवावा. मार्क नाहींत, प्रगतिपुस्तक नाहीं, खेळ नाहीं, सुट्टया नाहींत. लग्न किंवा व्यवसाय याबद्दलचा दुबळेपणा नाहीं. सर्व विद्यार्थ्यांना संपूर्ण समर्पणाची दिशा इथं दाखवली जाईल.

कांहींजण ह्या वाटेवर जरा खालीं थांबतील कदाचित्. त्यांना मुली भेटतील आणि जरा मर्यादित कुटुंबावर प्रेम करायला ते स्थिरावतील.

पण आयुष्यांतलीं सर्वांत चांगलीं वर्षं विशाल कुटुंबाच्या - मानवकुटुंबाच्या – सेवेच्या तयारीसाठीं घालवल्यामुळं ते कितीतरी चांगले निघतील. समोर आदर्श बाळगून आपल्या मुलाला वाढवायला तत्पर. त्याला त्याच शाळेकडे पाठवणारे. ते जास्ती चांगले आईबाप होतील.

तुमची अहंसेवा शाळा प्रत्येकाला लग्नासाठींच तयार करायला बघते. लग्न करणाऱ्यांच्या बाबतींतसुद्धां तिला फारसं यश मिळत नाहीं आणि त्यांच्यातला एकदा जर का अविवाहित राहिला तर तो अगदीं कडवट ब्रह्मचारी होतो.

**बेकार शिक्षक** शिक्षकाची संख्या वाजवीपेक्षां मोठी आहे अशा तक्रारी आम्हीं नेहमीं ऐकतों. तें खरं नाहीं. अध्यापन हा व्यवसायच सध्यां असां आहे कीं मनापासून मुळींच आवडत नसलेल्या कैकजणांना तो आकर्षित करतो. कामांचे तास वाढवा - बघा, ते सगळे सोडून जातील.

लग्न झालेली शिक्षिका नवऱ्याइतकेच पैसे मिळवते. प्रत्यक्षांत कांहीं ती एखाद्या गृहिणीपेक्षां जास्ती वेळ घराबाहेर नसते. अगदी आदर्श पत्नी आणि माता. मुलाला सर्दी झाली कीं

दरवेळीं ती घरीं राहते. अशी बाई बायको म्हणून कुणाला नको असेल?

खेरीज माध्यमिक शाळेंत न भरलेल्या हजारों जागा आहेत. कुठलीहि उच्च पदवी असलेल्या किंवा पदवीसाठीं शिकत असलेल्या (केमिस्ट, गुरांचा डॉक्टर, उनाडटप्पू विद्यार्थी) अशा कुणालाहि तुम्हीं तिथं भरतां.

पण वर्गांत शिकवण्याचा वर्षानुवर्षं अनुभव असलेल्या प्राथमिक शिक्षकांना कांहीं तुम्हीं या जागा देऊं करत नाहीं.

**जाती** आत्तांचे सत्ताधारी हे माजिस्त्रालेच्या पदवीधरांना माध्यमिक शाळेचीं दारं कधींच खुलीं करणार नाहींत.

उलट कांहींजण तर प्राथमिक शाळेंत शिकवायलादेखील विद्यापीठाची पदवी आवश्यक करावी असं सुचवताहेत. अध्यापनशास्त्र आणि मानसशास्त्र हे विषय विद्यापीठाच्या पातळीवरच अभ्यासायला हवेत असं त्यांचं म्हणणं.

विद्यापीठाचे पदवीधर शाळेवर टीका करतात आणि तिला रोगट म्हणतात तेव्हां आपल्याला तिनंच घडवलेलं आहे हें ते विसरतात. पंचविसाव्या वर्षापर्यंत याच विषावर ते वाढले. वेगळी परिस्थिती असलेल्या माणसांतसुद्धां कांही गुण असतील याची कल्पना पण त्यांना करतां येत नाहीं.

आपल्या मुलांच्या प्राथमिक शिक्षकांबरोबरचं त्याचं बोलणं आपल्या कुटुंबांतल्या माणसांबरोबर बोलावं तसं असतं. ते कांहीं लपवून ठेवत नाहींत. ते सहकार्यानं काम करतात.

पण माध्यमिक शाळेंतल्या शिक्षकांबरोबर बोलतांना मात्र जणूं कांहीं आपण शत्रूला तोंड देत आहोंत अशा रीतीनं आपले शब्द ते अगदीं तोलूनमापून वापरतात.

ते कबूल नाहीं करणार, पण खरं काय तें त्यांना माहीत आहे. प्राथमिक शिक्षक चांगले असतात, कारण त्यांनीं शिक्षणासाठीं फार वेळ घालवलेला नसतो. वरच्या शाळांतले शिक्षक आहेत हे असे आहेत, कारण त्या सगळ्यांना तशाच पदव्या आहेत.

## संस्कृति – सर्वांचीच गरज

**स्थलांतर** डोंगराळ भागांत आम्हांला जगणं शक्य नाहीं. आणि सपाटीवर आमची संख्या नको एवढी जास्त आहे. या मुद्दयावर सर्व अर्थशास्त्रज्ञांचं एकमत आहे.

आणि त्यांना नाहीं पटलं तरी काय? माझ्या आईबाबांच्या जागीं स्वतःला उभं करून पहा. तुमच्या मुलाला बाजूला सारलेलं तुम्हांला सहन होईल का? तर मग आम्हांला तुम्हीं तुमच्यामधें आनंदानं घ्यायला हवं – आणि तेंसुद्धां अकुशल कामालाच तेवढे योग्य असे दुय्यम दर्जाचे नागरिक म्हणून नव्हे.

प्रत्येक समाजाला स्वतःची अशी संस्कृति असते. आणि दुसऱ्यांपेक्षा ती मुळींच उणी नसते. आमची संस्कृति आम्हीं तुमच्यासाठीं भेट म्हणून आणतों. पुस्तकं वाचण्यापलीकडे कांहींहि केलेलं नाहीं अशा माणसांनीं लिहिलेल्या तुमच्या पुस्तकांचा कोरडेपणा कमी करायला तेवढीच जिवंत वाऱ्याची झुळुक!

**शेती संस्कृति** शाळेंत लावलेल्या पुस्तकाचीं पानं चाळतांना आम्हांला वनस्पती, प्राणी आणि निरनिराळे ॠतू दिसतात. हें फक्त शेतकऱ्यानंच लिहिलेलं असणं शक्य आहे असं वाटतं.

पण नाहीं. याचे लेखक ही तुमच्याच शाळेची निपज आहे. त्यांतल्या चित्रांकडे फक्त नजर टाकली तरी पुरे. डावखुरे

शेतकरी, गोल फावडीं, वांकड्या कुदळी, रोमन काळांतलीं अवजारं असलेले लोहार आणि प्लमचीं पानं असलेलीं चेरीचीं झाडं.

माझ्या पहिल्या यत्तेची शिक्षिका एक दिवस मला म्हणाली, – "त्या झाडावर चढ आणि माझ्यासाठीं कांहीं चेरी वेंच." माझ्या आईनं हें ऐकलं तेव्हां ती म्हणाली, 'कुणा मूर्खानं तिला मास्तरीण केलं तरी?'

तिला तुम्हीं शिकवायचा परवाना दिला. पण मला मात्र तुम्हीं तो नाकारतां – मला माझीं सर्व झाडं, अगदीं झाड न् झाडं ठाऊक आहे तरी.

मला माझी 'सॉर्मेंती' (द्राक्षाच्या वाळक्या फांद्या) देखील माहित आहे. मीं त्या फांद्या छाटल्या आहेत, गोळा केल्या आहेत, आणि भाकरी भाजायला त्या वापरल्या आहेत. माझ्या एका पेपरांत तुम्हीं 'सॉर्मेंती' हा शब्द चुकीचा म्हणून त्याच्याखालीं रेघ ओढलीत. हा शब्द 'सारमेंती' असा आहे, कारण तो लॅटिनपासून आला आहे असा तुम्हीं आग्रह धरला. नंतर शब्दकोशांत त्याचा अर्थ बघण्यासाठीं तुम्हीं नजर चुकवून निघून गेलांत.

**अगदी एकटे, कुत्र्यांसारखे** माणसांबद्दल तुम्हांला आमच्यापेक्षां कितीतरी कमी माहिती आहे. तुमच्या इमारतींतल्या माणसांकडे दुर्लक्ष करायला लिफ्ट हें उत्तम यांत्रिक साधन आहे. बसमधून प्रवास करणाऱ्या माणसांकडे कानाडोळा करायला गाडी आणि माणसांचे चेहरे पाहणं, त्यांच्या घरीं जाणं टाळण्यासाठीं टेलिफोन.

तुमच्याबद्दल मला ठाऊक नाहीं, पण सिसेरोची (लॅटिन लेखक) माहिती असणारे तुमचे विद्यार्थी जित्याजागत्या किती

माणसांना जवळून ओळखतात? त्यांच्यापैकी कितीजणांच्या स्वैपाकघरांत ते गेले आहेत? त्यांच्यापैकीं किती आजाऱ्यांच्या शेजारीं बसून त्यांनीं रात्र जागवली आहे? त्यांच्यापैकीं मेलेल्या कितीजणांना त्यांनी खांदा दिला आहे? आणि स्वतःवर एखादं संकट कोसळलं तर त्यांतल्या कितीजणांचा भरोसा त्यांना वाटतो?

१९६६ चा तो मोठा पूर फ्लोरेन्समधें आला नसता तर तळमजल्यावर राहणाऱ्या कुटुंबांत किती माणसं आहेत हेंसुद्धां त्यांना सांगतां आलं नसतं.

एक वर्षभर मी या तरुणांबरोबर एका वर्गांत होतों. पण त्यांचीं घरं-माणसं कशीं आहेत, मला कांहीं कल्पना नाहीं. आणि तरी त्यांची वटवट कधीं थांबतच नाहीं. कितीदांतरी ते इतक्या उंच आवाजांत बोलतात कीं ते काय म्हणताहेत हें कुणालाच कळू नये. बाकी त्यांना प्रत्येकाला फक्त स्वतःचंच तेवढं ऐकायचं असतं.

**मानवी संस्कृति** तुमच्या खिडक्यांखालून दररोज हजार मोटार-गाड्या आवाज करत जातात. त्या कुणाच्या आहेत, कुठं जाताहेत, तुम्हांला जराहि कल्पना नसते.

पण माझ्या दरीमधले मैलोगणती परिसरांतले आवाज मला ओळखतां येतात. हा दूरवरचा मोटरचा आवाज म्हणजे जरा उशीर झालेला, स्टेशनवर जात असलेला नेव्हिओ. हवं तर शेंकडों लोकांबद्दल, डझनावारी कुटुंबांबद्दल, त्यांच्या नातलगांबद्दल आणि मित्रमंडळींबद्दल सारं कांहीं मला तुम्हांला सांगतां येईल.

जेव्हां जेव्हां तुम्हीं एखाद्या कामगाराशीं बोलतां, तेव्हां तुमचा सूर चुकीचाच लागतो. तुमची शब्दांची निवड, तुमचा

स्वर, तुमचे विनोद - सारंच कांहीं चुकीचं. पण एखादा गिर्यारोहक गप्प असतो तेव्हांदेखील तो काय विचार करतो आहे हें मी सांगूं शकतों. आणि तो दुसऱ्या कशाबद्दल तरी बोलत असतो तेव्हासुद्धां त्याच्या मनाला काय चिंता लागून राहिली आहे हें मला कळतं.

तुमच्या कवींनीं तुम्हांला द्यायला हवी होती ती या प्रकारची संस्कृति. ही ९/१० जगाची संस्कृति आहे. पण अद्याप कुणींच ती शब्दांत किंवा चित्रांत किंवा चित्रपटांतून टिपलेली नाहीं.

निदान जरा नम्र तरी व्हा. आमच्या संस्कृतीइतकीच रुंद खिंडारं तुमच्याहि संस्कृतींत आहेत. कदाचित् आणखीन् मोठींच. ह्या कशाचीच जाणीव नसणं प्राथमिक शाळेमधल्या शिक्षकाला तर निश्चितच जास्ती हानिकारक आहे.

## तुम्हीं आमच्यावर लादतां ती संस्कृति

**लॅटिन** आम्हांला कधींच शिकवावा लागणार नाहीं असा तुमचा सर्वांत महत्त्वाचा विषय.

तुम्हीं आम्हांला इटालियनवरून लॅटिन भाषांतरदेखील करायला लावतां. पण लॅटिन संपतं कुठं नि इटालियन सुरूं होतं कुठं, यांतली सीमारेषा कोण काढणार?

कुणींतरी तुमच्यासाठीं लॅटिनचं व्याकरणदेखील लिहिलं आहे. ही भलीमोठी फसवणूक आहे. कारण प्रत्येकच नियमाचा उगम खरोखरीं कुठं न् केव्हां होतो हें माहीत असायला हवं.

मुलं असलीं ही व्याकरणाची शिक्षा स्वीकारतात आणि सर्व नियम अगदीं तोंडपाठ करतात. त्यांना काळजी असते काय ती फक्त पास होण्याची. ते स्वतः शिक्षक झाल्यावर ह्याच नियमावर बोट ठेवायचा खेळ ते पण खेळतील.

माझ्या एका पेपरांत तुम्हीं Portavit ह्या शब्दाखालीं रेघ मारलीत. Porta म्हणजे उचलणं, वाहणं. सोपं क्रियापद. त्याच अर्थी दुसरं कठिण Fero. पण गुंतागुंतीची करतां येईल अशी कोणतीहि गोष्ट सोपी करायला बघणं हा तुमच्या मतें गुन्हा आहे. एक चमत्कारिक गोष्ट अशी कीं सिसेरोनं मात्र अनेकदां 'पोर्तो'चा वापर केला आहे. 'तो रोमन होता आणि त्याला स्वतःला तें ठाऊकहि नव्हतं.' (पास्कारेलाच्या The Discovery of America कवितेमधली एक ओळ.)

**गणित** माजिस्त्रालेमधें वाईट तऱ्हेनं शिकवला जाणारा दुसरा विषय म्हणजें गणित. प्राथमिक पातळीवर शिकवण्यासाठीं प्राथमिक गणित येणं पुरेसं आहे. माध्यमिकच्या तीन यत्तांमधलं गणित केवळ जास्तीचं म्हणून आहे. खरं तर माजिस्त्रालेच्या अभ्यासक्रमांतून सारं गणित काढून टाकतां येईल. त्याऐवजीं गणित शिकवण्याची सोपी, चांगली पद्धत कोणती तें शोधून काढावं. ती पद्धत म्हणजे गणित नव्हे. पण शिकण्याच्या पद्धतीशीं किंवा शिकवण्याच्या शास्त्राशीं ती संबंधित असेल.

एखाद्या तज्ज्ञाच्या दोन-तीन तासांतून आपल्या सामान्य संस्कृतीचा एक भाग म्हणून थोडंसं उच्च गणित शिकवतां येईल. तें कशाबद्दल आहे हें त्यानं थोडक्यांत उलगडून सांगावं.

माजिस्त्रालेमधून पदवी घेणारे शिक्षक जरी भावी काळांत माध्यमिक यत्तांना शिकवायला लागले तरी परिस्थिति कांहीं त्यामुळं मुळांत बदलणार नाहीं.

खरं म्हणजे माध्यमिक पातळीवर शिकवण्यासाठीं गणिताच्या पदवीची मुळींच जरूरी नाहीं. विद्यापीठाची पदवी घेतलेलीं मुलं असलेल्या खास वर्गानंच हें सुरूं केलं. त्यामुळं कुणालाहि

हव्याहव्याशा वाटणाऱ्या २० हजार ४७८ नोकऱ्या त्यांना सहजपणं आपल्या खिशांत टाकतां आल्या. काम अगदीं कमी - आठवड्याला फक्त सोळा तास. पुन्हां त्यांतहि डोक्याला ताण नाहीं. त्याचत्याच खुळचट गोष्टी अशा नोकरींत वर्षानुवर्ष पुन्हांपुन्हां शिकवत राहतां येतात. ह्या गोष्टी पण अशा कीं माध्यमिकच्या तिसऱ्या यत्तेंतल्या कुठल्याहि विद्यार्थ्याला त्या आधींच ठाऊक असतात. ह्या नोकरींत सगळ्या विद्यार्थ्यांचे पेपर तपासायला फार तर पंधरा मिनिटं लागतात. कारण उत्तरं एकतर 'बरोबर ' किंवा 'चूक' एवढींच लिहायचीं असतात.

**तत्त्वज्ञान** एखाद्या बारक्याशा गाइडवरून कुठल्याहि विचारवंतांचा अभ्यास करणं भलतंच कंटाळवाणं असतं. इतके विचारवंत आणि ते इतक्या कांहीं गोष्टी सांगत असतात.

माझ्या तत्त्वज्ञानाच्या शिक्षकांनीं कुणाच्याहि बाजूनं किंवा विरुद्ध असं मत केव्हांच मांडलं नाहीं. त्यांना हे सगळेच आवडाताहेत कीं ते सगळ्यांच्याचबद्दल बेफिकीर होते हें कांहीं मला समजलं नाहीं.

दोन शिक्षकांमधून मला एकाची निवड करायची असेल - एक त्या विषयाचं वेड असलेला आणि दुसरा त्याबद्दल पूर्णपणं उदासीन - तर मी पहिलाच पत्करेन. त्याला स्वतःचं असं मत असेल किंवा एखादा विशिष्ट विचारवंतच त्याला मान्य असेल. तो नक्की असं त्याच विचारवंताबद्दल फक्त बोलेल आणि बाकी साऱ्यांवर हल्ला चढवेल. पण शाळेंतल्या आमच्यी तीन वर्षांत ह्या विचारवंताचं मूळ लिखाण तो आम्हांला वाचायला लावेल. तत्त्वज्ञान आपलं सबंध आयुष्य व्यापून टाकूं शकतं हें आम्हांला या अवधींत पटेल.

**अध्यापनशास्त्र** मला अगदीं ठामपणानं नाहीं सांगतां येणार, पण अध्यापनशास्त्र आज अशातऱ्हेनं शिकवलं जातं कीं मी तें पुरतंच गाळून टाकीन. कदाचित् आपण त्या विषयांत खोलवर गेलों तर त्यांत सांगण्यासारखं कांहीं आहे कीं नाहीं हें आपल्याला ठरवतां येईल.

आपल्याला कदाचित् दिसून येईल कीं अध्यापनशास्त्र फक्त एकच गोष्ट सांगत आहे - प्रत्येक मुलगा निराळा आहे, प्रत्येक ऐतिहासिक क्षण वेगळा आहे. म्हणून प्रत्येक मुलगा, प्रत्येक देश, प्रत्येक परिस्थिति आणि प्रत्येक कुटुंबासाठीं प्रत्येक क्षण वेगवेगळा आहे.

हें स्पष्ट करण्यासाठी लावलेल्या पुस्तकांतलं फक्त अर्धं पान पुरेसं आहे. बाकीचीं पानं फाडून फेंकून द्यायला हरकत नाहीं.

शिकवण्याबद्दलचा कोणता-ना-कोणता प्रश्न उद्भवला नाहीं असा बार्बियानाच्या शाळेंत एकहि दिवस गेला नाहीं. पण आम्हीं त्याला कधीं अध्यापनशास्त्र म्हणून ओळखलं नाहीं. आमच्यासाठीं त्या प्रश्नाला नेहमींच त्या-त्या मुलाचं नांव होतं. प्रत्येकच वेळीं - पुन्हां पुन्हां.

गियानीबद्दल आम्हांला आधींच ठाऊक नाहीं असं कांहीं सांगणारा प्रबंध कुणाहि प्राध्यापकानं लिहिला असेल असं मला वाटत नाहीं.

**बायबल** तीन वर्षं महाकाव्यांच्या (इलियड, ओडेसी, इनिड) वाईट भाषांतरांचा अभ्यास करण्यांत घालवलीं. तीन वर्षं डांटे वाचण्यांत आणि बायबलसाठीं एक मिनिटसुद्धां नाहीं.

बायवल हा केवळ धर्मोपदेशकांचाच प्रांत आहे असा दावा करूं नका. धार्मिक मुद्दा बाजूला ठेवला तरी प्रत्येक शाळेंत प्रत्येक वर्षी वाचला जावा असा हा ग्रंथ आहे.

ज्या ग्रंथानं सर्व देशांच्या सरहद्दी ओलांडून साऱ्या जगभर आपला खोल ठसा उमटवला आहे, त्याच्या अभ्यासाला वाङ्मयाच्या अभ्यासक्रमांत सर्वांत जास्त वेळ मिळायला हवा.

भूगोलाच्या वर्गांत मोठं प्रकरण पॅलेस्टाईनचं असायला हवं. इतिहासांत येशूच्या प्रत्यक्ष आयुष्यांत - त्याच्या जन्माआधीं आणि नंतर - घडलेले प्रसंग असायला हवेत.

जुन्या कराराचं वाचन, कराराच्या चारी प्रतींच्या एकत्रित पुस्तकाचा अभ्यास, कराराच्या जुन्या हस्तलिखितांतल्या फरकांचा अभ्यास, आणि भाषाशास्त्र, पुराशास्त्रविषयक संबंधित प्रश्न - ह्या सगळ्या गोष्टींनीं मिळून ह्या विषयाचा अभ्यासक्रम बनायला हवा. हें तुमच्या डोक्यांतच कसं आलं नाहीं? असं असेल का कीं तुमच्या शाळांची आंखणी करणाऱ्या मंडळींचा येशूवर अजिबातच विश्वास नव्हता? कारण येशू हा गरिबांचा एवढा जिवाभावाचा सखा आणि मालदारांना पारखा!

**धर्म** शिक्षणांत बायबलला योग्य जागा मिळाली कीं धर्मशिक्षणाला महत्त्व येईल.

मूळ लिखाणाचा अर्थ लावायला मुलांना मार्गदर्शन करणं एवढाच काय तो प्रश्न. एखाद्या धर्मोपदेशकालासुद्धां हें करतां येईल. विशेषतः धर्मोपदेशकाइतकंच बायबलचं चांगलं ज्ञान असलेल्या एखाद्या नास्तिक पण विचारी शिक्षकाच्या जोडीनं.

अशा शिक्षकांना तुम्हीं धुंडाळायला लागलांत कीं तुमच्या संस्कृतीच्या मर्यादा तुम्हाला अगदीं ठळकपणं दिसायला लागतील.

वरच्या पातळीवर बायबल शिकवूं शकतील असे डझनावारी धर्मोपदेशक फ्लोरेन्समधें आहेत. त्यांना ग्रीक अगदीं सहजच वाचतां येतं आणि गरज पडलीच तर पुरेसं हिब्रू पण समजतं.

वादविवादांत यांना तोडीस तोड तोंड देऊ शकेल असा आणि धर्मोपदेशक नसलेला एखादा माणूस तुम्हांला सुचवतां येईल का? तुमच्या शाळांतून तयार झालेला – चर्चच्या पठडींतला नाहीं.

बायबल सोडून जगांतलीं यच्चयावत् पुस्तकं वाचलेल्या एका तरुण विचारवंताच्या भाषणांत मीं ऐकलं – 'गीद म्हणतो, गव्हाचा दाणा जमिनीवर पडलाच नाहीं तर जिवंत असून त्यांतून नवीन दाणे धरणार नाहींत.'

आतां हें श्रीयुत गीद कोण हें कांहीं मला ठाऊक नव्हतं. कोशांत आम्हांला ते मिळाले. फ्रेंच लेखक. बहुधा त्यांनीं या धर्मग्रंथांतलं वाक्य आपल्या पुस्तकांत वापरलं आणि या प्राध्यापकाला तें लेखकाचंच वाटलं. पण बायबल हा अनेक वर्ष माझ्या अभ्यासाचा विषय आहे. आणि आयुष्यभर मी त्याचा अभ्यास करतच राहीन.

**सरदार** बायबल विसरलेलीं माणसं कांहींहि करायला धजतील, तुम्हीं शिकवतां त्या प्रत्येकच गोष्टीबद्दल संशय घेतां येईल. या निवडी केल्या तरी कुणीं याचंच नवल वाटायला लागतं.

तुमच्या शाळेच्या जन्मापासूनच तिच्या अडचणींना सुरवात झाली हेंच खरं.

तिचा जन्म झाला १८५९ मधें. दुसरा वित्तोर एमान्युएल तेव्हां राजा होता. आपल्या कुटुंबाची मालमत्ता त्याला वाढवायची होती. म्हणून त्यानं युद्धाच्या तयारीला सुरवात केली. पहिली

गोष्ट म्हणजे एका सेनापतीला त्यानं कारभारी म्हणून बसवलं. नंतर लोकसभेला सुट्टी दिली. शेवटीं त्यानं एका सरदाराला बोलावलं आणि त्याला देशांतल्या शिक्षणावर कायदा लिहायला लावला.

शस्त्राच्या बळावर संपूर्ण इटालीमधें लादलेला हा कायदा अजूनी आपल्या शालेय शिक्षणाचा आधारस्तंभ आहे.

**इतिहास** या कायद्यानं सगळ्यांत नुकसान केलं तें इतिहास या विषयाचं!

पण साधारणपणानं तीं पुस्तकं म्हणजे इतिहास नव्हेच. जेत्यांनीं शेतकऱ्यांपर्यंत ढकलेल्या त्या संकुचित एकतर्फी फालतू गोष्टी आहेत. इटाली जगाच्या अगदीं केंद्रस्थानीं. पराजित नेहमींच वाईट, जेते सर्व चांगले. राजे, सेनापती आणि देशां-देशांमधलीं अडाणी युद्धं यांच्याबद्दलच्याच गोष्टी. कामगारांचीं दुःखं आणि लढे यांच्याकडे एकतर दुर्लक्ष तरी केलेलं. नाहींतर त्यांना वळचणीला खुपसून ठेवलेलं.

सेनापति नि शस्त्रांच्या कारखानदारांना न आवडणाऱ्या माणसाचे दिवस भरलेच म्हणून समजा. सर्वांत चांगल्या 'अत्याधुनिक' पुस्तकांतसुद्धां गांधींना केवळ नऊच ओळींत आटपलं आहे. त्यांचे विचार आणि त्याहिपेक्षां त्यांचा कार्यक्रम यावर चकार शब्दहि नाहीं.

**नागरिकशास्त्र** मला कांहीं माहिती आहे असा दुसरा विषय म्हणजे नागरिकशास्त्र. पण तुमच्या शाळांतून तो येतच नाहीं.

सबब सांगावी तसं कांहीं शिक्षक म्हणतात कीं दुसऱ्या विषयांतून नकळत हा विषय शिकवला जातो. हें खरं असतं

तर त्यावर विश्वास ठेवणंच अवघड इतकं तें चांगलं होतं! कुठलाहि विषय शिकवायला हा जर खरोखर इतका थोर मार्ग आहे तर सगळ्याच विषयांसाठीं हाच मार्ग ते कां धरत नाहींत? ज्यांत सगळे घटक एकत्र मिसळलेले आहेत आणि तरीहि कोणत्याहि वेळीं स्वतंत्रपणं ते वेगळे काढतां येतील अशी एक भक्कम बांधलेली इमारत!

खरं तर आपल्याला नागरिकशास्त्र फारसं कळत नाहीं हें कबूल करा. महापौर म्हणजें नेमकं काय याची अगदीं अंधुकशीच तेवढी कल्पना तुम्हांला आहे. एखाद्या कामगाराच्या घरीं तुम्हीं कधींच जेवलेला पण नाहींत. सार्वजनिक वाहतुकीच्या भिजत पडलेल्या प्रश्नाच्या सगळ्या बाजू तुम्हांला ठाऊक नाहींत. तुम्हांला ठाऊक आहे तें एवढंच कीं ही वाहतुकीची कोंडी तुमचं खाजगी आयुष्य बिघडवून टाकते आहे.

तुम्हीं या प्रश्नांचा अभ्यास कधीं केलेलाच नाहीं. कारण ते प्रश्न तुम्हाला घाबरवून टाकतात. जशी भूगोलाच्या अर्थाच्या तळाशीं जायची तुम्हांला भीति वाटते. तुमच्या पुस्तकांत साऱ्या जगाचा समावेश आहे, मात्र भूक, मक्तेदारी, राजकीय पद्धति आणि वंशवाद यांचा साधा उल्लेख पण नाहीं.

**शेरे** तुमच्या अभ्यासक्रमांत एक विषय पुरता गाळलेलाच आहे – लिहिण्याची कला.

तुमच्या विद्यार्थ्यांच्या निबंधावरतीं तुम्हीं जे शेरे मारतां, त्यांतले फक्त कांहीं पाहिले तरी पुरे. त्यांचा शेलका संग्रह माझ्यापाशीं आहे - इथंच. हे शेरे म्हणजे एकदम ठाम विधानं. लेखन सुधारण्यासाठीं उपयोगी असं कधींच कांहीं नाहीं.

‘पोरकट. उथळ. अप्रगल्भता दिसते. अगदीं सामान्य. फालतू’. - या प्रकारच्या शेऱ्यांचा मुलाला काय उपयोग होणार? त्यानं आपल्या आजोबांना शाळेला पाठवावं, ते जास्ती प्रौढ आहेत.

दुसरे कांहीं शेरे : ‘क्षुद्र मुद्दे. अपुरी समज. फिक्या कल्पना. लिहिलेल्यांत जीव नाहीं.’ तर मग विषयच चुकीचा असला पाहिजे. तो द्यायलाच नको होता.

किंवा ‘रचना सुधारण्याचा प्रयत्न कर. चुकीची रचना. संकुचित. अस्पष्ट. बांधणी नीट नाहीं. ढिसाळपणा. जास्ती सोपेपणानं लिहिण्याचा प्रयत्न कर. वाक्याची मांडणी सगळी चूक. स्वतःचं म्हणणं व्यक्त करायची पद्धत सहज नाहीं. अभिव्यक्तीच्या माध्यमावर अधिक चांगला ताबा हवा.’ – हें सारं तर तुम्हीं च शिकवायला हवं होतं. पण लिहायला शिकवतां येतं यावरच तुमचा विश्वास नाहीं. लिहिण्याच्या कलेचे कांहीं वस्तुनिष्ठ नियम आहेत हें तुम्हांला पटतच नाहीं. एकोणिसाव्या शतकांल्या व्यक्तित्ववादांत अजुनी तुमचं लोणचं घालून ठेवलेलं आहे.

नंतर दैवी हस्तस्पर्श झालेला प्राणीहि आपल्याला भेटतो. ‘उत्स्फूर्त. कल्पनावैभव. उठून दिसणाऱ्या व्यक्तिमत्त्वाशीं सुसंगत असा कल्पनांचा योग्य उपयोग.’ – इतकं पुढं गेल्यावर ‘जिनं तुला जन्म दिला ती माता धन्य आहे’ अशी भर घालायला काय हरकत आहे?

**प्रतिभाशाली** ‘लेखक जन्मावे लागतात. निर्माण करतां येत नाहीत’ असा शेरा ठोकून आणि अगदीं खालची श्रेणी देऊन माझा एक निबंध तुम्हीं परत केलांत. दरम्यान इटालियनचे शिक्षक म्हणून तुम्हांला पगार मात्र मिळतच होता.

प्रतिभेचा सिद्धांत हा मध्यमवर्गीय शोध आहे. वंशवाद आणि आळशीपणा यांच्या मिश्रणामधून तो जन्माला आला.

राजकारणांत पण तो उपयोगीं पडतो. चिकार पक्षांच्या गुंतावळ्यांतून वाट काढण्यापेक्षां एखाद्या द गॉलचा आधार घेणं, त्याला प्रतिभाशाली म्हणणं आणि द गॉल म्हणजेच फ्रान्स असं म्हणणं हें सारं तुम्हांला सोपं वाटतं.

इटालियनचा वर्ग तुम्हीं याच पद्धतीनं चालवतां. पिएरिनोला ती देणगी आहे. मला नाहीं. तेव्हां आतां त्याबद्दल आपण निवांतच राहूं या.

आपण काय लिहितों याचा पिएरिनो विचार करतो कीं नाहीं याला महत्त्वच नाहीं. त्याच्याभोंवतीं आधींच असलेल्या पुस्तकांसारखींच आणखी पुस्तकं तो लिहील. त्यांतल्या एकाहि कल्पनेला धक्का न लावतां त्या पाचशेंचीं पन्नास पानं आपल्याला सहज करून घेतां येतील.

शरणागती शिकून मला माघारी जंगलांत जातां येईल.

तुम्हीं - समोरच्या प्रगतिपुस्तकांत लहानलहान खुणा करत टेबलामागं वेळ काढत तुम्हांला बसून राहतां येईल!

**कलासंप्रदाय** दुसऱ्या कोणत्याहि कौशल्याप्रमाणंच लेखनकला पण शिकवली जायला हवी.

पण इथं बार्बियानामधें या प्रश्नावर आमच्यामधेंच चर्चा झाली. एका गटाला या लेखनाबद्दल आपण कोणती पद्धत वापरतों त्याचं वर्णन हवं होतं. दुसरे म्हणाले, 'कला हा गंभीर विषय आहे - त्यांतलीं तंत्र असतील सोपीं. पण वाचक आपल्याला हंसतील.'

गरीब आपल्याला हंसणार नाहींत. श्रीमंतांना हंसायचं तितकं हंसूं द्या. आणि पुस्तक किंवा वर्तमानपत्र लिहिण्याचं गरिबांच्यासारख कसब त्यांच्याजवळ नाहीं, म्हणून आपण त्यांना हंसूं या.

अखेर ज्या वाचकांना आपल्याबद्दल जिव्हाळा असेल, त्यांच्यासाठीं सारं कांहीं लिहून काढायचं आम्हीं ठरवलं.

**साधंसुधं कौशल्य** आम्हीं करतों तें असं : सुरवातीला – आमच्यापैकीं प्रत्येकजण आपल्या खिशांत एक टिपणवही बाळगतो. प्रत्येक वेळीं एखादी कल्पना सुचली कीं प्रत्येकजण तिची नोंद करतो. प्रत्येक कल्पना वेगळ्या पानावर, एका बाजूला.

नंतर एक दिवस आम्हीं सगळे कागद एकत्र गोळा करतों आणि एका मोठ्या टेबलावर पसरतों. एकामागून एक आम्हीं ते बघत जातों. त्याच-त्याच कल्पना वगळण्यासाठीं. त्यानंतर एकमेकांशीं संबंधित कागदांचे आम्हीं स्वतंत्र ढीग करतो. यांतून प्रकरणं तयार करायचीं. प्रत्येक प्रकरण छोट्याछोट्या गड्डयांत विभागलं जातं. त्यांचे परिच्छेद बनवायचे.

इथं प्रत्येक परिच्छेदाला मथळा देण्याचा प्रयत्न आम्हीं करतों. हें जमलं नाहीं तर त्याचा अर्थ एकतर परिच्छेदांत कांहीं मुद्दा नाहीं. किंवा अनेक मुद्दे एकत्र कोंबलेले आहेत. मग कांहीं परिच्छेद नाहीसे होतात. कांहीं तोडले जातात.

परिच्छेदांना नांव देतांनाच त्यांच्या तर्कशुद्ध अनुक्रमाचा आम्हीं विचार करतों - एक आराखडा तयार होईपर्यंत. आराखडा पक्का झाला कीं त्याला अनुसरून साऱ्या गड्डयांची परत मांडणी करतों.

पहिला गठ्ठा घेऊन आम्हीं टेबलावर कागद पसरतों आणि त्यांचा अनुक्रम शोधतों. लिखाणाचा पहिला आराखडा मांडायला ही सुरवात झाली.

मग त्याच्या नकला काढतों. म्हणजे आमच्या प्रत्येकाच्या पुढ्यांत त्याची एकेक प्रत मिळते. मग कात्री, गोंद आणि रंगीत पेन्सिली. आम्हीं तें सारं पुन्हां फिरवतों. नवीन कागद जोडले जातात. पुन्हां त्याच्या प्रती.

मग आम्हां सर्वांची शर्यत सुरूं होते. टाळतां येणारा कोणताहि शब्द, कोणतंहि जास्तीचं विशेषण, पुनरुक्ति, खोटेपणा, कठिण शब्द, मोठमोठीं वाक्यं आणि एका वाक्यांत जबरदस्तीनं कोंबलेल्या दोन कल्पना – हें सारं शोधायची शर्यत.

एकामागून एक बाहेरच्या लोकांना आम्हीं बोलावतों. ते फार शिकलेले नसतील तर अधिक बरं. आम्हीं त्यांना मोठ्यानं वाचायला सांगतों. आणि आम्हांला जें म्हणायचं होतं तें त्यांना समजलं आहे का ह्याच्याचवर डोळा ठेवून राहतों.

त्यांच्या सूचना आम्हीं स्वीकारतों - त्यामुळं मूळ लिखाण जास्ती स्पष्ट होत असेल तरच. सावधगिरीच्या नांवाखालीं केलेल्या साऱ्या सूचना आम्हीं नाकारतों.

ही सारी मेहनत केल्यावर आणि कुणालाहि वापरतां येतील असे हे नियम पाळल्यावर आमची एखाद्या विचारवंत मूर्खाशीं गांठ पडते. आणि तो जाहीर करतो, "या पत्राला अगदीं डोळ्यांत भरण्याजोगी व्यक्तिगत शैली आहे."

**आळशीपणा** लेखनकला म्हणजे काय हें आपल्याला माहीत नाहीं हें तुम्हीं कबूल कां करत नाहीं? ही कला म्हणजे आळशीपणाचं अगदीं विरुद्ध टोक. आणि आपल्याला यासाठीं वेळ

नाहीं असं सांगूं नका. पुऱ्या वर्षभरांत एक मोठा पेपर लिहिला तरी पुरेसं होईल. पण तो साऱ्या विद्यार्थ्यांनीं लिहिलेला असला पाहिजे.

आळशीपणाचा विषय निघालाच आहे तर तुमच्या विद्यार्थ्यांना रिझवायला एक प्रयोग मी सुचवीन : सैताचं इतिहासाचं पुस्तक अस्सल इटालियनमधें भाषांतर करण्यासाठीं एक वर्ष कां घालवूं नये?

## फौजदारी खटला

तुम्हीं वर्षाकांठीं २१० दिवस काम करतां. त्यांतले तीस जातात परीक्षांमधें. आणि तीस आणखीच्या चांचंण्यांसाठीं. म्हणजे वर्षांमधें शाळेचे दिवस राहिले फक्त १५०. या शाळेच्या दिवसांतले अर्धे तोंडी परीक्षांमधें खर्च होतात. याचा अर्थ असा कीं २१० पैकीं १३५ दिवस निकाल देण्यासाठीं तर उलट फक्त ७५ दिवस शिकवण्यासाठीं.

तुमच्या कामाचा करार जरासुद्धां न बदलतांदेखील शिकवण्याचे तास तुम्हांला तिप्पट करतां येतील.

**वर्गातंच परीक्षा** परीक्षा घेत असतांना डेस्कांच्या रांगांमधून वरपासून खालपर्यंत तुमच्या फेऱ्या चालायच्या. आणि मी अडचणींत आहें, चुका करतों आहें, हें बघूनसुद्धां तुम्हीं कधीं एक चकार शब्द बोललां नाहींत.

घरीं पण तेंच. मदतीसाठीं वळावं असं आसपास मैलोन्मैल कुणीच नाहीं. ना पुस्तकं, ना टेलिफोन.

आतां इथं मी 'शाळेंत' आहें. शिकावं म्हणून मी अगदी दूरवरून आलों. 'बरं बाबा, आतां गप्प राहतें' असं कबूल करून पण शंभरदां मधेंमधें बोलणाऱ्या माझ्या आईला इथं मला तोंड

द्यावं लागत नाहीं. माझा भाचा पण गृहपाठांत मदत मागायला इथं नाहीं. इथं मला शांततां आहे. आणि स्वच्छ प्रकाश आणि एकट्या माझ्यासाठीं असं डेस्क.

आणि समोर कांहीं पावलांवर तुम्हीं उभ्या असतां. या साऱ्या गोष्टी तुम्हांला माहीत असतात. मला मदत करण्यासाठींच तुम्हांला पगार दिला जातो.

पण त्याऐवजीं जणूं कांहीं मी चोरच आहें अशा तऱ्हेनं माझ्यावर पहारा करत तुम्हीं तुमचा वेळ वायां घालवतां.

**सुस्ती आणि भीति** तोंडी परीक्षा म्हणजे कांहीं खरी शाळा नाहीं हें तुम्हीं स्वतःच मला सांगितलंत. "तुझ्या वर्गावर माझा पहिला तास असेल तेव्हां तूं उशिराच्या गाडीनं आलास तरी चालेल. कारण पहिला अर्धा तास मी तोंडी परीक्षाच घेणार आहें."

या परीक्षा चालूं असतांना सगळा वर्ग एकतर सुस्ती नाहींतर भीति यांत बुडालेला असतो. अगदीं त्या मुलाला प्रश्न विचारले जातात तोसुद्धां आपला वेळ फुकट दवडत असतो. तो कशाचा तरी आडोसा घ्यायला बघतो. फारसं समजत नसलेलं तो टाळतो आणि नीट येत असतं त्या गोष्टींवरच भर देत राहतो.

आपला माल कसा विकावा एवढंच आम्हांला समजलं तरी तुम्हांला खूष करण्यासाठीं तेवढंसुद्धां पुरें आहे. गप्प मात्र कधींच बसतां कामां नये. रिकाम्या जागा अर्थहीन शब्दांनीं कशा भराव्या तेवढं एक साधायला हवं आणि सापेग्नोमधले* टीकावजा

---

* सापेग्नो हा इतिहासाचा लेखक. खूप पुस्तकं वाचलेला. त्यांची तुलना करून टीका करणारा. त्यानं लिहिलेलंच पुन्हां उगाळलं कीं शिक्षक खूष.

शेरे पुन्हां बडबडून स्वतःचेच असल्याचं दाखवायचं आणि आपण मूळ वाचलं आहे असा आभास निर्माण करायचा. बस!

**वैयक्तिक मतं** कांहीं 'वैयक्तिक मतं' बोलून दाखवणं हें तर आणखीच चांगलं. या वैयक्तिक मतांना तुम्हीं फार मान देतां. 'माझ्या मतें, पेट्रार्क...' (१४ व्या शतकामधला इटालियन कवि) वगैरे. या मुलानं त्याच्या दोनेकच कविता वाचल्या असतील नसतील.

कांहीं अमेरिकन शाळांतून म्हणे असं चालतं – शिक्षक कांहीं मत देतो. तेव्हां अर्धे विद्यार्थी हात उंचावतात आणि म्हणतात, 'मान्य'. बाकीचे अर्धे म्हणतात, 'अमान्य!' हें चालूं असतांना जोराजोरानं च्यूइंग गम चघळणं चालूंच ठेवून ते बाजू बदलतात.

कुवतीपलीकडच्या गोष्टींवर आपलीं मतं देणारा विद्यार्थी मूर्ख असतो. त्याबद्दल त्याचं कौतुक होऊं नये. आपण शाळेंत जातों तें शिक्षक काय म्हणतो तें समजून घ्यायला.

क्वचित् प्रसंगीं आपलं स्वतःचं असं कांहीं वर्गाला किंवा शिक्षकाला उपयोगीं पडतं. हें स्वतःचं म्हणजे मतबीत नव्हे कीं पुस्तकांतून घेतलेलं कांहीं नव्हे. तर आपल्या स्वतःच्या डोळ्यांनीं घरीं, रस्त्यावर किंवा जंगलांत प्रत्यक्ष पाहिलेली एखादी निश्चित गोष्ट.

**चलाख प्रश्न** अशा गोष्टींबद्दल तुम्हीं मला कधीं प्रश्न विचारलेच नाहींत. आणि मी स्वतः होऊन त्यांच्याबद्दल कधींच कांहीं बोलणार नाहीं. पण तुमचे हे तरुण सद्गृहस्थ मात्र निरागस चेहऱ्यानं आधींच ठाऊक असणाऱ्या गोष्टींबद्दल विचारतच

राहतील, आणि 'काय चलाख प्रश्न!' म्हणून तुम्हीं त्यांना उत्तेजन देतच राहाल.

प्रत्येकालाच निरुपयोगी असा हा फार्स - त्या लाळघोट्यांना धोक्याचा, आणि हा खेळ खेळायला न येणाऱ्या माझ्यासारख्याला क्रूरपणाचा.

**दुसरी मृत भाषा** 'प्रचलित गद्यांत रूपांतर करा' – माझे डोळे फोस्कोला या १९व्या शतकाच्या सुरुवातीला होऊन गेलेल्या इटालियन कवीच्या कवितेवरून भिरभिरत होते. कुठं नजर स्थिर करावी तेंच कळत नव्हतं. तुम्हीं माझ्याजवळ येऊन हंसलांत आणि कुजबुजलांत, "सुरूं कर बाळ! इतकं सोपं आहे हें! कालच तर वर्गांत मीं या साऱ्याची उजळणी केली होती. तूं अभ्यास केलेला दिसत नाहींस."

खरं होतं. मीं अभ्यास केलेला नव्हता. मी माझ्या स्वतःच्या विद्यार्थ्यांना Inaugurare म्हणजे angurare male* हें कधींच शिकवणार नाहीं. तिथं तळटीपेंत तें स्पष्ट केलेलं आहे. पण तें खोटं आहे. फॉस्कोलानं तें रचलं, कारण त्याला गरिबांचा तिटकारा होता. त्याला आमच्यासाठीं कांहीं कष्टच घ्यायचे नव्हते.

ती चमत्कारिक भाषा मला अगदीं आत्मसात् व्हावी म्हणून तुम्हीं या सगळ्या टिपणांची वही ठेवायला सांगितली. ती भाषा मीं शिकावी असं तुम्हीं गृहीत धरलं होतंत. पण मी तिचा उपयोग कुठं करणार?

---

* Inaugurare, उद्घाटन करणं. Augurare male, धोक्याची पूर्वसूचना देणं.

भाषेचे सारे अडथळे ओलांडून डिकच्या पुढं हात करण्यासाठीं मी सगळ्या कसरती करायला तयार होतों. कामाच्या मधल्या सुट्टींत तो माझ्याशेजारीं बसायचा आणि Dolce Vita** म्हणायचा प्रयत्न करायचा. मी पण माझ्या बेकार कॉकनीमधें एखादा ग्राम्य विनोद करून प्रतिसाद द्यायचों. आणि माझे उच्चार त्याच्याइतकेच बिघडवायचा प्रयत्न करायचों. ऑफिसच्या आंत कधींहि बोलली न जाणारी कॉकनी. तुम्हांला गरिबांमधेंच ठेवणारी कॉकनी.

**कचाट्यांत अडकवणं** दरम्यान मिनिटं पुढं सरकत होतीं, आणि माझं तोंड उघडत नव्हतं. मी राग आणि निराशा यांत बुडून गेलों होतों.

तीं केविलवाणीं मुलं मला समजून घेऊं शकत नव्हतीं. तुमच्या मोंतीची भाषा स्वीकारायचं शिक्षण तुम्हीं त्यांना तान्हेपणापासूनच दिलं आहे. या कंटाळवाणेपणाला तीं कधींच शरण गेलीं आहेत. शाळेंत हें असंच असतं असं तीं धरूनच चाललेलीं असतात.

प्रेमळ सहानुभूतीनं तीं मला खुलवायला पाहायचीं. सेंट व्हिन्सेंट चॅरिटेबल सोसायटीच्या तरुण माणसांप्रमाणं त्यांना पण ‘खुन्नस’ कधीं दिसली नाहीं.

त्यांना मी नकोसा होतों असं नाहीं. तुम्हांलासुद्धां. “मी कांहीं तुला खाऊन टाकणार नाहीं!” तुमचं बोलणं इतकं धीर देणारं वाटत होतं! तुम्हांला माझ्याबद्दलचं आपलं कर्तव्य पार पाडायच होतं.

---

** Dolce Vita हा फेदेरिको फेलिनीचा प्रसिद्ध इटालियन चित्रपट.

आणि तें करत असतांनाच तुमच्या हातांत असलेल्या पदविकेचा धाक घालून माझा प्रत्येक आदर्श तुम्हीं नष्ट करत होतांत.

**कला** आत्तां मित्रांबरोबर बसून हें सगळं लिहून काढतांना मी कसा अगदीं शांत आहें! असं शांत व्हायला तोंडी परीक्षेच्या वेळीं मला जरा जरी अवधी मिळाला असता, तरी मला तुम्हांला हें नक्कींच पटवून देतां आलं असतं. तुम्हीं म्हणजे कांहीं एखादं हिंस्त्र जनावर नाहीं.

त्यावेळीं मात्र माझ्या मनांत फक्त गलिच्छ आणि अपमानकारक शब्दच तेवढे येत होते. वादविवादांत रोखून धरायची आटोकाट धडपड आपण करूं असे शब्द.

तर कला म्हणजे काय हें आम्हांला समजलं आहे. कुणीतरी, काहींतरी निवडणं हा तिचा अर्थ. त्याच्याबद्दल मनन करणं, शांतपणानं सांघिक काम करतांना आपल्या मदतीला मित्र असणं.

कीं मग सावकाश ती खुन्नस बाजूला सारून सत्य बाहेर येईल. एक कलाकृती जन्माला आली आहे - आपला शत्रु बदलावा म्हणून त्याच्यापुढं केलेला हात.

## संसर्ग

तुमच्या शाळेंत एक महिना गेल्यावर मला पण संसर्ग बाधला.

तोंडी परीक्षा चालूं असतांना माझी छाती धडधडण्याचं थांबलं. माझ्या लक्षांत आलं कीं आपल्या वांट्याला जें यायला नको असं मला वाटत होतं, तें इतरांच्या वांट्याला खुशाल येऊं दे असं मला वाटायला लागलं होतं.

मीं वर्गात लक्ष द्यायचं थांबवलं. पुढच्या तासाला होणाऱ्या तोंडी परीक्षांचाच फक्त विचार मी करायला लागलों.

सर्वांत जास्त आवडणारे विषय बंदिस्त आणि निर्जीव झाले. जणूं बाहेरच्या मोठ्या जगाशीं त्यांच्या कांहीं संबंधच नव्हता. जणूं फळा आणि शिक्षिकेचं टेबल यांच्या मधल्या कांहीं इंचांत त्यांना अडकवून ठेवतां येण्याजोगं होतं.

**किडा** घरीं आई आजारी कधीं पडली तें माझ्या लक्षांतच आलं नाहीं. कीं माझ्या शेजाऱ्यांत पण मला कांहीं रस उरला नाहीं. मीं कधीं वर्तमानपत्र वाचलं नाहीं. रात्रींसुद्धां मला झोंप लागेनाशी झाली.

आई रडली. माझे बाबा स्वतःशींच कुरकुरले : “तूं बाहेर जंगलांतच जास्ती चांगला असतोस.”

माझी अवस्था म्हणजे एखाद्या किड्यासारखी झाली होती.

एखादी गोष्ट विद्यार्थ्यांना शिकवायची झाली तर अभ्यासासाठीं मी जसा वेळ काढीन, तसाच वेळ तोंपर्यंत मी कोणत्याहि गोष्टीसाठीं देत होतों. कांहीं महत्त्वाचं वाटलं तर अभ्यासाचं पुस्तक टाकून मी तें समजून घ्यायला दुसऱ्या पुस्तकांचा अभ्यास करत होतों.

तुमचे उपचार घ्यायला लागल्यानंतर मात्र मला अभ्यासाचं पुस्तकदेखील भारी वाटायला लागलं. महत्त्वाच्या मुद्यांखालीं मी रेघा मारायला लागलों. नंतर माझ्या शाळासोबत्यांनीं घोकंपट्टींसाठीं मला आणखीच बारकीं पुस्तकं सुचवलीं. तुमच्या छोट्या डोक्यांचं समाधान करण्यासाठींच मुद्दाम तयार झालेलीं.

**संशय** तुमचं बरोबरच आहे आणि तुमची संस्कृति खरीच आहे असं वाटण्यापर्यंत मी आलों. आम्हीं डोंगरदऱ्यांत एकाकी राहणारे आपले भाबडेपणानं स्वप्नं बघतो. पण हा भाबडेपणा तुम्हीं टाकून दिल्याला आतां शेंकडों वर्ष लोटलीं आहेत.

कदाचित् प्रत्येकाला वाचतां येणाऱ्या, साध्यासुध्या शब्दांनीं बनलेल्या भाषेची आमची कल्पना म्हणजे वेळेआधीच पाहिलेलं दिवास्वप्न असेल.

तुमच्यापैकींच एक होण्यापासून मी अगदीं बालबाल बचावलों. नाहींतर वर विद्यापीठांत गेल्यावर आपला वंश बदलणाऱ्या गरीब मुलांसारखाच मी पण होऊन गेलों असतों.

**तिऱ्हाईत** पण तुम्हांला आवडलं असतं तितका बदलायला मला पुरेसा वेळच नव्हता. जूनमधें तुम्हीं मला इटालियनमधें ५ आणि लॅटिनमधें ४ मार्क दिलेत.

पुन्हां एकदां जंगलामधला तो रस्ता मीं धरला आणि बार्बियानाला परतलों. दिवसामागून दिवस, पहांटेपासून रात्रीपर्यंत, पुन्हां एकदां लहानपणींसारखं.

पण तरी शाळेला सगळा वेळ मीं दिला नाहीं. कारण मला या दोन परीक्षा पुन्हां द्यायच्या होत्या. वर्तमानपत्र वाचणं आणि छोट्या विद्यार्थ्यांना शिकवणं यांतून माझ्या शिक्षकानं मला सूट दिली. शांतता मिळावी म्हणून स्वतंत्रपणं एका खोलींत बसायची आणि घरीं नसलेल्या पुस्तकांचा अभ्यास करायची परवानगी पण मला दिली.

मेलेल्या जगांतून मी परतायचों तो फक्त आलेलीं पत्र वाचण्यासाठीं!

## पत्रं

**भीक** अल्जिरियाहून फ्रांकुचिओ

... इथं कांहीं भागांत जमीन अगदीं लाल आहे. आणि गवताचं एक पातंहि नाहीं. एकदम गाडी थांबते. काय झालं तें पाहण्यासाठीं मी खिडकीबाहेर डोकावतों. पायांपर्यंत पोंचणारे रंगीबेरंगी स्कर्ट घातलेल्या तीन मुली. त्या गाडीबरोबर चालतात. त्या भीक मागत नाहींत, पण लोक त्यांच्याकडे कांहीं फेंकतात. तें त्या पटकन् गोळा करतात आणि आपल्या पोलक्यांत दडवतात. गाडीच्या अगदीं शेवटच्या डब्यापर्यंत त्या पोंचल्यानंतर ड्रायव्हर गाडीचा वेग पुन्हां ताशीं तीस किलोमीटरइतका वाढवतो. बेनबेलाला ही भाक मागायची संवय मोडायची होती, पण उलटपक्षीं बॉमेदिएन ती चालूं देतो असं मला कळलं. याचा उलगडा मला अजून होत नाहीं कोण बरोबर? तुमचं काय मत, फादर?

**गरिबांची भाषा** फ्रांकुचिओचं दुसरं पत्र

...रस्त्यावर एक लाकडी कडं मिळालं आणि तें हवेंत उडवून पुन्हां झेलायला मीं सुरवात केली. माझ्याभोंवतीं वीसेक मुलं जमली. त्यांनीं हंसायला सुरवात केली आणि मीं तें त्यांच्याकडे फेंकावं म्हणून त्यांनीं हात वर केले. मीं तसं केलं आणि एकहि शब्द न बोलतां पांच मिनिटं हा खेळ सुरूं होता. एकाएकीं त्यांच्यांतल्या मोठ्या मुलानं थांबायची खूण केली. त्यानं माझं अरेबिक वृत्तपत्र पाहिलं आहे. तूं कुठून आलास आणि इथं काय करतो आहेस, असं त्यानं मला अरेबिकमधें विचारलं. बाजूच्या छोट्या मशिदीच्या पायऱ्यांवर आम्हीं बोलायला सुरवात केली. मौलवी आमच्याजवळ आला आणि माझ्याशीं भराभर

बोलायला लागला. मला त्याचे प्रश्न कळेनात. आणि मी अरब नाहीं पण मला फक्त अरेबिक वाचतां येतं, हें मला कबूल करावं लागलं. नंतर कुराण पढण्यासाठीं त्यानं मला मशिदींत नेलं. तो अगदीं उचंबळून आला होता.

**धर्म** फ्रान्समधून सांद्रो

त्यानं बाजूच्या रस्त्यावर गाडी थांबवली आणि गाडींत बसल्याबद्दल माझ्याकडे पैसे मागितले. 'मी कॅथॉलिक आहें, महाशय!' - मी म्हणालों. त्यानं नाद सोडून दिला. मी गोंधळून गेलों होतों. पण मला तिथंच सोडून दिलं त्यानं. आणि हमरस्त्यावर पोंचण्यासाठीं मला चार किलोमीटर चालावं लागलं.

**उकळलेलीं सूर्यफुलं** वेल्समधून फ्रांको

पापांची कबुली द्यायला आलेल्या परकीयांसाठी धर्मोपदेशकां-जवळ खास पुस्तिका आहे. तुम्हीं त्याला सांगतां 'मी २५ नंबरचीं दोन पाप केलीं, आणि १२ नंबरच्या तीन पापांबरोबर झगडलों.' त्यानं मला २५ नंबरवर नीतिपाठ दिला.

मी ह्या लहानुखुऱ्या म्हातारीसाठीं भाजी पिकवतों. आज अख्खा दिवसभर मला सूर्यफुलं खुडावीं लागलीं. ती शाकाहारी आहे. पण माझ्या एकट्यासाठीं म्हणून तिनं मांस विकत घेतलं असतं. मी नको म्हणालों. आणखी एक अनुभव. म्हणून मग तिनं दोन सूर्यफुलांचे देठ उपटले आणि माझ्यासाठीं ते शिजवले.

**राजकारणाबद्दल उदासीन मुलगी** मार्सायहून कार्लो

... इथं एका धर्मोपदेशकांबरोबर इटालियन विद्यार्थ्यांचा एक गट आहे. ते पगार न घेतां अल्जिरिअनांसाठीं बराकी बांधतात.

फ्रेंच शिकायचा उद्योग ते मुळींच करत नाहींत. त्यांना राजकारणाबद्दल कांहीं ऐकायचं नाहीं. व्हॅटिकन सल्लागार मंडळाबद्दल मात्र ते चिकार बडबड करतात, पण प्रत्यक्ष काम फारच कमी करतात. त्यांच्यापैकीं एक आहे अगदीं मूर्ख मुलगी. आज रात्रीं तुम्हांला पत्र लिहिण्यासाठीं म्हणून मी माझ्या खोलींत गेलों, तर ती माझ्यापाठोपाठ आली आणि फ्लोरेन्सचे पुरुष आपल्याला अगदीं वेड लावतात असं म्हणून तिनं स्वतःला माझ्या बिछान्यावर झोंकून दिलं.

**खोट्याची स्तुति** लंडनहून एदोआदों

... हा सगळा दोष आपल्या मुलांचे अति लाड करणाऱ्या पालकांचा आहे. ते त्यांना पैसे कसे खर्चावे हें शिकवत नाहींत. मुलं चक्क आई-बापांच्यावर हुकमत गाजवतात. आणि आईवडील त्यांना प्रौढांप्रमाणंच वागवतात. याच्या बदल्यांत पालकांना मुलांचा विश्वास मिळतो. मुलाला वाईट गोष्टींपासून दूर ठेवण्या-साठीं एखादेवेळीं खोटंसुद्धां बोललं तरी त्यांत एवढं गैर काय आहे? माझ्या मनांतलं मला स्वच्छपणानं सांगतां आलं आहे कीं नाहीं कोण जाणें. तशी इंग्रज मुलं फार प्रामाणिक आहेत. पण कांहीं केलं तरी त्यांची आई त्यांना कधींच रागावत नसेल तर मग ह्या प्रामाणिकपणाला तरी काय किंमत?

आणि पालकांना तरी ह्यांतून काय मिळतं? समजा, खोटं बोललों तर आपलं काय चुकल हें मला माहीत असल्याची ती निशाणी असते. आणि पुन्हां तशी चूक करण्याआधीं मी दहा वेळां विचार करीन.

**आमच्या जमेला** कामगार संघटनेचा जुना कार्यकर्ता इंग्लंडहून पाब्लोबद्दल लिहितो :

..... पाब्लो म्हणजे जणूं ईश्वराकडून आमच्या कारखान्याला मिळालेलं वरदान आहे. आणि तुमच्या शाळेचं खरं भूषण. जीवनाबद्दल तो इतका जागरूक आणि आनंदी आहे! मला वाटतं ही गोष्ट ईश्वरानंच घडवून आणलेली आहे. तुम्हीं आणि मी - एकमेकांपासून आपण इतक्या दूर अंतरावर आहोंत, आणि तरीही आपण बोलतों आणि विचार करतों तो सारखेपणानं. इथं कितीतरी कामगार हुजूर पक्षाला मत देतात. आणि साहेबाचं वर्तमानपत्र वाचतात. आणि मी त्यांना सांगतों, 'हा मुलगा इटालीपासून इथवर येईपर्यंत माझ्यासारखंच विचार करणारं कुणी मिळायला मला थांबावं लागलं. एक मुलगा - आणि तो पण रोमन कॅथॉलिक - इथं येतो आणि तुम्हांला चक्क शिकवतो!'*

**ॲनिबाल कारो** सगळीं पत्रं वाचून झालीं कीं पुन्हा मी 'इनिड' घेऊन स्वतःला कोंडून घेतों.

तुम्हांला आवडणारं उपाख्यान मी वाचतों.

---

* आंतरराष्ट्रीय करारानं १८ वर्षांच्या खालच्या मुलांना परदेशीं जाऊन काम करायला मनाई केलेली आहे. पण कामगार कायदे फक्त इटालींतच मोडले जातात असं नाहीं. बार्बियानाच्या मुलांनीं इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रिया, अल्जीरिया, लिबिया या देशांत कामं केलीं आहेत. उदाहरणार्थ, हीं पत्रं लिहिणारीं मुलंच पहा : 'फ्रांकुचिओ १६ वर्षांचा आहे, सांद्रो १५ वर्षांचा, फ्रांको १४, कार्लो १६, एदोआर्दो १६.

लोक झोंपले असतांना दोन अत्याचारी गुंड त्यांचे कोथळे बाहेर काढत असतात. यादी : कोथळे काढलेलीं माणसं, चोरलेल्या वस्तू, बक्षीस म्हणून कमरपट्टे दिलेल्या माणसांचीं नांवं आणि प्रत्येक पट्टयाचं वजन. सगळी गोष्ट एका जन्मतःच मेलेल्या भाषेंत. इटालियन शाळांत 'इनिड' वाचलं जातं तें ॲनिबाल कारो या १६व्या शतकांतल्या लेखकानं केलेल्या भाषांतराच्या स्वरूपांत!

'इनिड' हा कांही अभ्यासक्रमाचा भाग नव्हता. तुम्हीं तें निवडलंत. याबद्दल मी तुम्हांला कधींच माफ करणार नाहीं.

माझे मित्र मात्र मला माफ करतात. त्यांना ठाऊक आहे, शिक्षक होणं हें माझं ध्येय आहे. पण तुमच्यासारखाच मी पण वास्तवापासून तुटलेला आहें.

## निर्जंतुकीकरण

**उथळ** सप्टेंबरांत तुम्हीं दोन्ही परीक्षांत मला चौथी श्रेणी दिलीत. आपल्या औषधविक्रेत्याचा धंदा पण तुम्हांला नीटपणानं करतां येत नाहीं. तुमचीं वजनं बरोबर नाहींत. जूनमधें येत होतं त्यापेक्षां आतां मला कमी कसं यायला लागलं?

तुम्हीं एक विजेचं बटण दाबलं आणि एका मुलाला नाहींसं केलं, पण प्रत्यक्षांत नकळत तुम्हीं माझा दिवा लावलांत. तुम्हीं आणि तुमची संस्कृति याबद्दल माझे डोळे उघडलेत.

सगळ्यांत पहिलं म्हणजे तुमचं वर्णन करणारा अचूक, अपमानकारक शब्द मला सांपडला आहे. तुम्हीं केवळ 'उथळ' आहांत. तुम्हीं म्हणजे 'अहो रूपम् अहो ध्वनिम्' करणाऱ्यांचा समुदाय. तुमचा समाज आज तगून आहे कारण तुम्हीं अगदीं थोडें आहांत.

**सूड** माझे बाबा आणि भाऊ माझ्यासाठीं जंगलांत जातात. मला पुन्हां ती वाट धरतां येत नाहीं. आणि जगाला आपल्या वाटेनं जाऊ दे असं म्हणून पाठीवरून सर्पण वाहात राहायची माझी तयारी नाहीं. कारण मग तर तुम्हांला जास्तीच बरं वाटेल.

तेव्हां मी पुन्हां बार्बियानाला परत गेलों आणि जूनमधें पुन्हां परीक्षेला बसलों.

जमिनीवर थुंकावं तसं याहि खेपेला तुम्हीं मला पुन्हां नापासच केलंत. तरी मी सोडून देणार नाहीं. मी शिक्षक होणारच – आणि तुमच्यापेक्षां जास्ती चांगला शिक्षक होणार.

**दुसरा सूड** मी उगवत असलेला दुसरा सूड म्हणजे हें पत्र. आम्हीं साऱ्यांनीं मिळून यावर काम केलं आहे.

अगदी गियानीनंसुद्धां. त्याचे वडिल इस्पितळांत आहेत. फक्त आतां आहे तसा गियानी गेल्या वर्षी मर्द असता तर! पण आतां आणखी शिकायला त्याला फार उशीर झाला आहे. शिकाऊ उमेदवार म्हणून त्याला मिळणाऱ्या पगाराची त्यांना घरीं गरज आहे. या पत्राचं त्याच्या कानांवर गेलं तेव्हां त्यानं दर रविवारीं यायचं नि मदत करायचं कबूल केलं.

अखेर तो आला, त्यानं पत्र वाचलं. फार कठिण वाटणारे कांहीं शब्द आणि वाक्यं त्यानं दाखवून दिलीं. तुमच्या कांहीं बोंचऱ्या, विशेष खुनशीपणाच्या गोष्टींची आठवण त्यानं आम्हांला करून दिली. त्याची टिंगल करायची परवानगीदेखील त्यानं आम्हांला दिली. खरा तर ह्या पत्राचा मुख्य लेखक तोच आहे.

पण म्हणून कांहीं तुम्हीं समाधान मानूं नका. गियानींची ठसठसती आठवण तुम्हांला मनांत बाळगायलाच हवी. आपल्याला काय वाटतं तें अजुनी त्याला स्पष्ट नाहीं सांगतां येतं.

**उत्तराची वाट** आतां आम्हीं इथं उत्तराची वाट पाहतों आहोत. कोणत्यातरी माजिस्त्रालेमधें कुणीतरी नक्की निघेलच आम्हांला उत्तर लिहिणारा –

प्रिय मुलांनो,
सगळेच शिक्षक कांहीं तुमच्या त्या बाईंसारखेच नसतात. तुम्हीं स्वतःच वंशवादी होऊं नका.

तुमचं प्रत्येकाचं म्हणणं मला पटलं असं नाहीं, पण तरीहि आमची शाळा कांहीं हवी तितकी चांगली नाहीं हें मला ठाऊक आहे. नवीन लोक आणि नव्या संस्कृतींना मज्जाव फक्त परिपूर्ण शाळाच करूं शकेल. आणि अशी परिपूर्ण शाळाच नाहीं. ना तुमची, ना आमची.

मात्र तुमच्यापैकीं ज्या कुणाला शिक्षक व्हायचं असेल त्यानं इथं येऊन परीक्षा दिल्या, तर तुमच्याखातर बाकीच्या गोष्टींकडे डोळेझांक करणारे सहकारी माझ्याजवळ आहेत.

अध्यापनशास्त्रांत आम्हीं तुम्हांला फक्त गियानीबद्दल विचारूं– साहित्याच्या प्रश्नपत्रिकेंत 'तुम्हीं हें सुंदर पत्र कसं लिहिंलं' तें आम्हीं विचारूं. लॅटिनमधें तुमचे आजोबा अजुनी वापरत असलेले कांहीं पुराणे शब्द, भूगोलांत इंग्रज शेतकऱ्यांचे रिवाज, इतिहासांत डोंगरी लोक सपाटीवर कां आले त्यांची कारणं. शास्त्रांत तुम्हीं आम्हांला 'सोमैंती' बद्दल सांगा आणि चेरीचीं

फळं ज्या झाडावर लागतात त्याचं अचूक नांव. – आम्हीं वाट पाहतों आहों ती या अशा पत्राची. आम्हांला विश्वास आहे कीं तें येईल.

आमचा पत्ता :
स्कुओला दि बार्बियाना
व्हिच्चिओ, म्युगेल्लो,
फिरेन्झे, इटाली

*नवा पत्ता :
रागाइझी दि बार्बियाना
व्हिया देल कोल्ले ५१
कालेंझानो-फिरेन्झे, इटाली

---

* हें मराठी पुस्तक वाचणाऱ्यांपैकीं कुणीं पत्र लिहिलं तर तें इंग्रजींत लिहावं. ह्या मंडळींना इंग्रजी येतं. पत्ता तर अर्थातच इंग्रजींत लिहावा लागेल : Ragazzi di Barbiana, Via del Colle 51 Calenzano-Firenze, Italy.